# माणूस

शनिवार । १७ जानेवारी १९७६ । एक रुपया



## स्वामीजींचे उद्दिष्ट अद्यापी साध्य झालेले नाही....

पृष्ठ....३

साप्ताहिक माणूस

वर्ष पंधरावे – अंक : बत्तिसावा

१७ जानेवारी १९७६

मूल्य : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशाची वर्गणी : पंचावन्न रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤

# आपण कितपत झगडू शकतो ?

'अँटिगनी' हे डॉक्टर श्रीराम लागूंनी भाषांतर केलेले अनुईचे नाटक 'माणूस'ने गेल्या दिवाळी अंकात प्रसिद्ध केले होते. मुंबईला नाटकाचे काही प्रयोग झाले व त्यावर वृत्तपत्रांतून उलटसुलट मतप्रदर्शनही झाले. चालू आठवड्यात या नाटकाचा प्रथम प्रयोग पुण्याला होत आहे. दिवाळी अंकातील नाट्यभाषांतर वाचून एका वाचकाने कळविलेली ही प्रतिक्रिया—

## एका मुक्त गाण्याचे मुक्त समर्थन

¤ अँण्टिगनी नाटकात मुख्य संघर्ष आहे– अँण्टिगनी व राजा क्रियॉनचा ! त्यामुळे त्या दोन पात्रांना असामान्य महत्त्व आहे– इतर पात्रे खूपशी गौण... त्यामुळेच नाटकाचा प्रवाह एकाच दिशेला वहाण्यात यश येते. अँण्टिगनीची बहीण इस्मिनी एक अतिसामान्य मुलगी. अँण्टिगनीला हिमॉन मिळाल्यामुळे सारे काही मिळाले असे समजणारी !... तिला 'अँण्टिगनी' न समजणं अगदीच नैसर्गिक. तिला अँण्टिगनीची काळजी मायेपोटीच वाटते. अँण्टिगनीची दाई तर तिला अजूनही लहानच मानत असते. तिचे वागणे तिला फक्त Childlike वाटते– आणि त्याबद्दल ती वेळोवेळी तिला दटावतेही. हिमॉन तिचा प्रियकर... नेहेमीच्या रूढ प्रियकरासारखा... ही सारी माणसे इतकी सामान्य असतात की त्यांच्यात संघर्षाच्या भावनेचा उद्भव देखील शक्य होत नाही. राजा क्रियॉनसुद्धा मुलाचे आयुष्य अँटिगनीशी बांधलेले असल्यामुळे तिचाच असतो. ...सर्व सत्ता हाती असलेला एक सामान्य माणूस ! जगणे हे त्याचे ध्येय !... अँण्टिगनीला जगवण्यासाठी थोडी धडपड आणि तडजोड तो करायला तयार असतो. त्यानं स्वत: तडजोडीचे हलाहल पचवलेले असते आणि ते डोस तो अँण्टिगनीला पाजू इच्छितो... केवळ जगण्यासाठी... आणि जगविण्यासाठीही !

अँण्टिगनी नाटकाच्या सुरुवातीपासूनच मरणाचे ध्येय ठेवून वागणारी, हट्टी मुलगी असा प्रथम वरवरचा आभास होतो. हळूहळू तिच्यातली समर्पणाची भावना मनाला सुन्न करू लागते... पण तितकीच ती अनाकलनीय वाटते. नाटककार अनुइने तिला सर्व गोष्टी दिल्या आहेत... मान, प्रतिष्ठा, हिमॉन-सारखा प्रियकर इ. इ. पण ती कशात अडकत नाही– ही जाणीव जेव्हा स्पष्ट होते तेव्हाच गूढतेच्या कोषातली अँण्टिगनी मनात उलगडू लागते, फुलू लागते. अँण्टिगनी वाऱ्यासारखी मुक्त भासते– कोणाचीही दिशा न मानणाऱ्या वादळवाऱ्यासारखी ! पण तिला दिशाहीन मानणे तेवढेच खुळेपणाचे आहे. तिला दिशा आहे... पण ती स्वत:ची ! स्वत:ची दिशा ठरवण्याचा अधिकार तिला प्राणापेक्षाही प्रिय वाटतो. त्याचबरोबर आपली दिशा बरोबर असेल हा आग्रहही ती धरत नाही. तिच्या मते ती चुकीचीही असू शकेल; पण ती दिशा स्वत:ची असल्यामुळे तिच्याकडे झेपावण्यात तिला स्वाभिमान वाटतो. प्रवाहातील अडथळे मोडून काढण्याइतकी ती समर्थ नाहीय्... फक्त त्यावर आदळणे, आपल्यात असलेल्या सामर्थ्यानिशी अडथळ्याला टक्कर देणे... आणि स्वत:च्या ठिकऱ्या ठिकऱ्या करून घेणे इतकेच तिला शक्य असते.

–राज्यपदासाठी झालेली भांडणे, अस्थिर वातावरण... क्रियॉनला शांतता हवी असते. (कोणत्याही सत्ताधारी व्यक्तीला ती 'येन केन प्रकारेण' हवी असते !) त्यासाठी तो अँण्टिगनीच्या एका भावाचे प्रेत सडवत ठेवून लोकांना दहशत बसवण्याचा प्रयत्न करतो. दफन करण्याचे प्रयत्न करण्यासच काय पण साधे मृतात्म्यास शांती मिळण्यासाठी प्रार्थनेची सुद्धा बंदी असते; पण जेव्हा तोंड दाबले जाते तेव्हा मनाची आक्रंदने अधिक प्रभावी होतात... आणि सारे झुगारण्याची शक्ती

पृष्ठ ३२ वर

# स्वामीजी
# एक पावन स्मृती

'हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामाच्या आठवणी' या स्वामी रामानंदतीर्थ यांनी लिहिलेल्या इंग्रजी आत्मचरित्राचा मराठी अनुवाद येत्या २२ जानेवारीला, स्वामीजींच्या पुण्यतिथीला प्रकाशित होत आहे.

स्वामीजींचे एक निकटचे सहकारी श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांनी या मराठी अनुवादाला लिहिलेली ही प्रस्तावना....

---

मराठी अनुवाद : **वि. पां. देऊळगावकर**

एखाद्या विषयासंबंधी विचार करताना किंवा लिहिताना वस्तुनिष्ठता येण्यासाठी काही गोष्टींची आवश्यकता असते. त्यापैकी एक गोष्ट म्हणजे ज्या विषयांसंबंधी एखाद्याला विचार करावयाचा असतो किंवा त्यासंबंधी काही लिहावयाचे असते त्या विषयात त्याने भाव-विवशतेने स्वतःला गुरफटून घेऊन चालत नाही. वस्तुनिष्ठतेसाठी त्या विषयाचे परिपूर्ण ज्ञान असणे हे अत्यावश्यक आहे हे जरी खरे, तरी भावविवशपणे त्या विषयात गुरफटून घेतल्याने पुष्कळदा आपल्या विचारात व लेखनात आत्मनिष्ठ गोष्टी डोकावतातच.

या दृष्टीने पाहता पू. स्वामीजींच्यासंबंधी मी काही लिहीत असताना पूर्ण वस्तुनिष्ठता राखणे मला अधिकच शक्य दिसत नाही. स्वभावतः मी उर्मट अथवा उद्धट नाही. तरीपण प्रत्येक वडीलधाऱ्या व्यक्तीच्या चरणी साष्टांग दंडवत घालण्याची सार्वत्रिक नम्रता व आदरबुद्धीही माझ्या ठिकाणी नाही हेही खरे. थोड्याशा प्रमाणात माझ्या अनादराच्या प्रवृत्तीविषयी माझा दुर्लौकिकही झाला आहे. व तो तसा सार्थच म्हटला पाहिजे. याच कारणामुळे माझ्यासारखी माणसे आपला भक्तिभाव व आदर एखाद्या दुसऱ्या व्यक्तीसाठीच राखून ठेवतात. मला हे एकदम मान्य केले पाहिजे की गेल्या चार दशकांत ज्या काही अगदी थोड्या व्यक्तींविषयीच माझ्या मनात अत्यंत श्रद्धायुक्त भक्तीचे व आदराचे स्थान मी देऊ शकलो, त्यात पूज्य स्वामीजी एक आहेत. त्यामुळे या थोर व्यक्तिमत्त्वाचे मूल्यांकन करताना वस्तुनिष्ठता टिकवून ठेवणे हे दुरापास्त आहे. तरीपण स्वामीजींच्या व्यक्तिमत्त्वाचा मला जो प्रत्यय आला त्यावरून पूज्य स्वामीजींचे व्यक्तिमत्त्व शक्य तितक्या अलिप्तपणे सादर करण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीन.

प्रादेशिक दृष्टीने विचार करता हैद्राबाद संस्थान जरी त्रैभाषिक होते तरी, वस्तुतः ते पंचभाषिक होते. त्या संस्थानात जनप्रिय व लोकादरास पात्र असे बरेच देशभक्त व पुढारी होऊन गेले. तसेच प्रत्येक क्षेत्रातही अभिमान बाळगण्यास योग्य अशा काही श्रेष्ठ व प्रसिद्ध व्यक्ती होऊन गेल्या. थोड्याशा खोलात जाऊन मागला इतिहास चाळला तर चटकन असे दिसून येते की संस्थानातल्या पुढाऱ्यांनी– मग ते कुठल्याही भागातून का आलेले असेनात– हैद्राबाद शहरच आपल्या कार्याचे केंद्रस्थान बनविले होते. सर्वसामान्यपणे संस्थानच्या राजधानीतच ते काम करत असत. तेथूनच जिल्ह्याच्या ठिकाणी काम करण्यास प्रेरणा देत असत. शिवाय संस्थानव्यापी कार्य असले तरी पुढाऱ्यांना प्रादेशिक दृष्टी ठेवून काम करणे अपरिहार्य होते. त्यांच्यापैकी काहीजण तेलंगणात तर काहीजण मराठवाड्यात व काही कर्नाटकात बद्धमूल झाले होते. जे हैद्राबाद शहरातच वाढून तेथेच स्थायिक झाले होते ते प्रादेशिक चौकटीत बसू शकत नव्हते, म्हणून नागरी आघाडीवरच्या पथकातच काम करीत राहिले. हैद्राबाद संस्थानात कमीअधिक प्रमाणात अशाच प्रकारचे नेतृत्व होते. त्या काळच्या परिस्थितीत ते अपरिहार्य होते.

त्या स्वरूपाच्या नेतृत्वास पू. स्वामी रामानंदतीर्थ हे लक्षणीय अपवाद होते. त्यांचा जन्म कर्नाटकातला आणि म्हणून कन्नड प्रदेशाने त्यांच्यावर हक्क सांगणे हे रास्तच आहे. प्रथम बरेचसे शैक्षणिक कार्य व नंतरचे राजकीय कार्य त्यांनी मराठवाड्यातच केले, म्हणून स्वामीजी आपलेच आहेत असा हक्क महाराष्ट्रीय लोकांनी गाजविणे हेही कदा-

चित अधिक संयुक्तिक असेल. तरी स्वामीजींचे राजकीय नेतृत्व तेलंगणातच पूर्णपणे विकसित झाले व तेलंगणाचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी आपल्या राजकीय जीवनाचा बराचसा भाग समर्पिला व मोठ्या निष्ठेने तेलंगणाचे नेतृत्व केले असे माझे ठाम मत झाले आहे. तेलंगणात त्यांनी केलेले कार्य वगळले तर त्यांची राजकीय प्रतिष्ठा व राजकीय क्षेत्रातील त्यांनी पार पाडलेली कामगिरी ही एकदम थिटी वाटू लागेल असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये असे वाटते. अशा रीतीने सर्व प्रदेशांचे म्हणजे साऱ्या संस्थानाचे असे म्हणून घेणारे जे अगदी थोडे पुढारी संस्थानात होते त्यांपैकी स्वामीजी एक होते. त्यांचे व्यक्तित्व कुठल्याही एका प्रदेशाने सीमित झाले नव्हते– बद्ध झाले नव्हते. स्वामीजींपासून प्रेरणा मिळालेल्या आमच्यासारख्या राजकीय कार्यकर्त्यांना स्वामीजी हे केवळ एक पुढारी किंवा नेते असे कधीच वाटले नाहीत. केवळ उपदेश करून त्यांनी अनुयायी निर्माण केले नाहीत. बौद्धिक युक्तिवाद किंवा शब्दच्छल करून कशाचे तरी समर्थन करीत बसलेले स्वामीजी मला आठवत नाहीत. उलट ते म्हणजे एक प्रतीक, एक शक्ती, ते स्वतःच एक संस्था होते असे वाटत असे. त्यांच्यापेक्षा निष्णात व सरस वादविवादपटू मी पाहिले आहेत. आपल्या भाषणाने श्रोत्यांवर छाप पाडून त्यांना वश करून घेणाऱ्या त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ वक्त्यांची भाषणे मी ऐकली आहेत. राजकीय क्षेत्रात त्यांच्याहून अधिक कुशल संघटक मी पाहिले आहेत. कदाचित इतर काही लोकांनी त्यांच्याहून अधिक त्याग सुद्धा केला असेल आणि अधिक कष्ट अन् यातनाही सहन केल्या असतील. केवळ बुद्धिमत्तेच्या प्रखरतेचाही जरी विचार केला तरी त्यांच्यात काही असामान्यत्व किंवा अद्वितीयत्व नव्हते. हे सारे असे असूनसुद्धा साकल्याने विचार करता स्वामीजींचे आवाहन व त्यांची अनिर्वचनीय आकर्षक शक्ती मात्र अद्वितीय व अतुलनीयच ठरेल.

स्वामीजींनी आम्हाला जी साद घातली ती केवळ राजकीय स्वरूपाचीच नव्हती; तशीच तीत केवळ उपयुक्ततावादी दृष्टी नव्हती. मला अपरिचित अशा अध्यात्मक्षेत्रात न शिरता मी एवढे सांगू शकेन की स्वामीजींची हाक राजनीतियुक्त आध्यात्मिक अशी होती. जेव्हा स्वामीजींनी हाक दिली त्या वेळी त्यांचा काय उद्देश असावा याविषयी विचार करण्यासाठी आम्ही क्षणभरही थांबलो नाही. त्यांनी आपल्या कार्यक्रमाची रूपरेखा आमच्यापुढे मांडली. तेव्हा आमच्यावर होणाऱ्या संभाव्य परिणामाचीही आम्ही कधी चिंता केली नाही. अशा रीतीने स्वामीजी, त्यांचे कार्य व त्यांचे अनुयायी हे सारे पूर्णपणे एकरूप बनून गेलो. अशा भावनात्मकतेने आम्ही त्यांच्या कार्याशी निगडित झालो होतो; त्याप्रमाणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने राजनीती अन् अध्यात्म यांमध्ये एकरूपता निर्माण झाली होती.

या गाढ अशा एकात्मतेची अनेक कारणे आढळून येतील. त्यांतील मुख्य कारण असे होते की स्वामीजी स्वतः संन्यासी असल्यामुळे आपल्या अनुयायांमध्ये निःस्वार्थ सेवा,. त्याग व आत्मविश्वासाची जाणीव त्यांनी निर्माण केली. दुसरी गोष्ट ही की त्यांची उद्दिष्टे अगदी निःसंदिग्ध व स्पष्ट होती. या उद्दिष्टपूर्तीविषयीचा त्यांचा आग्रह निर्दोष आणि निर्भेळ स्वरूपाचा होता. तात्कालिक लाभालाभाच्या विचारांनी ते कधीच प्रेरित होत नसत किंवा वेळ येईल तसे डावपेच लढविण्याचीही त्यांची वृत्ती नव्हती. तिसरी गोष्ट म्हणजे अर्थातच त्यांच्या स्वतःच्या व्यक्तिमत्वाचेच सामर्थ्य–शांत प्रकृती पण अतिशय कणखर व दृढ निश्चयी वृत्ती यांचा त्यांच्या ठिकाणी असलेला मिलाफ बंडखोरीची जहाल प्रवृत्ती, त्यांचे ओजस्वी वक्तृत्व आणि कार्यात गतिमानता निर्माण करण्याचे त्यांचे प्रचंड सामर्थ्य या साऱ्या गोष्टी निःसंशय फार महत्त्वाच्या होत्या. त्या दूरगामी परिणामी करणाऱ्या ठरल्या अन त्यामुळे स्वामीजी अतिशय प्रभावी राजकारणी पुरुष बनले. तरी पण स्वामी रामानंदतीर्थ या व्यक्तीचा उदय केवळ या सर्व गोष्टींमुळेच झाला असे नव्हे. या सर्वांहून आणखी एक महत्त्वाचे असे कारण होते आणि ते म्हणजे पददलितांच्याबद्दल त्यांच्या अंतःकरणात असलेली अपार सहानुभूती अन् कळकळ व त्यांच्या उद्धारासाठी सर्वस्व पणाला लावण्याचा त्यांचा निर्धार हे होय. त्यांच्या बाबतीत 'दलितोद्धार' इत्यादी केवळ घटनेतील, ठरावातील किंवा लेखनातील भारदस्त शब्द एवढेच त्यांचे स्वरूप नव्हते. उलट त्यांच्या बाबतीत धर्मश्रद्धेचे रूप त्या शब्दांना प्राप्त झाले होते. या गुणांमुळे त्यांच्या वेळच्या बऱ्याच इतर मंडळींहून स्वामीजी एकदम निराळेच वाटत आणि विशेषत्वाने ओळखले जात. याच गुणवैशिष्ट्यामुळे ते एकीकडे बहुजनसमाजाचे प्रेम व विश्वास संपादू शकले व दुसरीकडे कॉंग्रेसमधील बहुजनसमाजाच्या कार्यकर्त्यांतही प्रिय व आदरणीय ठरले.

स्वामीजींचे महत्त्व वाढण्यास, त्यांना प्रभावशाली नेते बनण्यास इतिहासाने खरोखरच नाट्यपूर्ण प्रसंग व संधी उपलब्ध करून दिली. हैद्राबाद संस्थानात एकीकडे असलेली अनिर्बंध सरंजामशाही व दुसरीकडे असलेले कमालीचे दारिद्र्य व मागासलेपण यांच्यामधील परस्पर क्रिया-प्रतिक्रियेतून शोषण मात्र निःसंकोचपणे बोकाळले होते. जमीनधारणेचा प्रश्न प्रामुख्याने सर्वांपुढे उभा होता. त्या प्रश्नावरून ग्रामीण भागात चोहोकडे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. रझाकारदल, कम्युनिस्ट, सरंजामी वतनदार, समाजकंटक आणि नफेखोर या सर्वांनी मिळून धुमाकूळ घातला होता. त्यामुळे बराच काळपर्यंत पृथ्वीवर नरक निर्माण केला होता. अकनूर मचलपल्ली येथील भीषण घटना आणि त्यांसारख्या अन्यत्रही लक्षावधी मूक जनतेवर चाललेल्या अत्याचारांमुळे मोठी स्फोटक परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे अतिरेकी विचाराच्या मंडळींना आपल्या दृष्टीने या परिस्थितीचा लाभ करून घेण्यास एक संधी मिळाली. प्रश्न मुख्यतः सामाजिक व आर्थिक स्वरूपाचा होता. अर्थात त्यात जातीय व राजनैतिक प्रश्नांचाही गुंता होताच. हे दुखणे नाहीसे करण्यासाठी मोठ्या स्वरूपाची व थोडीशी किचकट अशा शस्त्रक्रिया करणे अवश्य होते.

हीच शस्त्रक्रिया आपल्या वैशिष्ट्यपूर्ण ध्येयनिष्ठेने व चिकाटीने स्वामीजींनी करायचे ठरविले. या शस्त्रक्रियेत रोगीच दगावेल असे काहींचे म्हणणे होते. अशा शस्त्रक्रियेसाठी अद्यापि परिस्थिती परिपक्व नाही असा इतर काही लोकांनी सल्ला दिला. आणखी काही जणांनी या संदर्भात आपल्या वैयक्तिक लाभहानीचा हिशोब घातला व निरनिराळी कारणे पुढे करून विविध मार्गांचा अवलंब करून स्वामीजींच्या या मार्गापासून दूर राहण्याचे ठरविले. त्यांनी अवलंबिलेल्या मार्गांपैकी एक मार्ग म्हणजे स्वामीजींनी आखलेल्या कार्यक्रमाबद्दलचा अपप्रचार करण्याचा; पण स्वामीजी कातळासारखे निश्चल राहिले आणि आपल्या शस्त्रक्रियेचे काम त्यांनी चालू ठेविले. त्यांना रोगाचे मूळ

कोणते याची स्पष्ट कल्पना होती. पृष्ठभागावर वरवर दिसणारा क्षोभ हा केवळ लक्षणात्मक होता. साऱ्या भानगडींचे खरे कारण खोलवर रुजले होते अशी त्यांची खात्री झाली होती. त्यांनी कित्येक वेळा आपले मत व्यक्त करताना असे स्पष्टपणे सांगितले होते की समाजकंटक लोक हे डासासारखे असतात. जोपर्यंत आपण डासांची उत्पत्तिस्थळेच औषधे मारून स्वच्छ ठेवणार नाही, तोपर्यंत डासांचा केवळ शारीरिक नाश केल्याने डासांचे खरे निर्मूलन होणार नाही. दुसऱ्या शब्दांत थोडक्यात असे सांगता येईल की, सरंजामदारवर्ग आणि अतिरेकी विचाराचे चळवळे यांच्यामधील संघर्षाचे मूळ, त्या वेळी असलेल्या अतिशय विषम अशा भूमी-संदर्भात होते. जोपर्यंत त्या विषम संदर्भावरच प्रहार होऊन ते संदर्भ ठाकठीक केले जाणार नाहीत तोपर्यंत शांतता प्रस्थापित होण्याची शक्यता नव्हती. अशा परिस्थितीत स्वामीजींच्या अभिप्रायामुळे कम्युनिस्टांच्या सशस्त्र लढ्याकडे तो केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न आहे हा दृष्टिकोण हळूहळू बदलत चालला आणि त्याच वेळी भूसमस्येचा प्रश्नच सोडविण्याचे निर्धाराने प्रयत्न सुरू झाले. पुष्कळांना हे सारे प्रयत्न मोठे अडचणीचे वाटले. पुष्कळांना ते रुचले नाहीत. ते अस्वस्थ झाले. स्वामीजींच्या भगव्या कफनीने ते बुजले, चिडले; पण स्वामीजी आपल्या मार्गावर अचलच राहिले.

याच सुमारास स्वामीजींनी तेलंगणाच्या उद्ध्वस्त ग्रामीण भागातून संचार सुरू केला. तेथील हृदयविदारक परिस्थिती शब्दांनी वर्णन करण्यासारखी नव्हती. एकीकडे पोलिसांचे दल तर दुसरीकडे कम्युनिस्टांचे दल. या दोघांच्या कचाटयात सापडलेल्या लोकांना जीवन असह्य झाले होते. इतके अत्याचार अन् हाल चालले असताही लोकांची विनोदवृद्धी जागृत होती असे दिसते. कारण पोलिसांना ते विनोदाने 'पगती दोरालु' (प्रकाशातील- दिवसाचे धनी ) व कम्युनिस्टांना 'चीकटी दोरालू' (अंधारातील रात्रीचे धनी) असे म्हणत. (तेलगूत दोरा हा शब्द मालक, धनी, साहेब अशा अर्थाने वापरतात). अशा भागात स्वामीजी विलक्षण धैर्याने गेले. त्यांच्याबरोबर पोलिससंरक्षण नव्हते. शासकीय वर्तुळातील लोक स्वामीजींच्या तेलंगणातील या दौऱ्याबद्दल उदासीन होते. त्यांना स्वामीजींनी त्या विभागात हिंडणे पसंत नव्हते. स्वामीजी अशा रीतीने हिंडून प्रशासनात केवळ हस्तक्षेप करीत आहेत अशी शासकीय अधिकाऱ्यांची धारणा झाली होती असे मानण्यास बराच आधार सापडतो. स्वामीजी त्या भागातून जिवंत परत येतील की नाही अशी काही लोकांना शंका वाटत होती. ते परत येतील अशी काही लोकांना फारशी आशा नव्हती; पण स्वामीजी डगमगले नाहीत. ते गावागावातून हिंडले. दहशतीने दिङमूढ होऊन गाव सोडून सैरावैरा पळून जाणाऱ्यांना गोळा करून त्यांना दिलासा देण्याचा स्वामीजींनी प्रयत्न केला. आतापर्यंत लोकांनी जे कधी ऐकले नव्हते अशा शब्दात लोकांना धैर्याच्या गोष्टी सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ग्रामीण भागातील मृतवत झालेल्या लोकांना नवजीवन देणारा तो संदेश होता. वास्तविक या बाबतीत इतर कुणाशीही स्वामीजींची तुलना करण्याची माझी इच्छा नाही; पण हे खरे की स्वामीजींच्या या दौऱ्याने गांधीजींच्या नवखाली व तिप्पेराच्या यात्रेचे स्मरण झाले. सारांश कुत्सित लोकांनी हैद्राबादला बसून स्वामीजींच्या तेलंगणयात्रेची टिंगल अन् थट्टा करण्याचा प्रयत्न केला. आज स्वामीजींच्या त्या ऐतिहासिक यात्रेचा निश्चित काय परिणाम झाला याचे महत्त्वमापन कसे करावे हे कळत नाही. शिवाय आज जेव्हा लोकांची मते सत्तेच्या आकर्षणाने भाळून गेली आहेत व जेव्हा अतिशय द्रुतगतीने राजकीय स्थित्यंतरे घडून येत आहेत अशा वेळी त्या काळात स्वामीजींनी अतुल धैर्याने केलेल्या तेलंगण यात्रेच्या परिणामाचे काटेकोरपणे मूल्यांकन करणे शक्य नाही. तथापि त्या यात्रेशी संबंधित असलेल्या व्यक्ती आणि त्या यात्रेच्या प्रत्यक्ष परिणामाची ज्यांना सहानुभूतिपूर्वक जाणीव आहे अशा व्यक्ती स्वामीजींची ही यात्रा कधीच विसरणार नाहीत. सदैव त्यांना त्या यात्रेचे स्मरण राहील. यानंतर पू. विनोबांनी तेलंगणात केलेली पदयात्रा, त्यातून झालेला भूदानचळवळीचा उगम, या सगळ्या घटना सगळ्यांच्या परिचयाच्या आहेत. त्यांचा पुनरुल्लेख करण्याची आवश्यकता नाही.

कूळ व शेतकऱ्यांच्या प्रश्नाला राजकीय व सैद्धांतिक विभिन्नतेमुळे अखिल भारतीय स्वरूपाचे महत्त्व प्राप्त झाले होते. या उठावामुळे त्या संबंधात जे कायदे झाले त्यांचीही सर्वांना माहिती आहे. त्यांचीही येथे पुनरावृत्ती करण्याची गरज नाही; पण आज त्या घटनेनंतर इतका दीर्घ काळ लोटल्यावर एक गोष्ट सर्वसामान्यपणे मान्य केली पाहिजे की एकटया स्वामीजींचाच आवाज याविरुद्ध ऐकू येत होता. एकीकडे स्वार्थसाधू लोक व दुसरीकडे अतिरेकी चळवळे यांच्या प्रचंड कोलाहलात एकटया स्वामीजींचाच आवाज प्रथम लोकांपर्यंत पोचला होता.

हे सगळे सांगितल्यावरही स्वामीजींच्या राजकीय व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू सांगायचा राहून गेला असे मला वाटते. हा पैलू अगदी नैसर्गिक होता. सगळ्या प्रश्नांच्या बाबतीत एक ठाम, स्पष्ट व निर्धाराची भूमिका घेण्याच्या स्वामीजींच्या प्रवृत्तीतून त्या पैलूचा उगम झाला होता. भूधारणासंबंधी दूरगामी स्वरूपाच्या सुधारणा करणे अत्यंत निकडीचे व अपरिहार्य आहे, या त्यांच्या भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात तीव्र स्वरूपाच्या प्रतिक्रिया निर्माण झाल्या. आता ही गोष्ट चांगली सर्वश्रुत झाली आहे की याच प्रतिक्रियेत स्वामीजींना झालेल्या राजकीय विरोधाचे मूळ दडलेले होते. काँग्रेसमधील मतभेद हे केवळ वैयक्तिक स्वरूपाचे आहेत व ते गटबाजीतून निर्माण झालेले असल्यामुळे दुर्लक्षणीय आहेत असा आभास निर्माण करण्याचा सारखा प्रयत्न चालला होता. सैद्धांतिक बाजूकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले किंवा सैद्धांतिक मतभेदच नाहीत असे सांगण्यात आले. भांडणासाठी आपल्याजवळ निर्भेळ असे प्रश्नच फारसे नाहीत हीच काँग्रेससंघटनेची शोकांतिका आहे, त्याचा परिणाम असा झाला की काँग्रेसमधील बरेचसे झगडे, बरीचशी भांडणे संघटनेला बाधक अशा प्रश्नांतूनच निर्माण झाली. स्वामीजींच्या नेतृत्वाखाली सैद्धांतिक ध्रुवीकरण करण्यावर बुद्धिपुरःसर भर देण्याचे खूपच प्रयत्न करण्यात आले. त्या प्रयत्नांचा परिणाम असा झाला की जात, गट, प्रदेश, व्यक्तित्व आणि आत्महित यांसारख्या सामान्यपणे भांडणाला कारणीभूत होणाऱ्या गोष्टी सिद्धांताच्या मुख्य प्रवाहात पूर्णपणे वाहून गेल्या, लुप्त झाल्या. ज्या सैद्धांतिक गोष्टींवर स्वामीजींनी भर दिला होता त्याच गोष्टींचा योग्य दिशेने काँग्रेसने जर पाठपुरावा केला असता तर काग्रेससंघटना आज कोणत्या

स्वरूपात राहिली असती याची कल्पना करणे कठीण आहे. त्या साऱ्या आता तर्क अन् कल्पनासृष्टीतील गोष्टीच ठरणार; पण या ठिकाणी एक गोष्ट मात्र नमूद केली पाहिजे ती ही की मुख्यतः दोन प्रश्नांमुळे स्वामीजींना राजकीय विरोध खूपच होत गेला. पहिला प्रश्न होता भूसुधारणेचा व दुसरा प्रश्न होता राज्यपुनर्रचनेचा. हैद्राबाद भूसुधारणा विधेयकाचे क्रांतिकारी स्वरूप पुष्कळ सौम्य करण्याचे खूप प्रयत्न होऊनही सरतेशेवटी ज्या सुधारणा मान्य झाल्या त्या पुरोगामी आणि गरीब किसानाला हितावह ठरल्या हे मान्यच केले पाहिजे. हैद्राबादच्या कूळकायद्याचे एक आदर्श कायदा म्हणून साऱ्या भारतात स्वागत झाले.

दुसरा प्रश्न भाषेच्या तत्त्वावर राज्यांची पुनर्रचना करण्याचा होता. स्वामीजींच्या राजकीय जीवनात हाच प्रश्न अधिक निर्णायक ठरला. वेळेच्या गरजेनुसार, हितसंबंधी राजकारणी लोकांनी या प्रश्नाचा आपल्या स्वार्थाकरिता कसा उपयोग करून घेतला याची मला थोडी अंतर्गत माहिती आहे. स्वामीजींना अगदी कडवा विरोध करणाऱ्या काँग्रेसच्या एका पुढाऱ्यांनी मला अगदी स्पष्ट शब्दात असे सांगितले की ' मी भाषावर प्रांतरचनेला विरोध करतो असे कृपा करून समजू नका. तशी प्रांतरचना जेव्हा व्हायची असेल तेव्हा होईल; पण या मध्यंतरीच्या काळात स्वामीजींचे काँग्रेसश्रेष्ठींवर असलेले वजन, त्या वर्तुळात असलेले त्यांचे महत्त्व पूर्णपणे नष्ट करण्यासाठी या प्रश्नाचा उपयोग मी करून घेऊ इच्छितो. या प्रश्नामुळे अनायासे एक चांगले साधन आमच्या हाती आले आहे व या साधनाचा, या संधीचा राजकीय दृष्टीने अधिकाधिक लाभ करून घेण्याचा आम्ही निर्धार केला आहे.' त्या काँग्रेस पुढाऱ्याचे हे शब्द अजूनही माझ्या कानात स्पष्टपणे घुमत आहेत.

सैद्धांतिक निष्ठेमुळे स्वामीजींचा राजकीय उत्कर्ष शिगेला पोचला होता; पण त्याच सैद्धांतिकतेमुळे त्यांच्या राजकीय अपकर्षालाही आरंभ झाला. स्वामीजींच्या लौकिकाला बाध आणण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रांतून त्यांच्या सिद्धांताची चुकीची प्रतिमा सादर करण्यापर्यंतच्या शक्य त्या विविध मार्गांनी स्वामीजींना अडचणीत आणण्याच्या प्रयत्नांची मला जेव्हा आठवण होते तेव्हा मला कधीकधी लाज वाटू लागते. स्वामीजींच्याविषयी त्या काळच्या वृत्तपत्रांतून जे जे येत होते त्याचे वाचन हे हृदयविदारक असले तरी तत्कालीन बऱ्याच गोष्टींवर प्रकाश पाडते. हे सर्व प्रकार होऊनही स्वामीजींचे काहीच नुकसान झाले नाही; पण भारताचा हा सुपुत्र भारताच्या राजकीय क्षेत्रातून अकाली अंतर्धान पावल्यामुळे आम्हा जनतेचे किती नुकसान झाले याची कुणाही राजकारणी व्यक्तीस थोडीशी तरी जाणीव आहे आहे की नाही याचीच मला शंका आहे.

स्वामीजींनी राजकारणाचा संन्यास घेतला हे शेवटी एका दृष्टीने बरेच झाले असे कधीकधी मला वाटू लागते. आपले जीवितोद्दिष्ट साध्य झाल्यानंतर प्रेषितला योग्य असे स्थान उरत नाही. नियतीचा हा निष्ठुर पण अलिखित नियम आहे; पण त्याहून अधिक निष्ठुर सत्य आहे की स्वामीजींचे उद्दिष्ट अद्यापि साध्य झालेले नाही. त्यांचे कार्य पूर्ण झालेले नाही. त्या कार्यात अनेक अडथळे मात्र आले. त्यांपैकी पहिला अडथळा म्हणजे १९५३ मध्ये सक्रिय राजकारणातून झालेली स्वामीजींची निवृत्ती होय. हैद्राबाद प्रदेश काँग्रेसचे नेतृत्व सोडल्यानंतर त्यांनी राजकीयेतर कार्याला ज्या निष्ठेने वाहून घेतले त्यायोगे त्यांची प्रतिष्ठा खूपच वाढली. तेव्हापासून ते विधायक कार्यात पूर्णपणे मग्न झाले. १९६२ च्या निवडणुकीत लोकसभेच्या जागेसाठी उभे राहण्यास त्यांनी दिलेला नकार म्हणजे त्यांच्या आध्यात्मिक प्रवासातील एक निर्णायक टप्पाच म्हटला पाहिजे. आपला बराचसा वेळ रामतीर्थ–आश्रमाच्या पुनर्व्यवस्थेसाठी देण्याचे त्यांनी ठरविले रामतीर्थ–आश्रमाचे ते प्रमुख होते.

राजकारणी लोकांची कृतज्ञेकरिता फारशी ख्याती नाही. आपल्या विरोधकाच्या मृत्यूनंतरही त्याची स्मृती टिकून लोकांमध्ये त्याच्याविषयीचा सद्भाव खूप वाढू नये याविषमी राजकारणी लोक सामान्यपणे दक्षता बाळगीत असतात; पण सर्वसामान्य लोकांत तर भरपूर प्रमाणात कृतज्ञता असते. निदान अशा लोकांना तरी आपले कल्याणकर्ते कोण याची जाणीव करून द्यायला हवी व त्यांना त्या कल्याणकर्त्याचे कृतज्ञतापूर्वक स्मरण होत राहील असे काही केले पाहिजे; पण इतिहास पुष्कळदा अनावश्यक गौण गोष्टींच्या तपशिलांनी भरलेला असतो आणि त्या तपशिलात तो इतिहास घडविणाऱ्या महत्त्वपूर्ण घटनाच लुप्त झालेल्या असतात. बहुधा इतिहास लिहिला जाऊ लागल्यापासून इतिहासाची अशीच शोकांतिका होत आली आहे. सामाजिक व आर्थिक दृष्टिकोणातून कधी काळी हैद्राबाद संस्थानाचा इतिहास लिहिला जाण्याची शक्यता कमीच आहे. तो लिहिला जावो वा न जावो पण त्या अलिखित इतिहासाचे एकमेव नायक स्वामी रामानंदतीर्थच असतील याबद्दल मात्र मला तिळमात्र शंका नाही. केवळ भावी पिढ्यांना अज्ञानामुळे एखाद्या घटनेचा विसर पडतो म्हणून ती घटना झालीच नाही असे ठरत नाही. शेवटी आपण ज्याला इतिहास म्हणतो तो मानवी अनुभवाचा अगदी लहानातला लहान असा एक भाग आहे.

देशाच्या या भागातील लोकांना थोर देशभक्त अन् उपकारकर्त्या स्वामी रामानंदतीर्थांचे प्रेमादराने व कृतज्ञापूर्वक सतत स्मरण होत राहो! आपल्या सर्वांचे आवडते संन्यासी आपल्यातून गेले तरी प्रदीर्घकाळपर्यंत ते त्यांच्या लोकांना व लोकसेवक म्हणविणाऱ्यांना सदा प्रेरणा देत राहोत अशी प्रार्थना करू या. ☐

**[ स्वामी रामानंदतीर्थ स्मारक समिती, हैद्राबाद व पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, या उभयतांच्या सौजन्याने ]**

# कर्क-नीती

श्री. मा. भावे

यादवांच्या राज्यात टंच भरलेल्या गोण्यांच्या थप्प्या गुदामांतून लागलेल्या असत, जात्यांचे गळे जोंधळ्यांनी भरत, वैभवशाली धवळारे शहरोशहरी असत अशी वर्णने पुस्तकांतून आपण वाचली आहेतच; त्यामुळे झाले काय, की समाज अनुशासनबद्ध आणि कार्यमग्न झाला व शासकीय अधिकाऱ्यांना कामेच उरली नाहीत. त्यामुळे देवगिरीवरची धान्याची पोती खाली नेऊन लावून मिठाची पोती वर आणा आणि पुन: मिठाची पोती खाली नेऊन धान्याची पोती परत वर आणा, अशी कामे करण्यात शासनाधिकारी वेळ घालवू लागले. त्याखेरीज 'काम करा, अधिक काम करा, आताच काम करा आणि नेटाने काम करा' हा रामदेवराय महाराजांचा संदेश अंमलात कसा येणार? दुर्दैवाने मिठाची पोती वर आणली आणि खिलजीचा वेढा पडला. काही खुळचट लोक यादवांच्या पराभवाचे कारण शासनाधिकाऱ्यांनी किल्ल्यात भरुन ठेवलेली मिठाची पोती हे देतात; पण ते चूक आहे. दुर्दैव हे या पराभवाचे कारण आहे. असो.

रामदेवरायांचा एक कारभारी अमोघबुद्धि कर्क या नावाचा होता. त्याने निराळेच काम हाती घेतले. यादवांच्या काळी महाराष्ट्रात धनधान्यसमृद्धी असल्याने व्यापार तेजीत असे. म्हणून पुरुषमंडळी प्रवासात असत. 'गाथासप्तशती' वाचणाऱ्यांच्या हे ध्यानात आलेच असेल. साहजिकच गणिकाव्यवसाय मोठ्या प्रमाणावर होता. पुरुष व स्त्री या दोन्ही प्रकारच्या गणिका असत. गणिका म्हटल्या की अनाचार आलाच. हा त्रास अमोघबुद्धीला सहन होईना. तेव्हा त्याने गणिकांसाठी 'आचारसंहिता आणि व्यवसायनीती' तयार करण्याची योजना आखली. या योजनेसाठी खर्च मान्य व्हावा म्हणून तो रामदेवाला भेटला. तेव्हा रामदेवाने ही क्षुद्र गोष्ट आहे, असा शेरा मारला. त्या वेळी अमोघबुद्धी म्हणाला, 'महाराज, ही गोष्ट सामान्य नाही. अफवांचे हल्ली पीक उठते. या पिकाला खतपाणी गणिकागृहांतून जितके मिळते तितके इतर कुठेच नाही. या वार्ताकेंद्रावर आपली पकड घट्ट हवी. म्हटलेच आहे,

> 'आपत्काले तु प्राप्तेऽस्मिन् वेश्याश्च गणिकास्तथा ।
> वार्ताप्रसारप्रमुखाः भवन्ति यादवाधिप: ।। '

कर्काने दोन चलाख कारकून हाती घेऊन लवकरच एक 'गणिकाव्यवसायाची आचारसंहिता आणि नीती' तयार केली. तिला कर्क–नीती असे नाव आहे. या कर्क-नीतीच्या काही प्रती हल्लीच उपलब्ध झाल्या आहेत. पुस्तक लहानसेच, ऐशी–पंचाऐशी पानांचे आहे; पण रंजक आणि कर्कवृत्तीने भरलेले आहे. त्याचा जमेल तेवढा सारांश खाली दिला आहे.

कर्काने प्रथम सहा गणिकासंघ निर्माण केले. विदर्भाचा एक, देवगिरीपरिसराचा दुसरा, शूर्पारक व अपरान्तकाचा तिसरा, करहाटकाचा चौथा आणि पुण्यपुरीचा पाचवा. पुरुषगणिकांचा खास सहावा संघ होता. मग या सर्व संघांसाठी एकच नीती लिहिली. शासनाधिकाऱ्यांचे चातुर्य इथेच दिसते. प्रथम भाग करायचे आणि एकाच नियमांनी ते जोडायचे. त्या संहितेतील तरतुदी अशा होत्या :

१ : प्रत्येक गणिकेला विचार व अभिव्यक्ती यांचे स्वातंत्र्य आहे; पण ग्राहकाच्या सान्निध्यात तिने राजकीय मते व्यक्त करू नयेत. खुलासा : गणिकेच्या सान्निध्यात ग्राहकाची विचारशक्ती क्षीण असते. त्यामुळे मतांचा प्रभाव अधिक पडतो. आपल्या व्यवसायाचा अनुचित लाभ तिला घेता येऊ नये, एवढाच यातील उद्देश आहे.

२ : सप्ताहात चाळीस तास गणिकेने व्यवसायासाठी खर्च केले पाहिजेत. त्यातील कमीत कमी २० तास ग्राहकाच्या सान्निध्यात घालविले पाहिजेत. उरलेले वीस तास आपले व्यवसायचातुर्य वाढविण्यासाठी आहेत. त्या काळात तिने अभिनय, नर्तन, गायन यांचा अभ्यास करावा.

३ : पर्जन्यकाळात सर्व माणसे आपापल्या घरी असल्याने व्यवसाय मंदीत असतो; पण याचा अर्थ गणिकेला सुट्टी असा घेऊ नये. त्या काळात अधिकारी व्यक्ती तिच्याकडून तिच्या व्यवसायाशी संबंधित अशी कामे करून घेऊ शकतील. खुलासा : अशा कामांची एक यादीही कर्कनीतीत दिली आहे. त्यात शासनाधिकाऱ्यांचे सहकुटुंब मनोरंजन, शासकीय प्रचारासाठी निर्माण होणाऱ्या कलापथकांत कामे करणे व दौरे काढणे, दांपत्य-विकोपाबद्दल विकोपग्रस्त दांपत्यांना सल्ला अशा गोष्टींचा समावेश आहे.

४ : 'अधिक काम करा; नेटाने काम करा; झटपट काम करा; उद्याचे काम आज व आजचे काम आताच करा; कामासाठी जादू नाही!' हा सर्वज्ञ महाराजांचा संदेश सर्व व्यवसायांना उपयुक्त आहे. मात्र गणिका-व्यवसायाच्या बाबतीत या संदेशातील 'काम' हा शब्द संदर्भानुसार पुल्लिंगीही समजता येईल.

ही कर्कनीती अमोघबुद्धीने महाराजांना अर्पण केली तेव्हा महाराज प्रसन्न झाले आणि त्यांनी कर्काला काही बक्षिसी माग म्हणून आज्ञा केली. तेव्हा कर्क म्हणाला, 'महाराज, आपण गणिका–व्यवसाय–महामंडळ निर्माण करून माझी त्याचा अध्यक्ष म्हणून नेमणूक करा, म्हणजे आपल्या सेवेचे २००० रुप्यक वेतन व अध्यक्षपदाचे ३००० रुप्यक वेतन मला मिळेल. मग पुण्यपुरीजवळील हरितक्षेत्रात माझे धवळार लवकर उभे राहील!' □

# निसर्ग बंदिस्त करणारा छायाचित्रकार

डॉ. एम्. जी. कानिटकर

फोटोग्राफी ही एक महागडी कला आहे असा समज आहे. कला मग ती कुठलीही असो, एका अर्थी महागच असते. कारण खऱ्या कलावंताचे व्यवहाराकडे लक्ष नसते. तो हिशोबी नसतो. त्याच्या कलेतच तो बुडून गेलेला असतो व तो असा एकरूप झाल्याखेरीज कलानपुण्यही त्याला मिळविता येणार नाही.

आज माझे मित्र श्री. एम्. डी. शिंदे हे एक अशा कलावंतांपैकी आहेत. संसाराचा व्याप संभाळून व्यवसायाकडे लक्ष देत असता, कलासाधना करणे, त्यात नैपुण्य मिळविणे ही गोष्ट सोपी नाही. व्यवसाय करणे सोपे– त्यात खूप पैसा मिळविणे हेही फारसे अवघड नाही– पण पैसे शिलकीत ठेवणे हे कठीण आहे. तसेच फोटोग्राफिक व्यवसायात अमाप पैसा मिळवून लौकिकसुखे मिळविणारे अनेक फोटोग्राफर आहेत. असे अनेक होऊन गेले; पण अशा वेळी कलात्मक संपत्ती मिळवून– कमवून ती शिलकीत टाकणारे फारच थोडे आहेत. निरनिराळ्या फोटोग्राफरकडून आपण आपली घरगुती छायाचित्रे काढून घेतो. आपणही घेतली असतील. काही दिवसांनी आपण या छायाचित्रकारांना विसरूनही गेला असाल; पण कलात्मक चित्रे काढणाऱ्या कलावंत छायाचित्रकारांना आपणास विसरता येणार नाही. मात्र त्याला रसिकता ही पाहिजेच व ती आपणांपैकी बऱ्याच जणाजवळ असतेच.

मला स्वतःला मी एक चांगल्या अर्थाने या कलेचा व्यसनी माणूस असल्याने या कलेसाठी वेळ, पैसा किती खर्च करावा लागतो– विशेषतः धडपडही किती करावी लागते याची जाणीव आहे; पण उत्तम चित्रे तयार केल्यावर त्यांपासून मिळणारा आनंद हा अवर्णनीय असा असतो. त्याचाही मला अनुभव आहे. कलावंताला स्वतःला तर आनंद होतोच; पण ही चित्रे पाहून इतरांना जो काही आनंद होतो त्याने या आनंदात आणखी भर पडते.

श्री. शिंदे यांचे हे प्रदर्शन आपणास असा आनंद देईल. आपण हे प्रदर्शन विसरू शकणार नाही. आपण तासाभरात हे पाहू शकाल. पुनःपुनः पहावेसे वाटेल. आपणास हे पहाताना याहून जास्त श्रम होणार नाहीत; पण ही चित्रं तयार करताना जी काही धडपड करावी लागली असेल त्याची कल्पना आपणास येणे कठीण.

बऱ्याच लोकांची कल्पना अशी की चांगली चित्रे म्हणजे महागडा कॅमेरा व विशेषतः तो जर्मन निदान जपानी असला पाहिजे. यापुढे सामान्य लोकांचे ज्ञान गेलेले नाही. तसेच छायाचित्र चांगले आले आहे, ते श्रम करून काढले आहे असे म्हटले जात नाही. कॅमेरा देशी आहे, तसेच चित्राला आवश्यक अशी फिल्म-पेपर्स हे देशी आहे, असतात असे ऐकले की अजूनही भुवया वर चढतात. लोकांना आश्चर्य वाटते. अशा या परिस्थितीत व्यवसाय संभाळून कलेचा पसारा वाढविणे सोपे नाही व असे प्रदर्शन लोकांसमोर मांडणे हेही सोपे नाही. यात कलेचा एक प्रकारे रुबाब-ऐट आहे. स्वतः रुबाबदार नसणाऱ्या-न दिसणाऱ्या-रुबाबदार परिस्थिती नसलेल्या अशा एका कलावंताच्या रुबाबदार कलेचे हे प्रदर्शन आहे. अशा काही कलावंतांनी पुण्याची शान आंतरराष्ट्रीय क्षेत्रात– या देशाचीही शान वाढविली आहे. मला स्वतःला काही वेळा वाईट वाटते की त्याची जशी जाहिरात व्हावयास पाहिजे तशी झालेली नाही. अर्थात खऱ्या कलावंतास याची फारशी काळजी–पर्वा नसते. तो अशा जाहिरातीपासून दूरच असतो. श्री. शिंदे हे एक असे आहेत.

मी त्यांना बरेच वर्षे ओळखतो. वैयक्तिक-

एम्. डी. शिंदे
यांच्या छायाचित्रप्रदर्शनाचे उद्घाटन
बॅ. अप्पासाहेब पंत
यांच्या हस्ते
पुणे येथील गंधर्वरंगमंदिरात
रविवार, १८ जानेवारी
या दिवशी होत आहे.

दृष्ट्या मला त्यांची माहिती आहे. ते अत्यंत साधे आहेत. त्यांची बसा–उठावयाची खोली, डार्करूम, स्वयंपाकघर हे सर्व काही एक आहे. साधी सायकल – तीही जुनीपुराणी लेडी सायकल आहे – याच सायकलीवरून भ्रमंती करून त्यांनी लँडस्केपस् तयार केलेले आहेत.

चित्रकाराला चांगले मॉडेल मिळणेही जरुरीचे असते. त्यासाठी पैसाही खर्च करावा लागतो. मात्र शिंद्यांचे मॉडेल हे अगदी साधे आहे – कधीही पैसे मागत नाही – की वारंवार त्रास दिल्याची तक्रार करीत नाही. ते आपणहून चित्रासाठी तयार होऊन बसलेले असते. अशा मॉडेलचा शिंद्यांनी चांगला उपयोग करून घेतलेला आहे. याही मॉडेलला मात्र मूड असतो. तो त्या त्या वेळी संभाळावा लागतो. कारण काही वेळा हें मॉडेल धुक्याच्या वस्त्रांनी लपेटलेले असते तर काही वेळा उन्हाच्या जरतारी वस्त्रांनी ऐटीत मिरवत असते, तर काही वेळा ओलेतीपणाचेही प्रदर्शन करण्यामागे असते. असे हे अगदी साधे मॉडेल शिंद्यांनी वापरले आहे. 'धरित्री' हे तिचे नाव. हे आपणा सर्वांच्या परिचयाचे आहे. ते तुम्हा-आम्हास दिसणारे स्वतःच्या सौंदर्याची उधळण करणारे असे आहे. मात्र हे सौन्दर्य पहाणारे-साठवणारे रसिक पाहिजेत.


या निसर्गात आपल्या अवती–भोवती अनेक गोष्टी टाहो फोडीत असतात की आमचे छायाचित्र करा–आम्हाला तुमच्या यंत्राने बंदिस्त करून आमचे सौंदर्य जगाला दाखवा; पण असे रसिक कान उघडे ठेवणारे व डोळे उघडे ठेवणारे पाहिजेत. तसे हे एम. डी. आहेत. ते असे कान व डोळे उघडे ठेवून या वस्तूंना संमोहित करून एका कागदाच्या तुकड्यावर त्यांना बंदिस्त करतात. त्यांच्याशी एक प्रकारे भावनात्मक ऐक्य पावतात व ते आपणास दाखवितात याची प्रचीती या प्रदर्शनात आपणास येईल.

मला शिंदे यांना सांगावयाचे आहे की व हे मी सर्वांनाच, स्वतःलाही सांगतोच की हे प्रदर्शन म्हणजे श्री. शिंदे यांच्या कलेचा एक टप्पा आहे. या टप्प्यांना शेवट नाही. कलावंताला एका जन्मातही हे टप्पे पार पाडता यावयाचे नाहीत व खऱ्या कलावंताला याची जाणीवही असते. कलेच्या धुंदीत तो अनेक टप्पे चढून जातो. त्याच्या ते ध्यानीही येत नाही. कलावंताला शेवटच नाही!

श्री. शिंदे हे तसे वयस्कर नाहीत. ते काही टप्पे चढून गेले आहेत. ते तरुण आहेत. त्यांना जोम आहे–कलेची भूक आहे. अनेक असे टप्पे चढून जातील व अशा प्रदर्शनावाटे आपणास दाखवितील. अर्थात हे प्रदर्शन भरविणे हे सोपेही नाही. फार खर्चाचे आहे; पण रसिकांच्या पाठिंब्याने हे शक्यही आहे.पुण्यातअनेक रसिक आहेत. पैकी एस. एल. किर्लोस्करांसारखे अग्रणी आहेत. त्यांचा आशीर्वाद व सक्रिय सहानुभूती त्यांच्या पाठीशी आहे व ती सदैव राहील ही मला खात्री आहे.

श्री. शिंदे यांच्या यशाचे वभव आपण पहायला आणखी पहाण्यासाठी त्यांना व तुम्हा-आम्हास परमेश्वराकडून दीर्घायुरारोग्य मिळो ही प्रार्थना.

□



॥ सोलकढी ॥

## □ शेजारी ब्रह्मदेश पाहा

आवाज ही एक विलक्षण गोष्ट आहे. ती आपल्या इतक्या निकट परिचयाची आहे की तिची विलक्षणखोरी आपल्याला फारशी जाणवत नाही. आवाजाचे एक बरे ठणठणीत असते. आवाज जसा आपण ऐकू शकतो तसा करूसुद्धा शकतो.आपल्या लक्षात आले नाही, तरी कित्येक वेळा, या दोन आवाजांचा परस्परसंबंध असतो. आपण कोणता आवाज करतो आणि ऐकलेल्या वेगवेगळ्या आवाजांचा स्वीकार कसा करतो ते आपल्या सांस्कृतिक प्रगल्भतेवर अवलंबून राहते. एखादे राष्ट्र आवाजाला कसे आणि किती मानते यावरून त्या राष्ट्राचा स्वभाव कळू शकतो. आवाजाबद्दल असेच लुटुपुटु चिंतनशील वगैरे लिहीत सुटलो तर आवाज हे मौनाचेच एक रूप कसे आहे किंवा मौन हीच आवाजाची आदि-अंतिम अवस्था कशी आहे, हे तुम्हाला याच ' सोलकढी 'त वाचावे लागेल; पण तसे काही तरी वाचायचे असले तर तुम्ही ललित–गद्य वाचता. ललित–गद्य लिहिणे ही वाटते तेवढी सोपी गोष्ट नाही बरे. त्याला म्हणे आत्ममग्न, भावमंथर, विचारविलोल, संवेदनासंकुल, चिंतनचतुर (अबबब ऽ) असे व्यक्तिमत्त्व लागते; शिवाय भाषासुद्धा म्हणे आरस्पानी, स्पंदनशील, अस्मिताविभोर, अरूपलक्षी (अबबबब ऽ) लागते. हे अबबबब–बळ अनंतरावाकडे नाही. सबब आवाजाचा आवाजवी विचार अनंतरावाने करणे वाजवी ठरावे.

आपण भारतीय मंडळी बऱ्यापैकी आवाज करू-काढू शकतो. सगळ्यांना जमत नाही ते. आवाजाबद्दल आपल्याला एक प्रकारचा आदर वाटतो. आवाज हे भारतियांना एक मूल्य वाटते. ज्याचा आवाज अधिक मोठा त्याचे सत्य अधिक खरे, असे आपण सहजच मानतो. त्यामुळे एकूणच युक्तिवादापेक्षा आपण आवाजावर अधिक भिस्त ठेवून असतो. येथे प्रत्येकजण जमेल तेवढा मोठा आवाज काढण्यात आयुष्य वेचतो. मात्र कोणाचा आवाज बंद करायची कारवाई येथे चालत नाही. न्याय, अहिंसा, लोकशाही ही आमच्या आचारविचारांची अधिष्ठात्री त्रिसूत्री आहे म्हटलं. यासाठीच सूर्यमंडळात आणि आशिया खंडात भारताला एवढे जयजयकारणीय स्थान प्राप्त झाले आहे.

नाही तर आमचा शेजारी, ने विनचा ब्रह्मदेश पाहा. ब्रह्मदेशात फक्त आपण आवाज करावा अशी राष्ट्राध्यक्ष ने विन यांची समजूत आहेसे दिसते. याला दाखला आहे. नाताळच्या रात्री काय झाले ऐका. त्या रात्री एका उपाहारगृहात जमून काही गुलहौशी मंडळी नृत्यसंगीतमय धुमाकूळ घालत होती. धुमाकूळच तो. चार भिंतींच्या आणि छपराच्या पुरचुंडीत बांधला थोडाच राहणार तो ? तसेच झाले. त्या आवाजाने ने विनला जिजवले. स्वारी संतापली. राष्ट्राध्यक्षांनी तिघांना बरोबर घेतले. त्यांच्या हातांत मशिनगन्स होत्या. ते उपाहारगृहात आले. राष्ट्राध्यक्षांनी आपल्या राष्ट्राध्यक्षीय हाताने तेथे असलेल्या एका सेनाधिकाऱ्याच्या यथास्थित थोतरीत हाणली, वाद्ये फोडून टाकली आणि राष्ट्राध्यक्षीय चरणाने ध्वनिवर्धकाला लाथ घातली. मग राष्ट्राध्यक्ष तेथून जवळच असलेल्या आपल्या महालात गेले. मग त्यांनी राष्ट्राध्यक्षीय कर्तव्य केल्याचे समाधान भोगले. मग त्यांना खास राष्ट्राध्यक्षीय झोप आली. झोपेत, राष्ट्राध्यक्षांनाच पडतात तशी स्वप्ने त्यांना पडली.

ब्रह्मदेशातला सगळा आवाज बंद करायचे आता राष्ट्राध्यक्ष ने विन यांनी मनी घेतले आहे म्हणे. असा बाहेरचा सगळा आवाज बंद करताना बहुतेक वेळा आतला आवाज नकळत बंद पडतो हे त्या शेजारच्या शरावतीच्या लेकराला आम्ही सांगायचे नाही तर कोणी सांगायचे ?

—अनंतराव

# चौ एन लाय

## ध्येयवादाला वास्तवाची जोड

वा. दा. रानडे

चीनचे पंतप्रधान चौ एन लाय यांच्या निधनाने आधुनिक कम्युनिस्ट चीनची उभारणी करणाऱ्या प्रमुख नेत्यांपैकी एक नेता काळाच्या पडद्याआड गेला ! चिनी क्रांतीचा शिल्पकार माओ असला तरी ही क्रांती यशस्वी करण्यात चौ एन लाय, चू तेह यांसारख्या सहकाऱ्यांचाही महत्त्वाचा वाटा आहे. कम्युनिस्ट सरकार १९४९ साली स्थापन झाले तेव्हापासून गेली २७ वर्षे चौ एन लाय यांनी पंतप्रधानपदाची धुरा समर्थपणे सांभाळली. सत्तास्पर्धेत त्यांच्या स्थानाला धक्का लागला नाही. गेली दीड-दोन वर्षे ते आजारी होते व स्वतः कारभार पाहू शकत नव्हते तरीही पंतप्रधानपद त्यांच्याकडेच ठेवण्यात आले यातच त्यांची थोरवी दिसून आली.

माओच्या क्रांतिकारक ध्येयवादाला क्रांतिकारक वास्तववादाची जोड चौ यांनी दिली हे त्यांचे सर्वांत मोठे कार्य. माओच्या धोरणांची, कार्यक्रमांची, नव्या साहसी प्रयोगांची अंमलबजावणी करताना त्यातला क्रांतिकारक गाभा त्यांनी कायम ठेवला; पण त्याचबरोबर वास्तवाचे भानही ठेवले. ' मोठी झेप ', ' सांस्कृतिक क्रांती ' यातील अतिरेकी प्रकार मूळ उद्देशांनाच बाधक ठरण्याचा संभव दिसू लागला तेव्हा हे अतिरेक टाळून या कार्यक्रमांना योग्य वळण देण्याचे श्रेय चौ एन लाय यांनाच द्यावे लागेल. माओ आणि चौ या दोघांचेही व्यक्तिमत्त्व आणि नेतृत्वगुण निराळ्या प्रकारचे होते. जगातील व देशातील निरनिराळ्या शक्तींचे मूल्यमापन व परिस्थितीचे विश्लेषण करून कम्युनिस्ट क्रांतीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी वैचारिक भूमिका निश्चित करणे, त्यानुसार धोरण, कार्यक्रम आणि कार्यपद्धतीची आखणी करणे, देशभर

हिंडून हा कार्यक्रम व धोरण अंमलात आणण्यासाठी जनमत तयार करणे ही माओंची कामगिरी, तर हा कार्यक्रम यशस्वीपणे अंमलात आणण्यासाठी सुसज्ज कार्यक्षम सरकारी यंत्रणा उभारणे हे चौंचे कार्य. दोन्ही कामे महत्त्वाची व एकमेकांना पूरक असून त्यापैकी एकावरच भर न देता दोहोंचा समन्वय साधल्यानेच क्रांतीच्या उद्दिष्टाच्या दिशेने प्रगती होते. क्रांतिकारक ध्येयवादास क्रांतिकारक वास्तववादाची जोड हवी ती यासाठीच.

चौ यांची दुसरी महत्त्वाची कामगिरी परराष्ट्रक्षेत्रातील. जगापासून अलग व एकाकी पडलेल्या चीनचे जगातील राष्ट्रांशी मैत्रीचे व सहकार्याचे संबंध जोडण्यात, त्यांच्याशी व्यापार व सांस्कृतिक दळणवळण वाढविण्यात चौ यांचा वाटा महत्त्वाचा आहे. क्रांतीच्या सुरुवातीच्या काळातच अमेरिकेशी सहकार्याचे संबंध प्रस्थापित करण्याचा चौ एन लाय यांचा प्रयत्न होता; पण कम्युनिझमच्या प्रसारास आळा घालण्यासाठी कम्युनिस्ट राष्ट्रांभोवती लष्करी तळांची साखळी उभारण्याचे त्या वेळी अमेरिकेचे धोरण होते. त्यामुळे चौ यांच्या प्रयत्नांना त्या वेळी यश आले नाही; पण पुढे काही वर्षांनी अमेरिकेला हे धोरण बदलावे लागले. रशिया–चीनमधील वाढत्या संघर्षामुळे अमेरिकेशी सहकार्याचे संबंध प्रस्थापित करण्याची आवश्यकता माओंनाही पटू लागली. हे संबंध सुधारण्यात चौ यांचा वाटा महत्त्वाचा होता.

असे असले तरी माओंनी चौ यांना आपला वारस कधीच मानले नाही. आपल्यासारखेच नेतृत्वगुण असलेल्या वारसाचा शोध माओ करीत होते. चौ त्यांच्या कसोटीस उतरणारे नव्हते. त्यांचे नेतृत्वगुण निराळ्या प्रकारचे होते. योग्य वारस निवडण्याच्या प्रयत्नात माओंना अजून तरी यश आलेले नाही. लिऊ शाओचि आणि लिन पिआओ या दोघांनीही त्यांची निराशा केली. लिऊ शाओचि यांच्यावर रशियन विचारांचा प्रभाव होता व रशियन पद्धतीचा कम्युनिझम ते आणू पहात होते. माओंना ते मान्य नव्हते. कारण या धोरणाने चीन रशियाच्या प्रभावाखाली जाईल असे त्यांना वाटत होते. लिन पिआओ यांनी कम्युनिस्ट पक्षाला दुय्यम लेखून लष्कराचे प्रभुत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. यातून चीन कम्युनिझमपासून दूर जाण्याचा व तेथे केवळ लष्करशाही प्रस्थापित होण्याचा धोका माओ यांना दिसू लागला. सांस्कृतिक क्रांतीची मोहीम माओ यांनी रेडगार्डस्ना हाताशी धरून सुरू केली खरी; पण पुढे ती मोहीम त्यांच्या नियंत्रणाखाली राहिली नाही. रेडगार्डस्नी कम्युनिस्ट पक्षावरच हल्ले सुरू केले. त्यामुळे पक्ष विस्कळित झाला. या अनर्थातून देशाला वाचवून कम्युनिस्ट पक्ष-यंत्रणा पुनः संघटित करण्याचे आणि त्याला पूर्वीचे स्थान मिळवून देण्याचे कार्य चौ एन लाय यांनी केले. सांस्कृतिक क्रांतीत ज्यांना अन्यायाने पदच्युत करण्यात आले, त्यांना आपल्या पदांवर पुनः प्रस्थापित करण्याच्या कामगिरीतही चौ यांचा वाटा महत्त्वाचा आहे. चौ यांच्या आजारीपणात त्यांच्या सर्व कामांची जबाबदारी सांभाळणारे पहिले उप-पंतप्रधान तेंग हसुआ पिंग त्यापैकीच एक.

लिऊशाओचि लिनपिआओ यांच्यामागोमाग चौ एन लाय यांनाहि अधिकारपदावरून दूर करण्याचा कट्टर क्रांतिकारी गटाचा प्रयत्न होता. या गटाने देशात कन्फ्यूशिअस विरोधी प्रचारमोहीम सुरू केली. तिचा रोख मुख्यतः चौ एन लाय यांच्या विरुद्धच होता. माओंची पत्नी चिआंग चिंग या गटाच्या नेत्या आहेत. माओंनी स्वतः या मोहिमेचा पुरस्कार केला नाही. कारण कट्टर व नेमस्त गटातील या संघर्षाने पक्षाच्या ऐक्यालाच सुरुंग लागेल असे त्यांना वाटले. पक्षातील फुटीचा फायदा घेऊन रशिया नेमस्तगटाला आपल्या हाताशी धरील व आपल्या निधनानंतर रशियाला अनुकूल राजवट चीनमध्ये आणण्याचा प्रयत्न करील अशी भीती माओ यांना वाटते. म्हणूनच पक्षातील ऐक्य टिकविण्यावर त्यांनी भर दिला आणि कन्फ्यूशिअसविरोधी मोहीम आवरती घेण्याच्या सूचना कट्टर गटास दिल्या.

चौ एन लाय यांच्या निधनाने चीनच्या अंतर्गत व परराष्ट्र-धोरणात काही बदल होईल काय ? माओ असेपर्यंत तरी या धोरणात बदल होणार नाहीच; पण आपल्या मागेही आपलीच धोरणे पुढे चालू रहावीत अशी जास्तीत जास्त दक्षता माओ घेत आहेत. पक्षाच्या दहाव्या काँग्रेसपासूनच नव्या पिढीच्या हाती बऱ्याच जबाबदाऱ्या त्यांनी सोपविलेल्या आहेत. नेत्याने कितीही काळजी घेतली तरी त्याच्या अपेक्षेप्रमाणे व अंदाजाप्रमाणे भावी काळातील घटना घडतातच असे नाही. पक्षाच्या दोन गटांत संघर्ष चालू राहिला तर मात्र रशिया त्याचा फायदा घेण्याची शक्यता आहे. या दोन्ही गटांना एकत्र ठेवू शकणाऱ्या नेत्याच्या शोधात माओ आहेत. त्यात त्यांना कितपत यश येते यावर पुढील घटना बऱ्याच प्रमाणात अवलंबून राहतील, आणखी काही काळानंतर यासंबंधीचे चित्र स्पष्ट होईल. □




सैबेरियातल्या यातनामय छावणीतून लेखकाने केलेल्या यशस्वी पलायनाची कथा

# जाशीयाच्या फेऱ्यात....

। लेखक : मेजर ए. डी. फ्रान्झ मस्की । अनुवाद : रवींद्र देशपांडे ।

पहिलं महायुद्ध जोरात होतं. आम्ही सुमारे तीन हजार लोक रशियनांचे कैदी झालो. ऑस्ट्रिया, हंगेरी, जर्मनी आणि तुर्की सैन्यातले लोक आमच्यात होते. रशियन इस्पितळात नुसतं पडून रहाण्याने आणि भुकेची आवाळ झाल्याने आमचा त्राण गेला होता. नंतर कामची रवानगी क्रास्नोयॉर्कच्या उत्तरेला येनिस्सी नदीच्या लगत असलेल्या मध्यसैबेरियात झाली. सैबेरियातली गुदामे आमची निवासस्थाने झाली होती. स्टेपीचा मध्यभाग होता हा. दुतर्फा असलेले संत्री आमच्यावर नजर ठेवून होते. जगाशी आमचा संपर्क राहिलाच नव्हता. इथून सुटका करून आघाडीवर सामील होण्याचे स्वप्न उराशी बाळगून होतो. त्याच दृष्टीने आम्ही आमच्या हातापायांना चालना देऊन सैबेरियात ताकद कमवत होतो. इथून सुटका म्हणजे प्रश्नच होता. विस्तीर्ण सैबेरिया आमच्यासमोर भिरभिरत होता. सैबेरिया म्हणजे आशियातलं काळंकुट्ट गूढ. इथे आवाज नव्हता. निळ्या करड्या मोठ्या पडद्यावर एखादी गोल थाळी दिसावी तसा सूर्य दिसायचा.

संत्र्यांची ओळ चित्रे विखुरलेली होती अशाच पोकळीतून स्टेपीत गडप होणं हे एकमेव आशास्थान होतं. पूर्वेला चीन, दक्षिणेला मंगोलिया आणि पश्चिमेला फिनलंड. येनिस्सीतून बोटीने उत्तरेला गेल्यास आर्टिक महासागरातून नॉर्वेला पोहोचू शकत होतो; पण त्यात धोके होते. शिवाय आमच्या साहसाने इतरांवर गदा आणायची नव्हती.

एका तुर्की ऑफिसर कैद्याकडून मी तुर्की शिकत होतो. माझ्या विचारांना त्यांनी दिशा दाखवली. बाकू बंदरात त्याचा एक तुर्की मित्र होता. त्याची खाणावळ होती. तो राष्ट्रप्रेमी होता. बाकूतून तटस्थ पर्शियात जायला तो मदत करील. चढत्या तापाप्रमाणे ही कल्पना खेळू लागली आणि डोक्यातून ती जाईना. बाकू तर दूर होतं आणि पर्शिया म्हणजे धुक्यातली निशाणी होती. तरी पण ह्या साहसाला माझं मन तयार होतं. त्या तुर्काने मला त्याच्या मित्रासाठी ओळखपत्र दिलं आणि तो मित्र कुणा तरी सुलेमानाची गाठ घालून देणार होता आणि तो सुलेमान आम्हाला मुक्त करणार होता.

बराच काळ या विचारावर घालवून अखेर एकदाचा त्याला आकार आला. सुटकेचा मार्ग तीन टप्प्यात आणला गेला. पहिला टप्पा असा की ह्या सैबेरियातल्या बंदिखान्यातून पळ काढून क्रास्नोयार्क्स येथे सुरक्षित स्थळी दडायचं. दुसरा टप्पा म्हणजे रेल्वेने क्रास्नोयार्क्समधून सैबेरिया आणि रशियातून बाकू गाठायचं आणि तिसरा टप्पा म्हणजे बाकूतून सुटका करून पर्शियात जायचं.

या प्रत्येक टप्प्यात खूप काळजीपूर्वक आणि दक्षतेने तयारी करायला पाहिजे होती आणि दैवावर हवाला ठेवायला पाहिजे होता. खूपसं नशिबावरच होतं. आशियाई लोकांप्रमाणे नशिबावर भिस्त ठेवायला पाहिजे होती. हे साहसच अपूर्व होतं. मला रशियन येत नव्हतं आणि तरीही रशियन रेल्वेमधून रशियन सैनिक आणि रशियन लोकांबरोबर कित्येक आठवडे काढावे लागणार होते. रशियन कोझॅकांचे हात तर शस्त्र परजायला आसुसलेले होते आणि रशियन न्यायालयं तर त्यांच्या कैद्यांचे काम थोडक्यात आटपत; पण हे सगळे धोके दिसत असतानाही स्वातंत्र्याची आस स्वस्थ बसू द्यायला तयार नव्हती.

आणि एक दिवस संधी गवसली. एक ज्यू बाई फळं विकण्यासाठी छावणीत आली. चांगलीच स्थूल होती लठ्ठ. 'माणसं सहृदय आणि दयाळू असतात ह्याचा प्रत्यय आला. ती बाई माझं आशास्थान बनली. मी तिच्याशी संधान बांधले. जर्मन भाषेत संभाषण सुरू झाले. ती बाई धूर्त होती. तीनशे रुबल्समध्ये ती तयार झाली आणि आमचा बेत ठरला. माझ्या एका अठरा वर्षांच्या मित्राला-वुल्फलातिनं क्रास्नोयार्स्कला न्यायचं आणि माझ्यासाठी एक वाटाड्या पहायचा. वुल्फ अगदीच कोवळा होता. चड्डीशर्टमध्ये त्याने साशा या नावाने त्या ज्यू बाईबरोबर आणि तिचा मुलगा वोलोद्याबरोबर जायचं, ही कल्पना मला एकदम पसंत पडली.

ती बाई नंतर बऱ्याच वेळा छावणीत आली. एकदा मग सगळा बेत आखला. एक म्हातारा ज्यू वाटाड्या व्हायला तयार झाला.

पण एवढ्याने सगळं झालं नव्हतं. आमच्या छावणीतल्या खाणाखुणा बदलायला पाहिजे होत्या. आमच्या कल्पनेचा सुगावा लागला तर रशियनांनी आमच्यावर कोझॅक सोडले असते. शिवाय पोलिसांना वर्दी दिली असती. रेल्वेस्टेशनावर कळवलं असतं. आम्ही सापडलो परत तर आमची धडगत नव्हती !

दर दिवशी ऑफिसर कैद्यांची मोजदाद केली जाई. दोन जर्मन सार्जंटस् आमचे कपडे घालून हजेरी द्यायला तयार झाले. अशी सर्व तयारी झाली आणि आमचा दिवस पक्का झाला. आमच्या ज्यू मदतनिसांना गावाच्या प्रमुख रस्त्यावर मिळण्याचं कबूल केलं आम्ही !



हिवाळयातली काळीकुट्ट रात्र आम्ही मुकर केली. स्टेपीतला गार वारा छावणीतल्या रस्त्यांची परीक्षा घेत होता. छपरावर पाऊस पडत होता. मी आणि वुल्फनी काळोखात डोकावलं. सारं ठीक होतं. दूरवर कुठे तरी एक कुत्रं केकाटत होतं. कोपऱ्यावरून आम्ही निसटलो. छावणीच्या भिंतीलगत सरपटत गेलो आणि मोकळ्या मैदानातून जीव मुठीत धरून पळालो. शेडच्या काळोख्या सावलीत विसावलो. अखेर आम्ही लाकडांच्या ओंडक्याआड चिकचिक झालेल्या जमिनीवर आलो. पुढे तर पाणीच साठलेलं होतं.

संत्र्यांची रांग जी आम्ही नेहमी पहात आलो होतो त्यामध्ये आणि आमच्यात दरी निर्माण झाली होती. आकाशाला संत्र्याच्या सावल्या निःस्तब्धपणे पहात होत्या. गळ्यापर्यंत कोटाच्या कॉलरी घेऊन वाऱ्याला आणि पावसाला पाठ दाखवत ते थंडपणे पहारा करत होते.

माझी छाती धडधडत होती. मोठा क्षण आला होता. स्वातंत्र्याची आस उद्युक्त करत होती व युद्धाला आव्हान होतं. एखाद्या कुत्र्याप्रमाणे मी पालथा पडलो आणि दम घेऊन ताजातवाना होऊ लागलो. हा टप्पा न संपणारा होता. पाण्यातून जाताना पाण्याच्या आवाजासरशी दगडासारखा थिजत होतो. जर का संत्र्याचं लक्ष गेलं तर तो गोळ्या झाडणार हे दिसत होतं. सावधगिरीने, दक्षतापूर्वक आम्ही पुढे पुढे सरकत होतो. आमची ही उघड बंडखोरी होती. अखेर आम्ही संत्र्यांच्या पोकळीतून सटकलो. त्या छावण्या आणि संत्री काळोखात दूर राहिले आणि आम्ही उघड्यावर आलो. वुल्फ माझ्यामागेच होता. आम्ही भरभर पावलं उचलली आणि स्टेपीत दूर आल्यावर जिवात जीव आला. जरा सुरक्षित वाटू लागलं. आम्ही थांबलो. मागे पाहिलं. आमचा पाठलाग चालला नव्हता अगर भोंगा पण झाला नव्हता. शाळकरी मुलांप्रमाणे मी आणि वुल्फनी हात मिळवले नि आनंदानं नाचलो. शत्रूंनी घेरलेल्या डोंगरातल्या लांडग्याप्रमाणे आम्ही स्वतंत्र झालो होतो.

आमचे बेत ठरल्याप्रमाणे पार पडले. गावाकडे जाणाऱ्या त्या काळ्याकुट्ट रस्त्यावर आमचे वाटाडे भेटले आणि मग सुरक्षित स्थळी आम्ही गेलो. नंतरचे काही दिवस आम्ही आमचे तोंडावळे आणि पेहराव बदलवण्यात घालवले. आम्ही ओळखू येऊ नये म्हणून खबरदारी घेणं भाग होतं. तिथल्या रहिवाशांप्रमाणे दिसण्याची खटपट करीत होतो. वुल्फ एक सुंदर मुलगा बनला आणि मी एक गरीब म्हातारा झालो,

एकदाचा तो दिवस उजाडला—सैबेरियन रेल्वेतून रशियात जाण्याचा. आम्ही दोन गट केले. ज्यू बाई, तिचा मुलगा, वुल्फ, मी आणि माझा ज्यू वाटाड्या.

कपड्यांचं बोचकं केलेलं पोतं खांद्यावर टाकून मी क्रास्नोया स्टेशनच्या विश्रामधामात आलो. प्रकाशाने स्टेशन उजळून गेलं होतं. फलाटावर तर सैनिक आणि तरुण लोक मजेत गप्पा करीत होते. ज्यू वाटाड्याने मला पोतं टाकून त्यावर बसण्याची आज्ञा केली आणि त्याप्रमाणे मी एका कोपऱ्यात पोतं टाकून त्यावर बसलो. एक पोलिस येताना दिसला आणि माझी छाती धडधडायला लागली. त्या ज्यूबाईनं ' साशा ' बोलोद्या करून हाका मारल्या आणि मुलाला तिनं टेबलावर बसवलं. पोलिसाला पाहून तिनं मुलांना चुचकारलं.

गाडी आली तशी सगळेच फलाटावर धावले. चौथ्या वर्गाच्या एका डब्यात आम्ही प्रवेश केला. मी अगदी वरचा बर्थ पकडला आणि चक्क पडून राहिलो. डब्यातल्या प्रवाशांनी मात्र सुरुवातीलाच एकमेकांची ओळख करून घेऊन डबा म्हणजे घरकुल केलं. ह्याच डब्यात त्यांना कित्येक दिवस काढायचे होते. तिकिटांचं चेकिंग झालं पण मी न बोलता तिकिट दाखवून मोकळा झालो. रात्र गेली. दिवस वर आला तरी मी उठलो नाही असं बघून डब्यातल्या प्रवाशांना जरा रुखरुख लागली; पण त्या ज्यू वाटाड्यानं सांगितलं की त्याची तब्येत ठीक नाही आणि तेवढ्यासाठीच मॉस्कोला निघालोय. तब्बल तीन दिवस मी खाली उतरलोच नव्हतो. चौथ्या दिवशी मात्र मी

खाली उतरलो आणि निवांतपणे जाऊन आलो. मग मात्र जरा धीर आला. मी कंटाळा आला की कडेच्या खोलीत जाऊ लागलो. जरा बरं वाटायचं. सात दिवस गेले आणि अखेर गाडी एकदाची चेलियाबिन्स्क या स्टेशनावर आली. सैबेरिया आणि रशियाच्या सरहद्दीवरचं हे ठिकाण. या ठिकाणी पासपोर्ट तपासले जायचे. माझा पासपोर्ट बनावट होता म्हणून मला जरा धाकधूक वाटत होती. आम्ही सारे एका शेडमध्ये गेलो. त्या ज्यू बाईनं तर कमाल केली. अक्षरशः बाजार मांडला. बाया बघून मेले त्रास देतात अशी बत्तिशी तिने चालवली. तिच्या जवळ आलेला तपासनीस पण दचकला. तिनं आपली पर्स बघितली. बॅग धुंडाळली. मुलाला धरून पिटले आणि डोळ्यात पाणी काढून ती उभी राहिली. माणूसच तो! अखेर तो चेकर तिला सोडून पुढे आला आणि गडबडीतच माझा पासपोर्ट बघितला. नंतर त्याने सर्वांना गाडीत जाण्याची अनुमति दिली. गाडीने वेग घेतला. समाराला मात्र गाडी बदलावी लागली आणि नवीन गाडी कोझॅक लोकांच्या डॉन प्रदेशातून दक्षिणेकडे धावू लागली. मी मात्र मुटकुळं करून तिसऱ्या बाकावर झोपलो. कुणाचंही लक्ष लागू नये म्हणून, भीती जरी ठाण मांडून बसली होती तरी पण काळ मात्र लवकर गेला. एक बहिरा उतारू म्हणून पंधरा दिवस सैनिकांच्या घोळक्यात त्या गाडीत काढले. आता मात्र उत्तर कॉकेशसमधून गाडी पूर्वेकडे चालली होती. गाडीतून अथांग कास्पियन समुद्र सूर्याच्या उन्हात तळपत असलेला दिसत होता. एक कोझॅक तर रंगात येऊन गात होता, 'व्होल्गा, व्होल्गा, कोझॅकांची माता' गाडी थांबली आणि आम्ही बाकूला आलो.

एथपर्यंत तरी नशिबाने साथ केली होती. केवळ नशीब म्हणूनच आम्ही येथपर्यंत येऊ शकलो. आता बाकूत स्थिर होणं आवश्यक होतं. एका खानावळमालकाला दिलेलं पत्र जवळ होतं. ते पत्र कुणा तरी सुलेमानला गाठून देणार होतो आणि तो सुलेमान बाकूतून पर्शियात जाण्यासाठी सर्वतोपरी मदत करणार होता.

आम्ही आलो तेव्हा बाकूत संध्याकाळ झाली होती. मी त्या वाटाड्या ज्यूसह त्या तुर्क खाणावळमालकाला भेटण्यासाठी गेलो; पण त्याने जेव्हा ते पत्र बघितलं तेव्हा त्याने मला बाहेर काढलं आणि तो 'पोलिस, पोलिस' करून ओरडू लागला. तो ज्यू वाटाड्या तर जीव मुठीत धरून पळाला. फारच घाबरला होता तो. मलाही हा अनुभव नवीन होता. मीही त्या ज्यू वाटाड्याचं अनुकरण केलं. रस्त्यात ती बाई मुलासह आशेनं वाट बघत होती; पण झाल्या प्रकाराने परत स्टेशनात जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. त्यांनी स्टेशनात मुक्काम करावा आणि मी सुलेमानचा शोध घ्यावा असं ठरलं. मी नवख्या शहरात होतो. शत्रूंनी घेरलेलं होतं की ज्यांची भाषा पण मी जाणू शकत नव्हतो, बोलू शकत नव्हतो आणि ज्या सुलेमानला भेटायचं होतं त्याच्या नावापलीकडे मला काहीही माहिती नव्हती; पण त्याची भेट घेणं क्रमप्राप्त होतं.

## सुलेमानच्या शोधात

मी थोडा वेळ भटकलो. रात्रीचा निवारा हवा होता. पोत्यांच्या थप्प्या आढळल्या आणि त्यामध्येच निवारा बघून ताणून दिली. ताऱ्यांचा शांत उजेड होता. गाड्यांची गडबड धांदल. आवाज नव्हता. ती रात्र फारच छान वाटली आणि झोपही लागली. पहाटे उठून गावात फेरफटका करणं आवश्यक होतं. तंद्रीत होतो. सकाळी अपेक्षेपेक्षा लवकर उठलो; पण गंमत वाटली तिथल्या रहिवाशांची. पोत्यांच्या तुकड्यांवर मांडा ठोकून रस्त्याच्या कडेला माल ठेवून ते स्थानापन्न झाले होते. घोडे, उंट, गाढवं आणि पादचारी त्यातून मार्ग काढत गर्दीतून जात होते. पूर्वेची जादू जागी झाली होती. सुलेमान इथे असलाच पाहिजे. अल्लाउद्दिनचा जादूचा दिवा सुलेमान दाखवील अशा आशेनं आणि तुर्कांच्या देशभक्तीवर विश्वास ठेवून मी परत बाकू पालथं घालायचं ठरवलं. हिंडता हिंडता मी एका तुर्की खाणावळीत प्रवेश केला. तिथला मालक लठ्ठ होता. डोक्यावर रुमाल बांधलेला होता. चेहरा हसरा होता. मी सुलेमानची चौकशी करताच तो हसला आणि म्हणाला की, ह्या बाकूत खूपच सुलेमान आहेत. मागचापुढचा विचार न करता मी त्याला पत्र दाखवलं की ज्यात नमूद केलं होतं की मी एक जर्मन अधिकारी असून रशियातून पर्शियात जाण्यासाठी मला मदत करणं हे प्रत्येक देशाभिमानी तुर्क मुसलमानाचं कर्तव्य आहे. तो तुर्क पत्र वाचून गंभीर झाला. त्यानं मान हालवली आणि तो बाहेर गेला. मी तिथेच बसलो. एका नोकरानं चहा आणि पाव आणून दिला. मी तिथेच संध्याकाळपर्यंत बसून राहिलो. जेव्हा खाणावळ बंद करायची वेळ झाली तेव्हा मला बाहेर जावं लागलं. परत मी रात्र कालच्याप्रमाणे घालवली आणि सकाळीच त्या खाणावळीत परत आलो. दुसऱ्या दिवशी तीच उजळणी झाली; पण मी चिकाटी सोडली नाही. तिसऱ्या दिवशी मी फिरून त्या खाणावळीत आलो. संध्याकाळ होऊन गेली आणि मी बाहेर पडलो निराशेने. कोपऱ्यावर गेलो असेन-नसेन तोच त्या मालकाचा मुलगा धावत धावत आला आणि म्हणाला, 'तुम्हाला सुलेमानची गाठ घ्यायची असेल तर तुम्ही उद्या इथं या आणि विचारा!' त्याने बिल्डिंग बोटाने दाखवली. पूर्व म्हणजे खरोखर जादूने भरलेली आहे.

सकाळी-सकाळीच मी त्या विवक्षित ठिकाणी आलो. बिल्डिंग बघितली. सैबेरियन रिवाजाप्रमाणे आत गेलो. एका मोठ्या खोलीतून आत आलो. झारचं चित्र, रशियन नोटिसांनी भिंती झाकळल्या होत्या आणि रशियात आहोत याची जाणीव तिथलं वातावरण देत होतं. रशियन पोलिसही असतील ह्या जाणिवेनं मी हादरलो. कारण रशियन-पोलीस किती क्रूर असतात हे मी अनुभवलं होतं.

मी एका कारकुनाच्यासमोर उभा राहिलो. हातातल्या हातात माझी फरकॅप हालवली आणि तिच्याशी चाळा करीत थबकत थबकत, अडखळत गचाळ तुर्की भाषेत सुलेमानची विचारणा केली.'

'तुम्ही तुर्क नाही?' त्या कारकुनाने शेरा मारला.

'नाही!' मी रशियन भाषेत सांगितलं.

'तुम्ही रशियन पण नाही!' परत त्या कारकुनाचा शेरा.

'नाही,' आता मी फ्रेंच भाषेत सांगितले. 'मी फ्रेंच आहे!'

'हरकत नाही. मला फ्रेंच येतं!' तो कारकून म्हणाला.

आणि मला वाटलं की मी संपलो!

परत नशिबाने हात दिला. कारण त्या कारकुनाचं फ्रेंच म्हणजे रात्रपाळी करणाऱ्या स्पॅनिश वॉचमनसारखं होतं. त्यानं मला टेलिफोनकडे नेलं आणि म्हणाला की, फ्रेंच जाणणारी युवती आता टेलिफोनड्युटीवर आहे. तिच्याशी बोला! सगळे कारकून काम सोडून

माझ्याभोवती गोळा झाले होते. मी कसा बोलतो याची उत्सुकता त्यांना लागली होती. शाळेमध्ये जे काही फ्रेंच शिकलो त्याची उजळणी करून मी प्रत्येक शब्द उच्चारला; पण फोनवर हास्याचा फिसफिसाट झाला आणि एक बाई हसत हसत म्हणाली की, तुम्ही फ्रेंच नाही आहात; पण थांबा, मी पाच मिनिटांत येतेच !

मी थांबलो. थांबण्यात मी हुषार होतो; पण अशा विचित्र मनःस्थितीत वाट पहात थांबणं ही किती चमत्कारिक गोष्ट आहे ह्याची प्रचीती येत होती. दोन बायका आल्या. एक आई होती आणि दुसरी तिची मुलगी. त्यांनी मला आल्याआल्या ऑफिसमधून व्हरांड्यात आणलं. त्या फारच मोठ्याने बोलत होत्या. ती मुलगी मला पहाताच म्हणाली, 'युद्धकैदी आहात ? जर्मन ?'

त्या मुलीच्या डोळ्यांत बघितलं आणि नाकारण्यात अर्थ नाही असं बघून कबुली दिली. त्या मुलीनं माझ्या हातात चिठ्ठी दिली आणि सांगितलं की त्या पत्त्यावर जा आणि त्या दोघी निघून गेल्या.

त्यांनी सांगितलेल्या पत्त्यावर मी आलो. रस्त्याच्या मागील बाजूचं घर होतं. मी दार वाजवलं आणि मला आत घतलं गेलं. मी आरामसे बसलो आणि माझ्यासमोर त्या दोन बायका होत्या. फ्रेंच येणारी सुलेमानांची मुलगी होती. पूर्वेत खरंच जादू भरलेली आहे. मी कुठे होतो ? प्रत्यक्ष सुलेमानांच्या घरी! त्यांनी चहा दिला. मला आत्मविश्वास आला आणि आशा वाटू लागली. मिस्टर सुलेमानांनी खूप दिलासा दिला. कपडे दिले आणि मदतीचं आश्वासन दिलं. त्यांच्याच मुलीनं स्वित्झर्लंडमध्ये फ्रेंच अवगत केलं आणि ती तर माझ्या डोळ्यांत बघत होती. दुसऱ्या दिवशी बाकू-बंदरात जायचं होतं. सुलेमान सारं काही बघणार होते.

असं काही घडेल असं मला पण वाटलं नव्हतं. रात्र पडण्यापूर्वीच मी स्टेशन-वेटिंगरूममध्ये आलो. ती ज्यू बाई कोपऱ्यात होती आणि तिच्या कुशीत वोलोद्या होता. पिलांना जपणाऱ्या एखाद्या कोंबडीसारखी दिसत होती ती. मी खूण केली. ती ज्यू बाई उठून उभी राहिली. मग पांघरुणातून वुल्फने डोकं वर काढलं. प्रवासातील भीतीने त्या बिचाऱ्याने दिवस-रात्र कशा काढल्या असतील तेच जाणवत होतं. मला बघून त्याला आनंद झाला होता. त्या ज्यू बाईचा निरोप घेताना आम्हाला वाईट वाटत होतं. ती किती धीट, साहसी आणि अंतःकरणाने निर्मळ होती याचं प्रत्यंतर आम्हाला आलेलं होतं.

**रशियाचा निरोप**

वुल्फ आणि मी जेव्हा बंदरात आलो तेव्हा सुलेमान आणि इब्राहीम तिथे होतेच. हा इब्राहीम आम्हाला कास्पियन समुद्रापासून पर्शियन किनाऱ्यापर्यंत सोबत करणार होता. हाडापेरांनी मजबूत असलेले लोक उघडचावाघड्या अंगांनी गाठी जहाजावर चढवण्याच्या कामात व्यग्र होते आणि जकात-अधिकारी त्यांच्यावर लक्ष ठेवत टिपून घेत होते. जहाज पर्शियाला जाणार होतं. इब्राहिमने जादूचा पासवर्ड उच्चारला आणि त्याच्यापाठोपाठ आम्ही बोटीवर चढलो. बोट निघस्तोवर आम्ही आडोशाला होतो. इंजिनं धडधडली आणि बोट थरथरली. पाणी कापीत जेव्हा बोट निघाली तेव्हा आम्ही डेकवर आलो. किनारा तर प्रकाशाने उजळला होता आणि त्यापलीकडे असलेल्या अंधाराला तेलाच्या विहिरीतून येणाऱ्या ज्वाळांमुळे तडे जाताना दिसत होते. आम्ही रशियाचा निरोप त्या अखेरच्या दर्शनाने घेतला.

बोटीचं नाव ओडिसिस ऐकून शाळेत शिकलेल्या होमरच्या कविता आठवल्या. पुन्हा घरी येण्यापूर्वी ओडिसिसला कोणत्या हालअपेष्टांतून जावं लागलं ते समोर आलं.

प्रवासात दुसऱ्या दिवशी आमची बोट कुरा नदीच्या मुखाशी आली आणि आम्हाला उतरावं लागलं एका गावात. रस्त्यात शुकशुकाट होता; पण रशियन कोझॅक मात्र नदीत आपल्या घोड्यांना पाणी पाजीत होते. एका झोपडीत आम्ही इब्राहिमची वाट पहात बसलो. बरेच तास वाट पाहिल्यावर तो आला. त्याच्याचबरोबर निघालो. गावापासून दूर आल्यावर आम्ही एक वाहन घेतलं. इब्राहिमबरोबर एक नवखा इसम होता. ते दोघं पुढे बसले व आम्ही मागे बसलो. भरधाव निघालो.

रस्ता कापसाच्या शेतातून जात होता. सरहद्दीवरचे रक्षक असलेल्या कोझॅकांनी ती शेतं व्यापली होती. संध्याकाळी आम्ही अशाच एका शेतापाशी आलो. एक माणूस आमची वाटच पहात होता. त्याच्या काळ्याभोर डोळ्यांत तेज होतं. डोक्यावर केसाळ टोपी होती. कमरेला पट्टा होता. काडतुसांचा पण साठा होता त्याच्यापाशी. गळ्यात लटकती बंदूक होती. त्याच्या पायांशी शिकारी कुत्री घोटाळत होती. त्या नवख्या माणसाने त्याच्याकडे बोट दाखवून सांगितले की हा हुसेन. माझा नोकर, मित्र आणि तुमचा मदतनीस. माझी शेतीवाडी आणि घर तोच बघतो. मी त्याला माझी नवी हॅट उंचावून अभिवादन केलं. रात्रीकरता गोधड्या आणल्या आणि मग चहा-पाव दिला.

दुसऱ्या दिवशी त्यांनी शेतावर नेलं. संध्याकाळी तीन तार्तर आले


**पॅपिलॉन**
**पॅपिलॉन**

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

हेच तार्तर आम्हाला पर्शियात घेऊन जाणार होते. त्या शेतकऱ्याने सरहद्दीवरच्या जिल्ह्याचा नकाशा काढला. जवळची वाट दाखवली. मुगान्स्टेपीतल्या वाट नसलेल्या प्रदेशातून निघून काळ्या पर्वताकडे जायचं आणि नंतर ४८१३ मीटर्स उंचीवरील सॅवेलॉन गाठायचं. तिथेच मेशगिन नावाचं पर्शियन खेडं पायथ्याशी आहे. तिथला प्रमुख सुलतान सरगम याची भेट घेतली की पुढची काळजी नाही असं त्यांनी सांगितलं.

आम्ही रात्री निघालो. काळ्याशार जमिनीवरील आकाश मात्र चांदण्यांनी उजळलं होतं. मंदसा वारा होता. बंदूकधारी हुसेन कुत्र्यांसह पोचवायला आला होता. आम्ही निरोप घेतला त्याचा आणि या जगातल्या आढळणाऱ्या शेवटच्या घराचा. पहाडी प्रदेशात पुढे असं घर दिसणं अशक्य होतं. गवताळ भागात उभ्या असलेल्या गाडीतून पुढचा प्रवास सुरू केला. घोडे बेफाम धावत होते. आम्ही पुढे पश्चिमेकडे वळस्तोवर कुणीच बोललं नाही. एकामागोमाग एकेक चांदणी लुप्त होत होती. गाडी चाललीच होती घरंगळत आणि हिरव्या सावल्या दिसत होत्या. गाडीमागे कोल्हे लागले होते. रात्रीची शांतता गेली. कुत्रे भुंकत होते. प्रकाश आला. गुरं चरायला आली आणि माणसं दिसू लागली. आमच्या तार्ताराने खिशातून पिस्तुलं काढली आणि बार काढले मोठ्यांदा आवाज करून. त्याचा परिणाम असा झाला की लोकही दिसेनासे झाले.

सकाळी गाडी थांबली. तार्तरांनी पाव दिला आणि आम्ही खाऊन घेतलं. दिवसा सरहद्दीवरचे कोझॅक इथून चकरा मारतात म्हणून लपणं भाग आहे. त्याप्रमाणे आम्ही केलं आणि संध्याकाळी परत निघालो. सकाळी परत एका खेड्यात मुक्काम टाकला. मातीचीच खिडक्या नसलेली घरं होती; पण तिथल्या तार्तरांनी मनापासून मदत केली. रात्र पडण्याच्या सुमारास एक जण आमच्या झोपडीत आला. आम्ही घाबरलो; पण विशेष काही घडलं नाही. तो जरा कुजबुजत होता त्यावरून आमचा भलताच ग्रह झाला.

रात्रीचा फायदा घेऊन पर्शियन सैनिकांनी गवताळ डोंगरावर नेलं. मधे नदी होती. पाणी खळखळ करीत वाहत होतं. रशिया आणि पर्शिया यांची सरहद्द भिडली होती. त्या सैनिकाने पाठुंगळी घालून आम्हाला पलीकडे नेलं.

अल्लाच्या निःसीम भक्तांनी दास्यशृंखलेतून मुक्त व्हायला मनापासून मदत केली होती. रशिया मागे राहिला होता; पण तिथलं जीवन आणि तिथल्या अडचणी आणि घडलेले प्रसंग आमच्या स्मृतीत राहाणारे होते. रशियाने पर्शियातल्या ताकदीचं सैन्यात रूपांतर करून पर्शियातली मोठी शहरं आणि उत्तर पर्शियातले खुष्कीचे मार्ग पादाक्रांत केले आहेत ही गोष्ट मात्र आम्हाला अज्ञात होती.

काही आठवडे आमची सतत भटकंती चालली होती. पर्शियातले तार्तर-रहिवासी मात्र आम्हाला एका खेड्यातून दुसऱ्या खेड्यात जायला तत्परतेने मदत करीत होते. हे तार्तर्स तुर्कीच बोलत असल्याने मी बरंच काही समजू शकत होतो. एक दिवस आम्हाला डोंगरांची रांगच्या रांग समोर दिसली. हेच ते काळे डोंगर त्या शेतकऱ्याने नकाशात दाखवले होते.

त्या डोंगराच्या जवळ येण्यापूर्वी आम्हाला एक छोटसं खेडं लागलं. इथं काही नवखे लोक आम्हाला दिसले. ते काहीसे पहाडी आणि काहीसे योद्धे दिसत होते. ते शस्त्रसज्ज होते. आपल्या टोळ्यांकरता लागणाऱ्या गरजेच्या वस्तू खरेदी करण्यासाठी ते आले होते. त्यातली दोन चमत्कारिक भाषणारी माणसं इथून पुढचे वाटाडे म्हणून पुढे आले. अंधार असतानाच त्यांच्या दोन घोड्यांपैकी एकावर सामान लादलं त्यांनी. ते दुसऱ्या घोड्यावर बसले आणि आम्हाला त्यांनी मागं यायची आज्ञा केली. आम्ही पायीच भरभर त्यांच्या पाठोपाठ निघालो. डोंगराळ आणि ओबडधोबड देशातला तो मार्ग म्हणजे अजब चीज होती.

सूर्य माथ्यावर आला आणि आम्ही थांबलो. इतके दमलो होतो की आम्ही जमिनीवर उताणे पडलो. एका वाटाड्यानं त्याची बंदूक शेजारी टाकली आणि दुसऱ्यानं आमचे खिसे चाचपून सर्व वस्तू बाहेर काढल्या. अगदी हसतहसत. आम्हीही हसलो. अल्लानंच शिकवलं नाही का की माणसानं कुठल्याही चीजवस्तूंची अभिलाषा धरू नये म्हणून. कंपनीच्या सुखासाठी काहीही घेण्याचा आमच्या वाटाड्यांना हक्क होताच. हे जेव्हा आम्ही समजूनउमजून जाणलं तेव्हाच आमचा मार्ग सुकर झाला. डोंगराची चढण आता उंच आणि विकट होती. त्या दोन घोड्यांच्या मागे आम्ही पायीच ती पाऊलवाट तुडवीत चालू लागलो. त्या दोन साथीदार वाटाड्यांना सोडून चालणार नव्हतं. कठीण होतं; पण आम्हाला त्याशिवाय इलाजच नव्हता. रात्र झाली तेव्हा आम्ही सर्व एका पांघरुणात शांत झोपलो. सकाळ झाली आणि परत आमच्या नशिबी महाखडतर प्रवास आला.

## पत्राचा परिणाम

आमच्या वाटचालीत थोड्याच वेळात आम्हाला डोंगराळ भागात दूरवर गडबड आढळली. शेळ्या-मेंढ्यांचे कळप गवतात चरत होते. गाढवं पण होती. उंट पण दृष्टीस पडत होते. थोड्याच अवकाशात काही घोडेस्वार ओरडत-आरडत बंदुका सरसावून धावत आले. त्यांच्या तावडीत सापडल्यावर त्यांनी कसून झडती घेतली आमची. आम्ही गरीब, बावळट आणि अगदी विनोदी दिसत होतो की ते पहाडी टोळीवालेसुद्धा पोट धरधरून हसले. आमचे वाटाडे ज्या जमातीचे होते त्यातलेच ते घोडेस्वार निघाल्यामुळं त्यांच्या मागोमाग आमची वरात निघाली. त्या टोळीवाल्या बायकांच्या उन्हाळ्यातील शिळोप्याच्या गप्पा चालल्या होत्या आणि त्यांच्यातील आनंदी आणि उत्साही वातावरणाचा आमच्यावर पण परिणाम झाला. थट्टामस्करी करीत ओरडत त्या टोळीने आम्हाला एका खेड्यात आणलं. सगळीकडे तंबूच होते आणि त्या टोळीचा नायक खानसाहेब त्याच्या हवाली आम्हाला केलं. खाली वाकून मी त्याला अभिवादन केलं आणि माझ्या माहितीचं त्या तुर्की कैदीऑफिसरनं दिलेलं पत्र पुढं केलं. खानसाहेबानं ते पत्र पुढून-मागून-बाजूनं अगदी उलटंसुलटं करून नीट न्याहाळलं. त्याला वाचता येत नव्हतं; पण त्या पत्राचा इष्ट तो परिणाम झाला. त्या टोळीवाल्यांचं निशाण वाऱ्यानं फडकत होतं. तिथल्याच तंबूत आम्हाला नेण्यात आलं. मेजवानीचा काही तरी बेत दिसत होता. एका भल्यामोठ्या थाळीत भाताचा डोंगर रचला होता आणि त्यावर मटण होतं. खानाने ह्या सुग्रास मेजवानीची सुरुवात केली. प्रत्येकानं यायचं. आपली ओंजळ खुपसून घ्यायचं आणि खायचं. आम्हाला पण बोलावलं; पण आमची फजिती झाली. आम्ही आमचे हात त्या कढत भाताच्या राशीत खुपसले; पण भात

हातात राहातच नव्हता. ते सारेच हसत होते आम्हाला. शेवटी एकदाचा तो भात संपला. कारण सर्वांचेच भुकेलेले हात त्याच्यावर पडले होते. मेजवानी समाप्त झाल्यावर सगळे चटईवर गोलाकार बसले. मधेच मांडी घालून त्या गोलात दाढी वाढलेले रफियन्स होते. त्यांच्या पुढयात हुक्का होता. झुरके ओढून झाल्यावर हुक्का पुढच्या माणसाकडे सरकवला जात होता. ही संधी साधून आम्हाला माणसं आणि घोडे पाहिजेत मेशगिनपर्यंत जाण्यासाठी म्हणून गळ घातली. खानानं आकाशाकडं उंच हात केला. जणू काही तो प्रार्थना करीत होता. 'तुम्हाला जे पाहिजे ते अल्ला देईल!' खानाच्या त्या वाक्यानं आशा दुणावली. अल्ला आमच्यासाठी घोडे पुरवणार होता. हळूहळू एक-एक जण झोपण्यासाठी गेला. शेवटी आम्ही पण तंबूतल्या जाडजूड गालिचावर ताणून दिली. गाढ झोपेत होतो. मध्यरात्रीचा सुमार होता. अधनंमधनं मला लोटत असल्याचा भास होत होता. माझ्या शेजारी मऊमऊ आणि उबदार कुणी तरी होतं. अर्धवट झोपेत जेव्हा शेजारी झोपायला कोण आलं असावं याचा विचार करू लागलो तेव्हा लक्षात आलं ते खानसाहेबांच्या सुंदर बायकोनं मेजवानीनंतर केलेलं गोड स्मित. खरंच ती आली असली पाहुण्याचा समाचार घ्यायला तर किती मजा होईल अशा विचारानं मी हात टाकला आणि बाप रे! शेजारी एक कुत्रा झोपला होता. तो पिसाळून उठला आणि माझं पोट तुडवून गेला! मध्यरात्री त्या प्राण्यानं असा चांगलाच तारतर ज्योक केला. मी माझा ओव्हरकोट घट्ट घातला; तरी पण थंडीनं काकडत होतो. बाहेरचं जग तर थंडीनं गोठलं असावं. जरी हे असं झालं तरी पण मी हसत निद्रादेवीच्या आधीन झालो.

सकाळीच काही तारतरांनी तीन उमदे घोडे तंबूपाशी आणले. मी माझा फरकोट घातला घोड्यावरून जायचं म्हणून; पण आमचं दुर्दैव! एकावर खान चढला आणि त्याच्या दोन बायका दुसऱ्या दोन घोड्यांवर बसल्या. त्यांच्यामागोमाग पायी जायचं नशिबी आलं! या सगळ्या प्रकारावर मी तीव्र नाराजी प्रकट केली.

आम्हाला मेशगिनला जायचं होतं. मी हे खानाला सांगण्याचा यत्न करीत होतो; परंतु खानाने ते फेटाळून लावलं. उलट तो साहेबखानच्या तबूकडे चलावं म्हणून जाऊ लागला. ही चूक होत आहे म्हणून मी जोरजोराने सांगू लागलो तर त्याला तो अपमान वाटला. मग मात्र आम्ही मुकाट्याने त्यांच्या मागून जाऊ लागलो. दूरवर जिथं काही तबू होते आणि धूर दिसत होता ती साहेबखानची वस्ती त्याने दाखवली. संध्याकाळ झाली होती. खान आम्हाला तिथेच सोडून परत फिरला.

ते ठिकाण दूर होतं. तिथं जायला निघणं कठीण होतं. पर्शियात रात्र फार लवकर पडते. समजूनच येत नाही. रानटी लोकांप्रमाणे त्या करड्या जमिनीवर भाकरीची तजवीज करण्याच्या मागे लागलो. कपारीतच जागा बघितल्या आणि पहुडलो. नंतर कीव करावी अशीच परिस्थिती होती. जग सारं रिकामं होतं. लांडग्यांनी आम्हाला शोधून काढलं असतं तरी त्याचं काही वाटलं नसतं.

जेव्हा उजाडलं तेव्हा आम्ही उठलो. जड पायांनी रात्री जिथून धूर दिसत होता त्या साहेबखानच्या वस्तीकडे निघालो. साहेबखानच्या वस्तीच्या खाणाखुणा दुरून दिसत होत्या. रुंद डोंगरमाथ्यावर साहेबखानची वस्ती होती. वस्ती म्हणजे गोलाकार तंबू. आस्तेकदम वाटचाल चालली होती आमची. थोड्याच वेळात नजीक येताच कुत्री धावून आली आणि लोक गोळा झाले. पहाडीच लोक ते. एक म्हातारा फकीर पुढे आला. छातीला, डोक्याला आणि तोंडाला हात लावून मुसलमानी पद्धतीने त्यांनी आम्हाला अभिवादन केलं आणि त्याच पद्धतीने आम्ही त्याला नमस्कार केला. आमचं पत्र बघितलं आणि त्यानं आमचं स्वागत केलं.

साहेबखान वस्तीवर नव्हता. त्याच्या वस्तीवर ज्या टोळींनी हल्ला केला होता त्याचा वचपा काढण्यासाठी तो मोहिमेवर गेला होता. कदाचित तो दोन-तीन दिवसांनी येईल किंवा महिना दोन महिनेसुद्धा लागतील. अल्लाच्या कृपेने तो लवकर यावा म्हणून फकिरानेच प्रार्थना केली. तो येईस्तोवर रहावं म्हणून त्याने विनंती केली.

विश्रांतीची आम्हाला जरूर होती. लोक दयाळू होते. आमच्या पायांचे तळवे सोलून निघाले होते. त्यांनी आम्हाला तेल आणि फडकी पुरवली. आमचे पाय बांधले आणि बरं वाटलं. आम्ही बोलावं म्हणून त्यांचा आग्रह चाललेला होता. लोक आमच्याभोवती गोळा होते. युरोप कसा आहे, धर्म, लोकांच्या चालीरीती वगैरेबद्दल त्यांना जिज्ञासा होती. महायुद्धाविषयी त्यांना कल्पना नव्हती. काहीशा पुसट अफवा तेवढ्या त्यांच्यापर्यंत आल्या होत्या. त्यांच्या भागात असा कुणी नवखा इसम आलाच नव्हता. जगापासून ते असे अलग पडले होते. बाहेरच्या जगाशी संपर्क साधणारे रस्ते अगर मार्ग किंवा साधनं त्या डोंगराळ भागात नव्हती. आम्ही जे सांगितलं त्यामुळे त्यांना आनंद झाला. आमच्या गोष्टींवर तर ते लहान मुलांसारखे हसत होते.

हे जीवन सुखाचं होतं. भरपूर चहा, खाणंपिणं आणि यावर हुक्का पण देत असत. सारखे आम्ही तंबूतून बाहेर येऊन त्या डोंगरांकडे पहात असू. थाळीसारखा गोल सूर्य त्या डोंगरावर आग ओकायचा आणि दूरवरच्या हिमाच्छादित टेकड्यांवरील हिम उजळून निघायचं. लोक धार्मिक होते. रोज नमाज पढायचे. ह्या पहाडी लोकांना देव किती जवळ होता. संध्याकाळी जेव्हा तो फकीर नमाज पढे त्या वेळी अल्लाचाच जणू प्रतिध्वनी उमटे. देव मोठा आहे. त्याच्याशिवाय दुसरा मोठा कुणी नाही!

त्या दऱ्याखोऱ्यांतून शेळ्या-मेंढ्यांचे कळप घराकडे येत. उंट जाताना मजेशीर दिसत. घोडेस्वार तर बंदुका सरसावून मजेत डोंगरमाथ्यावर जाऊन येत. शांत जीवन आणि मनोभावे प्रार्थना हे चित्र आजही गजबजल्या शहरात आठवतं.

दिवसांमागून दिवस जात होते. खानची वाट पहात थांबलो होतो. वुल्फ विनोदाने म्हणाला की इथेच रहायची पाळी येते की काय. एक मुलगी पत्करायची. एक तंबू उभारायचा आणि खांद्यावर बंदूक घेऊन फिरायचं. दोन हात करायची तयारी ठेवायची. एक दिवस खानसाहेबांच्या टोळीवर एका टोळीनं हल्ला केला तर खानाचे टोळीवाल्यांनी खूप मर्दुमकी केली आणि हल्ला परतवला. आम्ही ते तंबूतून पाहिलं.

इथून जाण्यासाठी आम्ही उतावीळ होतो. फकिरानं ते जाणलं. त्या फकिराला माझा फरकोट आवडला होता. मी तो त्याला द्यायचं कबूल केलं; पण मार्गावर लागणारी मदत त्याने करावी अशी त्याला

विनंती केली. ती त्याने मानली आणि जाताना काही सूचना केल्या. प्रवास सुखकर व्हावा म्हणून इथल्या पद्धतीने केस कापावेत असे त्याने सुनावले. त्याची अंमलबजावणी पण केली. आमच्या कानांवरचे केस तसेच राहिले आणि मानेवरती रुळणारे केस त्यांनी कापले. आम्ही एकमेकांकडे पाहून हसलो. आता आम्ही युरोपियन्स काही दिसत नव्हतो.

त्या फकिराने एक नवा वाटाड्या आमच्या दिमतीला दिला. अंधार पडल्यावर आम्ही तंबूतून बाहेर पडलो. माझा फरकोट मागे ठेवला. थोड्याच अंतरावर तो वाटाड्या भेटला. आमची वाटचाल सुरू झाली. जग काळोखात बुडलं होतं. कमालीची शांतता होती. एक पांढरी चंद्रकोर वरून बघत होतो. खाद्यपदार्थांचं एक छोटंसं पोतं पाठीवर टाकून आमचा वाटाड्या चालला होता. त्याच्या सावलीत आम्ही चाललो होतो. तास अन् तास चाललो. चांदण्यासुद्धा पश्चिमेकडच्या निळ्या आकाशाकडे झुकल्या होत्या. एकाएकी आम्ही थांबलो. आम्ही आता दरीत होतो आणि डोंगरावर दोन्ही बाजूंना ज्वाळा दिसत होत्या. शांतता भेसूर वाटत होती. वाटाड्या चाणाक्ष होता. तो कुजबुजला, 'यातून मार्ग काढलाच पाहिजे. आवाज करू नका!' आम्ही वेग वाढवला; पण त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. डोंगरातला गलका वाढला आणि त्याचा प्रतिध्वनी भयानक होता. रात्र भीतिदायक होती. मागून आमच्यावर गोळ्या झाडल्या गेल्या. काळोखात कुणी तरी आमच्यावर ओरडलं. सगळ्या बाजूला माणसं होती. त्यांनी आम्हाला घेरलं आणि काठ्यांनी बडवलं. खाद्यपदार्थांचं पोतं पोटाशी दडवून आमचा वाटाड्या झोपला; पण ते हिसकलं गेलं. माझा कोट फाडला गेला आणि एकानं बूट पण काढले. वुल्फचीही तीच गत झाली. पाहिजे ते मिळाल्याने लोक पांगले. आम्ही आता फक्त शर्टात होतो आणि अनवाणी होतो. खाद्यपदार्थ गेल्याने आमचा वाटाड्या हताश झाला होता. भीतीमुळे आम्हाला पुढची वाट धरणं अपरिहार्य होतं. दगड टोचत होती. वुल्फ तर म्हणाला की ह्या त्रासापेक्षा मरण परवडलं. तापदायक आणि त्रासदायक अवस्थेच्या प्रार्थनेत रात्र संपली. पहाटे आम्ही नदी वहात असलेल्या रुंद दरीत उतरलो. आमच्या वाटाड्याने लगेच सांगितलं की एका खेडेगावानजीक आलो आहोत. अजून ह्या जगात खेडेगावं आहेत! केवढा आधार वाटला! शेवटी आम्ही त्या खेड्यात दाखल झालो. एका झोपडीबाहेर आम्ही पडलो. आम्हाला झोप लागली. उठलो तेव्हा सकाळ संपली होती. लोकांनी आम्हाला फाटकेतुटके कपडे पुरविले. चामड्याच्या चपला दिल्या.

मेशगिन अजून दूर होतं. दिवसा लोक आम्हाला मदत करत होते, एका खेड्यातून दुसऱ्या खेड्यात जायला. उंटाच्या काफिलांत आम्ही सहभागी होत होतो. कधीकधी गाढवावरून जाणारे महाभागही आम्हाला घेऊन जात होते.

अशी खडतर यात्रा करून आम्ही मेशगिनला आलो. संपलं एकदाचं, असं आम्हाला वाटलं. सरगम सुलतानला भेटलं की झालं. त्याच्या घरापाशी आलो; पण आमच्या आशा धुळीला मिळाल्या होत्या. आम्हाला उशीर झाला होता. सरगम अगोदरच गेलेला होता. तुर्की आणि जर्मन फौजा रशियाशी सामना देत होत्या तिकडेच सरगम गेला होता. काय करावं या विचारात आम्ही बसलो. त्याच्याशिवायच जाणं भाग होतं. मोठ्यांकडून क्वचितच मदत मिळते. सरतेशेवटी स्वतःच्या हिंमतीवरच अवलंबून रहावं लागतं. दुःखं आणि यातना माणसाचं मन पोलादी बनवतात.

फिरून आमचा प्रवास सुरू झाला. नदी, नाले आणि टेकड्या. जी खेडेगावं आढळली ती गरिबीनं गांजलेली. भीक मागणं हेही ओघानं आलं. आम्ही निवाऱ्यासाठी जरी विनंती केली तर आम्हाला हाकलून देण्यात येई आणि परिणामी आम्हाला कुठल्या तरी शेतात पडावं लागे रात्रीचं.

पायवाटेवर तर उंट आणि गाढवं ओझ्याखाली दबून गेलेली दृष्टीस पडायची. गिधाडं तर मांस मिळवण्यासाठी तुटून पडलेली दिसायची आणि घाण वास यायचा. टेकड्या तर एकामागून एक पुढे यायच्या. नेटाने सुरू केलेल्या प्रवासास आता आशा नव्हती. केवळ जर्मनीला जायचं आणि मायदेशाची सेवा करायची ह्याच इच्छेने आम्ही पुढे जात होतो.

शेवटी आम्ही पर्शियातल्या अचेर नावाच्या गावी आलो. एका धर्मशाळेत आम्ही खूप दिवस राहिलो. इथेच आम्हाला एक नवीन सोबती भेटला गुलाम हुसेन आगा म्हणून. तरुण होता शिवाय साहसाची त्याला आवड होती. इथूनच आम्ही टॅब्रीझला जायचं ठरवलं. गुलाम तयार होता. काळी उंच टोपी, हिरवं कापड आणि ब्रासची बटणं असा त्याचा पेहराव होता. त्याचं सरळ नाक त्याच्यातली जिद्द दाखवत होतं. टॅब्रिझला सहा दिवस लागणार होते आणि वाटचालीत तो पुढे होता. गावं तुरळक होती. लोकवस्ती पण खूपच होती. कुठे चाललात म्हणून विचारणा व्हायची. 'टॅब्रिझला रशियन आहेत! जाऊ नका!' असा सल्ला मिळायचा. तिथंच जायला हवं. त्रास आमच्या नशिबीच होता. अल्लाची कृपा म्हणून आम्ही जात असू. अखेर आम्ही टॅब्रिझला आलो. टॅब्रिझच्या मोठ्या रस्त्यावर धूळ होती आणि तिथला जर्मन कौन्सिलर तिथे नव्हता अशी गुलामाने पर्शियनांच्याकडून माहिती काढली. क्षणार्धात परिस्थितीची कल्पना आली. टॅब्रिझवर रशियनांचा ताबा होता. अमेरिकन कौन्सुलेट जर्मनांची देखभाल करीत असल्याचे ऐकून आम्ही तिकडे वळलो. पाहुण्यांच्या खोलीत होतो. प्रथमच आमच्या कानांवर जर्मन शब्द आले. केवढा आनंद झाला! जर्मन कौन्सिलरची बायको बोलत होती. रशियनांच्या येण्यामुळे जर्मन कौन्सिलर निघून गेल्याचे तिने सांगितले. आम्ही आमची कहाणी ऐकवली. रशियनांनी हा प्रांत घेतला असल्याचे तिने सांगितले. तीही कैदीच पण तिने प्रत्येकाला ओंजळभर नाणी दिली आणि सांगितलं, 'त्वरा करा आणि निघून जा!' गुलाम बाहेर थांबला होता. त्यानेच आमच्याकरता पुढचा प्रवासाचा बेत ठरवला. आता आम्ही श्रीमंत होतो. लोकांना पाठवून आम्ही कपडे, बूट आणि प्रत्येकासाठी पायघोळ झगा आणला. हॅट्स् घेतल्या.

टॅब्रीझच्या मुख्य रस्त्यावर रशियन्स असल्याने आम्ही तो सोडला. एक बग्गी केली आणि आम्ही आडवाटेने निघालो. बग्गी जोरात निघाली. मजा वाटली. पहिल्या मुक्कामात आम्ही जिथं थांबलो तिथं मध्यरात्र झाली होती. आम्ही चहा घेतला. बग्गी सोडली आणि घोड्यांवरून निघालो. आता चढण होती. चंद्राच्या प्रकाशात दूरवरची पर्वतशिखरं दिसत होती. घोड्यावर बसायला मिळणं हेच स्वर्गसुख आहे म्हणणाऱ्या मिर्झा स्कॅपीची आठवण झाली. थोड्याच काळात

आम्हाला याचा सराव झाला. एका नदीवर बांधलेला छानसा पूल आम्ही ओलांडला. आमच्या वाटाड्याचा त्याच्या घोड्यावर विश्वास होता. अरुंद रस्त्यावरून तो घोडा व्यवस्थित चालला होता. समोर पर्वतांची एक आडवी रांग दृष्टिपथात आली. एक जरी चुकीचं पाऊल पडलं तरी सारं संपणार होतं. आमचे पाय थरथरत होते तर घोडे मात्र खडकाळ रस्त्याला कंटाळले होते. हळूहळू रस्ता मोठा होत चालला होता. आम्ही सर्व बाजूंना पाहू शकत होतो आणि मोकळे-पणाने श्वास घेत होतो. काळोखाबरोबर सावल्या पण आमच्या नाहीशा झाल्या होत्या. रुंदशा पहाडी भागात शांतता मात्र भेसूर वाटत होती. घोड्यांनी कान टवकारले आणि त्यांची चाल मंदावली. ' लांडगे ! ' आमचा प्रमुख म्हणाला.

पहाट झाली. आकाशात उजेड आला आणि दिवसाचं राज्य सुरू झालं. आता आमच्यासमोर दरी होती. शेतांच्या रांगा सुरू झाल्या; पण कुठे वस्ती दिसत नव्हती. आम्ही तसेच दौडत चाललो होतो. पैशाने आम्हाला एक निवारा मिळाला. बाहेरच्या जगाचा विसर पडला. ताजेतवाने घोडे पण आम्हाला बदली मिळाले.

आमची धडपड एवढी चालली होती की आम्हाला विश्रांती नव्हती. जे दिवस आम्ही निवांत घालवले त्याची भरपाई आम्हाला करायला पाहिजे होती. दिवसातून आम्ही दोन दोन-तीन तीन वेळा घोडे बदलले, पण प्रवास थांबवला नाही. पाऊलवाटेवरून घोडे दाबत होतो. रात्री आम्ही बैलगाड्या पसंत करत असू आणि त्यांचा खडखडाट खूप होत असे. चालण्याच्या गतीमुळे आम्ही पेंगत असू; पण धक्के बसले की ताळ्यावर येत असू. काळ जेव्हा आ वासून समोर होता तेव्हा असल्या धक्क्यांचं काही वाटत नसे. तीन दिवस आणि तीन रात्री प्रवासात घालवल्या; पण स्वातंत्र्यापासून अद्याप आम्ही खूपच दूर होतो.

आणि एके दिवशी संध्याकाळी आम्ही मिनाह या छोट्या गावी आलो. रस्ते गजबजले होते. गरिबीने पिचलेले लोक. गाढवं आणि उंट ह्यांनी रस्ता अडवला होता. अकस्मात आम्हाला रस्त्यात काही रशियन सैनिक हिरव्या टोप्या घातलेले आढळले. आम्ही घोड्यांवर पडून राहिलो आणि तसेच घोडे दामटले. त्यांना आम्ही पार केलं. एका धर्मशाळेत आलो; पण दृष्टीस पडलेल्या रशियन सैनिकांमुळे आमच्या स्मृती चाळवल्या गेल्या. विजेरी तारा, गुलामगिरी आणि सैबेरियातील कटु अनुभव डोळ्यांसमोर आले.

गुलाम गावात चक्कर मारायला गेला. आम्ही मात्र त्या गोठ्याच्या अंधारात दडलो. गुलाम आला आणि त्याने पायावर पाय ठेवला. माझी बोबडी वळली; पण पहातो तो गुलाम ! मिनाह रशियनांचं झालं आहे. खूप रशियन येथे आहेत; पण हमादातला मात्र जर्मन आहेत. इथून चारशे किलोमीटर एवढं अंतर आहे. तुर्की सरहद्दीवर जर्मन आहेत, हा आश्चर्याचा आणखी धक्का होता.

दिवस उजाडण्यापूर्वी आम्ही पायी चालू लागलो. खाचा, खळगे, दगडांच्या ठोकरी, डोंगर-दऱ्या यांचं आम्हाला काही वाटत नव्हतं. मनातून त्या चालण्याचा तिरस्कार असला तरी सभोवताली रशियन लोक गोळा झालेले असताना घोड्यापेक्षा पायी जाणं हे श्रेयस्कर होतं. मिनाह सोडून चार दिवस झाले होते; पण वाटेत कुणी रशियन दिसले नव्हते. वाटेत जेव्हा शेतीवाडी लागली तेव्हा तिथले घोडे घ्यायचा मोह आम्हाला आवरता आला नाही. आणखी तीन दिवसांत आम्हाला स्वातंत्र्य गवसणार होतं. आमच्यात आता हुषारी आली होती.

### अखेर घात झाला !

संध्याकाळी आम्ही एका वाटेवरील उतारू घरात राहिलो; पण तिथला अधिकारी आम्हाला गाडी अगर घोडे देण्याच्या विरुद्ध होता. दोन बंदूकधारी नवखी माणसं; पण त्यांनीही या विरोधात आवाज उठवला. गुलाम बिचारा गप्प झाला ! घोडे मिळण्याची आशा नव्हती एवढाच त्या भांडणातला रोख होता. त्यांच्यापैकी एकजण घोड्यावर गेला. कुठे गेला याचा पत्ता नव्हता. रात्री आम्ही तिथेच मुक्कामाला होतो. सकाळी काय झालं कुणास ठाऊक; पण तो अधिकारी बग्गी द्यायला तयार झाला. तो स्वतःच चालवायला बसला आणि एक उरलेला नवखा माणूस आमच्याबरोबर आत चढला.

घोडे चपळ होते. का कुणास ठाऊक; पण थोडा वेळ गेल्यावर वाटलं की, आपण जायला नको होतं या गाडीतून. आपला संशय तर आला नाही ना अशी शंका मनाला चाटून गेली. हमादान कुठं आहे? आपण कोणत्या दिशेला चाललो आहोत ? अशा प्रश्नांची झुंबड उडालेली असताना आम्हाला बिगुलाचा आवाज ऐकू आला.समोरच्या डोंगरातून तो आला होता. पाठोपाठ पहाडी लोक धावून आले आणि त्यांनी गराडा घातला. बग्गीवाल्यांनी बग्गी थांबवून आम्हाला बाहेर ओढलं. आम्हाला लोळवलं आणि दोरांनी बांधलं. घोड्यावरून आलेले रशियन ऑफिसर्स खाली उतरले. आमचे खिसे तपासण्याची आज्ञा एका कॅप्टनने दिली आणि तुर्कीचं पत्र त्यांना मिळालं. कॅप्टनने ते वाचले. जर्मन अधिकारी असून सैबेरियातून पळ काढून जर्मनीला जायच्या प्रयत्नात आहोत हे त्यांनी ओळखलं. त्यांनी सलाम केला आणि जर्मन भाषेत सांगितलं की मला वाटतं...तुम्ही हेर आहात असं आम्हाला समजलेलं आहे.'

स्वर्गातून दगडांचा वर्षाव व्हावा असं वाटलं. डोंगरांचं वलय निर्माण झालं. काळ्या आकृत्या (सावल्या) झेपावत आहेत माझ्या-कडे असं वाटलं. सारं काही घरंगळत चालल्यासारखं वाटलं. एक जाडजूड काळा पडदा हळूहळू उतरत असल्यासारखं वाटलं.

नशिबाने पलटी घेतली होती. जगावेगळं साहस खलास झालं होतं. कोझॅकांनी घोड्यावर घालून आम्हाला चालवलं होतं. पुढचं साहस त्याचा आम्ही विचार करू शकत नव्हतो या वेळी. विजयो-न्मादात आम्हाला ताबेदाराने पर्शियाने रशियन सैन्याच्या हेडक्वार्टर-मध्ये आणलं.

परत यातना आल्या नशिबी ! कोर्टमार्शल, मृत्यूची शिक्षा, जीवघेणे त्रास आणि नंतर तुरुंग! काही महिन्यांनंतर परत सैबेरियाला रवानगी झाली. सहा आठवड्यांचा रेल्वेप्रवास कॉकेशसपासून जपानी समुद्रापर्यंत !

पूर्व आशियातील निरनिराळ्या भागांतले फौजदारी गुन्हेगार कैदी असलेल्या व्हलादिवोस्तोकच्या (Vladivostok) उत्तरेच्या कॅंपमध्ये परत उसंत मिळाली. १९१८ साली मी सुटका करून फ्रान्स-मधल्या जर्मन सैन्यात आलो. □ □

पुस्तके

# ‘ मॅडम ’

## मन अस्वस्थ करीत नाही

अशोक प्रभाकर डांगे

सुभाष अवचट हा अलीकडचा जाणवणारा माणूस आहे. तसा तेव्हा तो मुखपृष्ठांवर देखणेपणी मिरवतही नव्हता किंवा मासिकांच्या करडचा पानांवर निमूटपणी थांबायलाही लावत नव्हता. तरीसुद्धा जाणवत होता त्याच्या रंगाचा आवेश, त्याच्या देखण्या फटकाऱ्यांची अभिव्यक्ती. तेव्हा तो मनोहर मासिकाच्या पानांवर भेटे किंवा साधनेचा तोंडावळाही देखणा करून सोडे. सुभाष अवचट नावाचा माणूस त्यानंतर पसरतच गेला. अलीकडे प्रत्येक देखण्या पुस्तकामागे त्याचाच हात असतो किंवा प्रत्येक लक्षणीय सजावटीत तो आपलं व्यक्तिमत्त्व उभं करीत असतो. मराठी मासिकांच्या एकसाची व्यक्तिमत्त्वाची कोंडी फोडून टाकण्यात सुभाष अवचट यांचा वाटा फार मोठा आहे.

मॅडम ही अवचटांची पहिलीच कादंबरी. अमेयचं हे प्रकाशन अतिशय लक्षणीय आहे. अगदी प्रथमच जाणवतो तो तिच्या मांडणीतला ताजेपणा. विलक्षण आखीवपणानं बांधलेली ही कादंबरी. अवचटांनी आशयाच्या अभिव्यक्तीसाठी निवडलेली पद्धत तर अगदीच सरळ आहे. अवचट नेमकेच शब्द जागोजागी उभे करतात. तपशिलाच्या घोटाळ्यात ते फारसे डोकावतच नाहीत. तशी ही कादंबरी त्याची आणि तिची आहे. म्हटलं तर कुमारी अंजू आहे, साहेब–मम्मी आहेत. आणखीही कोणी आहेत; पण हे सारेचजण केवळ कामापुरतेच आहेत. बाकी सारा वेळ तो आणि तीच.

तिचं खर नाव कोणतंही असो. त्याची भूमिका मात्र अगदी स्पष्ट आहे.

तिनं मला सगळं
कधी शिकवलं
हे कळलं नाही
म्हणून मी तिचं नाव ठेवलं
मॅडम

तर त्याच्या जाणिवा मोठ्या करणाऱ्या मॅडमची ही गोष्ट. ‘ मॅडमचे केस दाट आहेत पण लांब नाहीत. शिवाय मध्यभागी तुटके. तेलकट चेहरा. मळकट कपडे. डोळ्यांत काजळ. ओठांना जांभळचा–तांबडचा लिपस्टिकची ओल. मॅडम उंच आहे म्हणूनच लुकडी. गळ्याची हाडं स्वाभाविकच वर. गुरुकुडता वावरते. ती पायांत कोल्हापुरी चपला घालते. त्या सुद्धा तुटक्या. मॅडमकडे अनेक शबनम आहेत. ही सारी वर्णनं एखाद्या उच्चभ्रू बापाच्या अलीकडच्या तरुण पोरीला शोभणारी आहेत. मॅडम तशीच आहे. गर्दी घेऊनच वावरणाऱ्या अल्ट्रा मॉडर्न बापाची ती पोरगी आहे. त्यांनाच तो साहेब म्हणतो. आता तिनं चारमिनार ओढून दिवस काढणं स्वाभाविकच आहे.

आता तो, त्याच्याच शब्दांत सांगायचं झालं तर बेकूड माणूस आहे. त्याचं तिच्यावर प्रेम आहे. तसं त्याचं लग्न कुमारी अंजूशी होऊ घातलंय. मॅडमवर आणखी बऱ्याचजणांचं प्रेम आहे. सुहास लेले. काळा आणि मिशावाला शश्या जोशी वगैरे; पण तिच्याकडून प्रेमानं गधडा म्हणवून घेणारा तो एकटाच आहे. अवचटांचा हा नायक चित्रकारच आहे म्हणूनच तो मॅडमला त्याच भाषेत उभारतो.

भुवई,
त्याखालची छोटी टेकडी.
नाकाच्या बाजूची चढण.
डोळ्याखालून सहज गेलेला रस्ता.
आणि कानापाशी तयार झालेला चौक.

हे शब्द कलाकाराचे आहेत; पण एखाद्या लहानशा वेधक कवितेसारखेही. तो सतत चित्रं काढतो. चित्रकाराचं भान जागं ठेवतो. त्यातच जगतो. मॅडमच्या घरी टबात बॉश घेताना सुद्धा तिचं वेधक शरीर त्याला न्यूड काढायचं आवाहन करतं. तो तिला सारखी कलेच्या धुंदीतच पहातो. तेव्हा त्याला दिसतात,

तिच्या छातीवरचे छोटेसे उंचवटे
त्यानंतर मानेचं झाड.
त्यावर ठेवलेलं ओठांचं देऊळ
पाठीमागे नाकाचा तरतरीत ध्वजही

अशी ही मॅडम. अतिशय मनस्वी. त्याच्यावर मर्यादेपर्यंत प्रेम करणारी, हॉस्पिटलच्या कॉटवर भेटणारी, रिकाम्या कॉलेजच्या आवारात सहवास देणारी, बागेच्या रस्त्यावर सिथ्रू आणि पायजमा घालून त्याच्याबरोबर घुमणारी, पत्रामधनं गधडा म्हणून संबोधणारी, फोर्टमधल्या पॉश हॉस्पिटलात येऊन भेटणारी, खादीभांडारात यलो-लेमन कुडता घ्यायला लावणारी आणि ट्रायलरूममध्येच आवेगानं कवटाळणारी, जहांगीर आर्टच्या प्रसाधनात घेऊन जाणारी, केसांना देखणे झोके देणारी, टबात त्याच्याबरोबर नग्न होऊन बाथ घेणारी, पण त्याहून ती वेगळी आहे. तिचं दुःख वेगळं आहे. तिचं दुःख तिच्या सावळ्या पोटावरच डागलंय. म्हणूनच आवेगाच्या त्या क्षणी त्या जखमेतून रक्त पाघळत रहावं. तिच्या वाट्याला हॉस्पिटलच्या वाऱ्या आहेत. वेदनांचे भोग आहेत. म्हणूनच उपभोगही दूर आहेत. म्हणूनच तिची जवळीक वरवरची आहे. अर्थात याची जाणीव त्यालाही होते; पण खूपच उशीरा आणि तरीही ह्या असमर्थ स्त्रीचं त्याच्यावर मनस्वी प्रेम आहे. म्हणूनच ती त्याला आवर्जून मुंबईला येण्यासाठी लिहिते. तो पण भलताच आशावादी. वेडी आशा करतो. तीच रिसीव्ह करायला स्टेशनवर येतील; पण ते सारं व्यर्थ आहे. कारण मॅडमच्या मृत्यूनं तिचं अवघं व्यक्तिमत्त्वच तोपर्यंत पुसून टाकलंय.

अवचटांची ही पहिलीच कादंबरी. पहिलीच कादंबरी म्हणून तिचा विचार करावयाचा झाल्यास तिच्या मांडणीचं नवेपण मोठं ठरेल. मोजक्या शब्दांची घडण आकषून

घेईल. देखण्या उपमांची जाणीव मोठी ठरेल. इतकंच काय सुंदर चेहऱ्याने सुद्धा आपण हरवून जाऊ. यापलीकडे जायचं म्हणलं तर या कथानकाच्या फॉर्मचाच विचार पुढे येईल. कदाचित ती कथा असेल. दीर्घकथा वाटेल किंवा लघुकादंबरी सुद्धा ठरू शकेल. आशयाची खोली मोजायची म्हटली तर अवचटांचे शब्द अपुरे ठरतील. अभिजात लेखन शब्दापलीकडं वाचलं जातं किंवा शब्दांअलीकडं सुद्धा वाचावं लागतं. अवचट एकाएकी मनस्वी स्त्रीला देखण्या शब्दात उभी करतात. अजोड उपमांनी सजवितात; पण आशयाच्या अभिव्यक्तीत ते अपुरे ठरतात. ह्या मनस्वी स्त्रीची शोकांतिका मनाला विलक्षण अस्वस्थता आणून देत नाही किंवा एका स्त्रीच्या गहिऱ्या व्यक्तिमत्त्वाला न्यायही देऊ शकत नाही. मॅडमची अभिव्यक्ती पु. शी. रेग्यांच्या 'सावित्री' किंवा अगदी अलीकडच्या 'रेणू'शी मिळती-जुळती आहे; पण सावित्रीच्या प्रगल्भ जाणिवेइतकी किंवा रेणूच्या उत्कट जीवनानुभावाइतकी अवचटांची 'मॅडम' कोठेच जाणवत नाही. मांडणीचं मोठेपण म्हणजे केवळ शब्द नव्हेत किंवा किरकोळ अनुभवांचं तपशीलवार वेडर चित्रण म्हणजे आशय नव्हे. 'मॅडम' वाचल्यानंतर त्यातलं दुःख सहज पुसलं जावं म्हणून तर तितकंच स्वाभाविक ठरतं. ◻

**मॅडम** : सुभाष अवचट
अमेय प्रकाशन, नागपूर.
किंमत : रुपये पंधरा.

## साधने थोडी—प्रयोग अनेक

सामान्यातल्या सामान्याला जर विज्ञाननिष्ठ बनवायचे असेल तर त्याला तशी संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. प्रयोगशाळेत प्रयोग करायची संधी प्रत्येकाला मिळेलच असे नाही आणि अशा वेळी हे काम समाजसेवा संशोधन केंद्राने प्रकाशित केलेले 'साधने थोडी प्रयोग अनेक' हे पुस्तक करू शकेल. सहज उपलब्ध असणाऱ्या साधनाद्वारे जरी मार्गदर्शक मिळाला नाही तरीही करून पाहता येण्याजोगे निरनिराळे प्रयोग या पुस्तकात आहेत. मोठ्या, सुबक, स्पष्ट आकृत्यांद्वारे निरनिराळे प्रयोग स्पष्ट करून दाखवलेले या पुस्तकात आढळतात.

अहमदाबाद येथील विक्रम साराभाई कम्युनिटी सायन्स सेंटर या संस्थेने प्रकाशित केलेल्या 'थोडा साधन घणा प्रयोग' या पुस्तकाचे हे मराठी भाषांतर आहे. मूळ गुजराथी पुस्तक विक्रम साराभाई कम्युनिटी सायन्स सेंटरने फार परिश्रमपूर्वक तयार केले आहे. प्रयोगाची योग्य पद्धत शोधून काढणे, भाषा सोप्यात सोपी वापरणे, याशिवाय इंग्रजी शब्द मुळीच येऊ न देणे यावर या संस्थेचा कटाक्ष असतो. त्यांनीच केलेल्या संशोधनानंतर हे पुस्तक तयार झाले आहे.

शाळेत ज्या पद्धतीने 'शास्त्र' हा विषय शिकवला जातो त्यात तोच-तोपणा असतो, साचेबंद स्वरूप असते, भाषासुद्धा ठरलेली असते हे मुलांना मानवत नाही म्हणूनच अहमदाबादच्या या संस्थेने शिक्षणक्षेत्राशी संबंधित नसलेले शास्त्रज्ञ नेमून संशोधनानंतर हे पुस्तक तयार केले आहे.

मूळ गुजराथी पुस्तकाचा 'साधने थोडी प्रयोग अनेक' हा अनुवाद असला तरी तसे कोठेही जाणवत नाही. प्रत्येक पान उघडून पाहावयास लागले की वाटते 'अरे, इतका सोपा प्रयोग आपण सहज करू शकू!' हे या पुस्तकाचे यश आहे.

समाजसेवा संशोधनसंस्थेच्या हातात हे अनुवादाचं काम पडल्याने त्यांनी ते उत्तम करवून घेतले आहे. या पुस्तकाच्या यशात भाषांतर तितक्याच सोप्या शब्दात करणारे श्री. नारायण जोशी यांचा फार मोठा वाटा आहे.

या पुस्तकाचा उद्देश मुले, गृहिणी आणि कामगार या सर्वांमधे विज्ञाननिष्ठा निर्माण करणे हा आहे. त्यामुळे त्याचा उपयोग शाळांमध्ये तर होईलच; पण सार्वजनिक संस्थांनीही पुढे येऊन या पुस्तकाचा वापर केल्यास ते फार उपयुक्त ठरेल.

—सुचित्रा राजूरकर



# देखण्या अंतर्मुख शांततेतूनच बोलत राहणारा बर्गमनचा ' सायलेन्स '

नीती आणि अनीती ह्या पाठच्या बहिणी-सारख्या असतात. एकाच नियतीच्या पोटी जन्माला आलेल्या ह्या दोन प्रवृत्ती व्यक्तिमत्त्वानं विलक्षण विसंवादी दिसतात. नीती थोरली भासत असली तर अनीती धाकटी ठरते. नीती निसर्गतःच गोरी असली तर अनीती निश्चितच काळी असते. नीती विचारी तितकीच किंवा त्यापेक्षाही अनीती अविचारी वागते. नीती अंतर्मुख तर अनीती उथळ. नीती विचारी तर अनीती स्वभावतःच अविचारी भासते. नीती बुद्धिवादी तर अनीती भोगवादी असते. ह्या दोन विरोधी प्रवृत्तींच्या समतोलावर समाजाचं स्थैर्य उभारलं जातं. ह्या मूलभूत प्रवृत्तींमधला संघर्ष विचारवंतांचा नेहमीच पाठपुरावा करतो. हा संघर्ष ही अखंड चालणारी एक जाणती क्रियाच असते आणि त्या क्रियेची प्रतिक्रिया हीच चिंतनशील मनांना सुन्नता आणते. इंगमार बर्गमनसारख्या प्रतिभावान दिग्दर्शकाला अभिप्रेत असलेली शांतता ती हीच. ह्याच विवक्षित शांततेलाच तो पडद्यावर नाव देतो ' दी सायलेन्स. '

बर्गमनची शांतता ही एक सर्वसामान्य शांतता नसते. रिकाम्या बोइंगमधली ती गतिशून्य शांतता नसते. विद्युद्वाहिनीत जळणारी बेवारशी शांतता नसते किंवा उजाड कातळावरची अर्थशून्य शांतताही नसते. बर्गमनची शांतता ही शब्दांआधीची असते. ती शब्दांमधली असते किंवा ती शब्दांपलीकडीलही असते. शब्दाआधीची शांतता मनाला उत्सुकता आणते. शब्दांमधील शांतता मनाला अस्वस्थ करून सोडते तर शब्दांनंतरची शांतता मनाला अंतर्मुखतेकडे घेऊन जाते. ह्या शांततेची प्रत्येक अवस्था विलक्षण देखणी असते. बर्गमनची शांतता परिस्थितीच्या उपरोधातून जन्माला येते तशीच ती परिस्थितीबरोबरच वाटचाल करते.

बर्गमन सारखा ह्याच शांततेचा शोध घेताना दिसतो. प्रथम पडद्यावर दिसते ती एक विलक्षण देखणी शांतता. ती एका लांबच्या प्रवासाला निघालेली. तीही एका रेल्वेच्या डब्यातून. ह्या युरोपियन रेल्वेच्या कंपार्टमेंटमध्ये वावरत असतात तीन व्यक्तिमत्त्वं. दोन स्त्रिया आणि एक पुरुष. हा लहान मुलगा आहे. बर्गमन त्याला जोहान म्हणतो. विलक्षण अंतर्मुख भासणारा हा पोरगा आईला डब्यात रंगवलेल्या शब्दांचा अर्थ विचारतो. तिलाही तो सांगणं शक्य असत नाही. त्याच वेळी तिथली दुसरी स्त्री श्वास घुसमटल्याने कासावीस होताना दिसते. सुटीवरून परतणारे हे तिघेही जण एका जीवघेण्या अस्वस्थतेत वावरताना दिसतात. पोरगा कॉरीडॉर गाठतो आणि खिडकीच्या काचेला नाक लावून जग शोधतो. मग बर्गमनचा कॅमेरा गतिमान होतो. शांतता बोलकी होते. रुळांचे आवाज सजीव होतात. धावते डोंगर मागे पडतात. रणगाडे चढवलेल्या मालगाड्या पार होतात. तेव्हा बर्गमन युद्धकाळाचाही संदर्भ देऊन टाकतो. मग डब्याचा कंडक्टर काही तरी उडत्या सूचना फेकत जातो. मालगाड्यांचे डबे यार्डाच्या खुणा स्पष्ट करतात. स्वाभाविकच कुठलं तरी स्टेशन आलेलं दिसतं. बर्गमनचा कॅमेरा आता फालतू घटनांत रेंगाळत राहात नाही. तो एका गर्दीच्या रस्त्यावर रोखलेला. विलक्षण गोंगाट. बारमधली बजबज. वाहनांचा गलका. मग एक विलक्षण शांतता. मग आपल्या ध्यानात येऊन चुकतं की आपण एका इमारतीच्या खिडकीतून डोकावत आहोत. थेट रस्त्यावर.

ह्या विलक्षण एकाकी पण अतिशय भव्य हॉटेलात उतरलेल्यातल्या थोरलीचं नाव इस्टर आणि धाकटीचं ॲना. मूलभूत मानवी मूल्यांच्या शोधात निघालेला बर्गमन नीती आणि अनीती ह्यांना सहज पडद्यावर आणतो. इस्टरमध्ये तो नीतीचा आविष्कार करतो तर ॲनाच्या रूपानं तो अनीतीला सजीवता आणतो आणि स्वाभाविकच इस्टर दिसायला वयस्क तर ॲना तरुण दिसते. इस्टर उजळ तर ॲना रंगात सावळी वाटते. इस्टर अंतर्मुख तर ॲना उथळ वाटते. इस्टर प्रौढ म्हणून प्रौढत्वाच्या खुणा बाळगणारी तर ॲना तरुण म्हणून तारुण्य मिरवणारी. इस्टर जुनाट कपड्यात वावरणारी तर ॲना उत्तानपणे वावरणारी. इस्टर अविवाहित तर ॲना विवाहित आहे आणि ह्या साऱ्यांचा अबोल साक्षीदार आहे ॲनाचा मुलगा जोहान. बर्गमन साऱ्याच घटनांचा अन्वय त्याच्यामधूनच शोधत असतो. इस्टर कसल्या तरी छातीच्या आजारानं ग्रासलीय. सुटीवरून परततानाच तिचा आजार बळावलाय. स्वाभाविकच एका नवीन देशातल्या अज्ञात गावात ते उतरलेयत. परतीच्या वाटेवर इस्टरचा त्रास वाढलाय. ॲना म्हणते, डॉक्टरला आणूयात. इस्टर ठाम नकार देते. कारण तिला उगाचच विश्वास वाटतोय. थोडी झोप काढल्यावर आपण निश्चितच बऱ्या होऊ. ॲनाचा नाइलाज होतो.

आता बर्गमन एक विलक्षण शांतता चित्रित करतो. ह्या सजीव शांततेत इस्टर अभ्यास करताना दिसते. ती मूलतःच विचारी असते. स्कॉलर असते. ती खूप वाचते, विचार करते, मध्येच टाइपरायटरवर लिखाण करते; पण त्याला समांतर असा झगडा चालूच असतो. तो असतो शरीराशी. बर्गमनची ही नायिका खोकत रहाते. आपल्याच श्वासात घुसमटते, अस्वस्थ होते. मग खूप पिते. हा शारीरिक ताण आणि त्याबरोबरचा मानसिक एकांतवास झोंबत असतो. दारूशिवाय इलाजच नसतो. ती ग्लासाने पिते. बाटलीनं पिते. एक संपल्यावर दुसरी मागवते. तसा त्या हॉटेलचा म्हातारा वेटरसुद्धा बरा असतो. तिला खुणांनीच समजावून घेतो. हातवाऱ्यांनी उत्तरं देतो आणि तिची भगभगती भूक भागवण्यासाठी खाणंसुद्धा आणून देतो. तसं सर्व्हे करण्यासारखं दुसऱ्या खोल्यांतून कोणी नसतंच. कारण सगळं हॉटेलच शून्यतेनं भरलेलं असतं.

बर्गमन ॲनालासुद्धा देखणेपणी वावरताना दाखवतो. ती भरलेली स्त्रीसुद्धा तशी एकटीच. फार तर मुलाशी बोलणारी. तेसुद्धा मोजकंच आणि बोलणार तरी काय म्हणा? हा विलक्षण एकाकीपणा ह्या मनस्वी स्त्रीच्या पलीकडचा असतो. त्यातनं इस्टरची शांत नजर, तिच्या हालचालींची राखण करणारी. हिला काहीच सहन करण्यासारखं मग ती इस्टरला ओझरतं सांगते, 'मी बाहेर जातेय!' बाहेर पडते. बर्गमनच्या ह्याही नायिकेला दुसरा पर्यायच नसतो. तीही एका बारमध्ये बसते. आता बर्गमन शांततेची कोंडी फोडून टाकतो. बारमधला विलक्षण गजबजाट तो ध्वनित करतो आणि तेच स्वाभाविक असतं; पण अस्वस्थ ॲना इथे पण रमत नाही. बर्गमनचा कॅमेरा जागाच असतो. सुटी नाणी परत देताना तो संधी साधतो आणि तिथल्या वेटरला ॲनाच्या उन्मत्त मांड्या दाखवतो. ॲना बाहेर पडते. काही तरी करायला हवंय. मग ती एका थिएटरात घुसते. बॉक्समधली जागा पकडते व बुटक्या विदूषकांचा नाच पहाण्यात मग्न होते. आता बर्गमन पुढे येतो आणि काही तरी विलक्षण घडतं. तिच्याच खालच्या बॉक्समधल्या स्त्री-पुरुषांचा उन्मत्त उपभोग बर्गमन ॲनाला दाखवतो. विलक्षण एकाकीपणा, अस्वस्थ मनोवृत्ती, शरीराच्या उघड्या गरजा. परिणाम अटळ असतो. ॲनाचं मन विलक्षण पिसाटतं. ती बाहेर पडते. रस्त्यावर दुकानात दिसेल त्या पुरुषाचा वेध घेऊ पहाते; पण त्या विलक्षण वहात्या रस्त्यामध्ये तिची मनोवृत्ती समजून घेण्याइतका रिकामा तरी कोण असणार? शरीरानं झपाटलेली ती स्त्री! आता तिला थांबवणं शक्य नसतं. ती सरळ मघाचाच बार गाठते. तिथे तिचं शरीर न्याहाळणाऱ्या त्या रांगड्या वेटरला सरळ बाहेर काढते. तसं ते तिनंही टिपलेलं असतं. त्याच्याशी बोलायला तिला कुठल्याच भाषेची गरज नसते. ते एका मोठ्या चर्चमध्ये जातात आणि एका खांबाच्या आसऱ्यानं शरीर भोगून टाकतात.

बर्गमन परत एकदा शांततेत शिरतो. आता तो कॅमेरा इस्टरवर आणतो. ॲनाचे मळलेले कपडे ती उत्सुकतेने बघत असतेच. मग ॲनासुद्धा खवळते, ही कोण लागून गेला दुसऱ्याची जबाबदारी फुकटचीच संभाळणारी? ती इस्टरलाच दम देते माझ्या भानगडीत नाक खुपसू नकोस!' आणि माझ्यावर पाळत पण ठेवू नकोस ॲना आपल्या बहिणीला सारं काही सुनावते. अगदी नको त्या तपशिलासकट ऐकवते. वर सांगून टाकते, ह्या वेळी फ्रॉक मळलाय. पुढच्या वेळी मी पण योग्य ती काळजी घेईन!' आता शब्द संपतात. इस्टर पराभूत होते. ती सारखी तरफडत रहाते. डोके धरधरून हुंदके देते. 'अपमान सारखा अपमान!' तिला त्याचाच उबग आलेला. शिवाय दुखणं आहेच! ह्या डिवचण्यानंच ती सारखी अस्वस्थ होते. बर्गमनची ही नायिका जणू प्रेम मागते. आस्था मागते आणि उपेक्षा, अवहेलना आयुष्यातून पिटाळू पहाते.

बर्गमन शांततेचं चित्रण घडवतो. ही शांतता आवाजांनंतरची असते. हे आवाज सुद्धा तो मोजक्या टप्प्याटप्प्यांनी चित्रित करतो. हे आवाज रेल्वेच्या गाडीचे असतात. खेचरांच्या गाड्यांचे असतात. मोटारींच्या हॉर्नचे किंवा पहाटे पेपर विकणाऱ्या विक्रेत्यांचे असतात. बर्गमनच्या आवाजात हॉटेलांतली बजबज असते तशीच मध्यरात्री रस्त्यांवर गस्त घालणाऱ्या रणगाड्यांची धडधडही असते, हॉटेलच्या कॉरीडॉरच्या लाकडी जमिनीवर वाजणारी पावलं असतात किंवा रात्रीची जाणवणारी घड्याळाची भव्य टिकटिक सुद्धा समाविष्ट होते.

बर्गमनचा कॅमेरा जोहानलासुद्धा चित्रित करतो. त्या मोकळ्या हॉटेलात तो पोरगा एकटाच घुसतो. वरचेवर घड्याळ पहातो. बर्गमन त्याच्या कृतीतून कंटाळलेपणाच जाणवून देतो. त्याला इस्टरबद्दल मात्र फार आस्था. आई बाहेर गेल्यावर तो तिच्यासाठी पुस्तक वाचतो. त्याला कंटाळल्यावर तिच्यासाठी चित्र गिरवतो किंवा तिनं दिलेलं खाणं सुद्धा मन लावून खातो. तो उरला वेळ कॉरीडॉरमध्ये घुमून काढतो. तिथल्या म्हाताऱ्या वेटरशी दोस्ती करतो. त्याच्याकडून मोठं चॉकलेट मिळवतो आणि त्याच्या बायकोच्या प्रेताचे जुनाट फोटोसुद्धा गमतीनं पहातो. मग तो इकडे तिकडे बघतो. आपल्या जवळच्या खोट्या पिस्तुलानं झुंबर पुसणाऱ्यांला धमकी देतो. सारं न बोलताच. कारण तिथली भाषाच उमगण्यासारखी नसते. मग तिथेच तो रंगवलेलं एक भव्य न्यूड उत्सुकतेनं बघतो आणि नाचणाऱ्या बुटक्या विदूषकांशी दोस्ती करून घेतो. ॲनाला थिएटरात दिसलेले ते बुटके बर्गमन जोहानला दाखवतो. फक्त संदर्भ तेवढा विलक्षण बदललेला असतो. मग तो एकाकी पोरगा परीचा ड्रेस चढवून तिथे मस्त नाचतो आणि मग परत रूमकडं परततो. तिथे वाट पहात असते एक भीषण शांतता आणि त्याच्या जोडीला इस्टर आणि परतलेली ॲना.

बर्गमनच्या मनोवृत्तीचा पुन्हा एकदा झगडा घडतो. कारण सुद्धा तसंच असतं. ॲना नटूनथटून रात्रीच बाहेर पडायला निघते. इस्टरच्या भुवया वर जातात. ॲना चांगलीच डिवचली जाते. ती जोसेफला कॉरीडॉरमध्ये घालवते. इस्टरला काही तरी विचारायचं असतं. ॲना म्हणते मी तुला भीत नाही. मी मला वाटेल तशी वागेन! इस्टर म्हणते हे बरं चाललेलं नाही. ॲना म्हणते मी तुला भीक घालत नाही! मी माझी स्वतंत्र आहे! कुठे चाललेय विचारशीलच. नीट ऐक! मी त्यालाच भेटायला चाललेय. त्याच बारमधल्या वेटरला. ती धाडकन दार आपटते. बाहेर पडते. दारातच तिला तिचा रांगडा प्रियकर भेटतो. उफाळलेली ॲना त्याला कॉरीडॉरमध्येच दाबते आणि उतावीळपणे चुंबन घेत राहते. आता बर्गमन पुढे येतो. त्याचा कॅमेरा कॉरीडॉरमध्ये उभं राहून भेदरल्यागत पहाणाऱ्या जोहानचा चेहरा अचूक टिपतो आणि जोडीला रिकामी शांतता. भयंकर अस्वस्थ करून सोडणारी. ॲना सावध होते. आपल्या पोराला पहाते आणि झटकन एका ठरवलेल्या रूममध्ये शिरते. उत्सुकतेने मग तो एकाकी पोरगा त्या खोलीच्या फटीतून डोकावून पहातो. काही दिसत नाही आणि परत फिरतो. त्याच्या हातात करण्यासारखी दुसरी कोणती कृतीच तिथे उरत नाही.

बर्गमनची शांतता पुढे सरकते. आता ही संघर्षानंतरची शांतता असते. तेवढ्यात रात्रीच्या त्या एकाकी रस्त्यावर डोकावून पहाणाऱ्या जोहानला एक रणगाडा गस्त घालताना दिसतो. तो गरजतच येतो. मग शांत होतो; परत गर्जतच जातो. परत रस्ता शांत होतो पण विलक्षण अपुऱ्या मनःस्थितीतला तो पोरगा आता विलक्षण घाबरतो. तो इस्टरकडं येतो. स्वतःला सावरतो. बाहुल्यांच्या नाच नाचवून दाखवतो. परत अस्वस्थ होतो. प्रेमळ इस्टरला सरळ मिठी मारतो. तो सारखा बरळत असतो. 'ममा खूप चांगली आहे, खूप चांगली आहे.' बर्गमन ह्या मनोवृत्तीचं संक्रमण विलक्षण प्रभावानं उभं करतो. इस्टरचे पुढचे शब्द तर भलतेच मोलाचे असतात. 'तुझी ममा खूप चांगली आहे, खूप चांगली आहे, म्हणूनच आपल्या दोघांचंच तिच्यावर खूप प्रेम आहे.' इस्टर नावाची व्यक्तिरेखा बर्गमनला मोजक्या शब्दांतच उभारून

टाकतो. मानवी मनाची सुसंस्कृतता जाणवून देतो. प्रेम नावाची चीज बोलकी करतो. इस्टरला न्याय देऊन टाकतो.

इस्टरला आता थांबणं शक्य नसतं. जोहान पण घडलेलं सांगून टाकतो. त्याच्या निष्पाप मनाला तेवढं ओझं सुद्धा भारी असतं. ती सारी घटनाच इस्टरला चेतना देते, अस्वस्थ करून सोडते. मग बर्गमनही तिला अॅनाच्या असलेल्या खोलीत नेऊन सोडतो. अॅना दाराच्या आवाजावरनंच ओळखते. ती आली. ती आली. ती माझी पाठ सोडणार नाही. तिला माझं सुख पाहवत नाही. मला माहिती होतंच ती निश्चित येणार आणि मग तेवढ्यात इस्टरही आत येते. अॅनाची प्रतिक्रिया करडी असते. आपल्या खोडसाळ बहिणीला धडा शिकवण्याची तिची हीच संधी असते. ती सरळ इस्टरकडे दुर्लक्ष करते. सरळ वेटरला कवटाळते. बघ, बघ बघायचयना ? घे बघून ! असे प्रलाप मोजतच त्याच्याशी प्रणय सुद्धा करते. बर्गमनची थोरली नायिका इस्टर इतकी निर्लज्ज नसते. ती सरळ तोंड फिरवते पण जात नाही, मागे फिरत नाही. ती मोजकंच बोलते. हे काही बरं नाही. अॅना परत एकदा उफाळते, त्वेषाने पेटते. संघर्षाची बीजं बर्गमन पेरून मोकळा होतो. अॅनाला सहनच होत नाही थोरलीचं वर्चस्व. तिचा प्रभाव, तिची निखळ नजर, तिचा नैतिक दबाव तिची पाठराखण या साऱ्याच गोष्टी आयुष्यभर तिच्या मागे असतात. सारा साठलेला द्वेष उफाळतो, स्फोट होतो. तिचे शब्द जळते असतात. तू माझा द्वेषच करतेस. तू शिकलेली, विद्वान, तू पुस्तकं लिहिलेली, तू बुद्धीनं मोठी, प्रसिद्धीन सुद्धा थोर झालेली; पण तू माझा द्वेषच करतेस. मी अडाणी, मी अशिक्षित, मी गावंढळ; पण तुला जमत नाही ते मी करते. तुला मिळत नाही ते सुख मी मिळवते. तुला सुद्धा ते हवं असतं; पण ते मिळवण्याची तुझी हिंमत नाही. तुझ्या अंगात ताकद नाही. तू मनानं दुबळी, शरीरानंपण; परंतु मी तशी नाही शरीरानं तरी! म्हणूनच माझं सुख तुला बघवत नाही ! खरं बोलायचं झालं तर तू सुद्धा स्वार्थी आहेस, तू सुद्धा ढोंगी आहेस. मी तुला एकच प्रश्न विचारते, बाबा गेले तेव्हा तू म्हणालीस आता मला जगण्याचं कारणच उरलं नाही. मग तू आजवर का जगत राहिलीस ? कशासाठी ? कोणासाठी ? माझ्यासाठी ? जोहानसाठी ? आणखी कुणासाठी ? खरं ऐकायचंय ? तू केवळ स्वत:साठीच जगलीस ! तुला पुस्तकं लिहायची होती. तुला मोठं व्हायचं होतं. म्हणूनच तू जगलीस! कारण तू स्वार्थी होतीस. आज सुद्धा आहेस, म्हणून तर माझा, माझ्या सुखाचा तुला द्वेष वाटतोय ! अॅना उसळून बोलतच राहते. इस्टर अस्वस्थ पण शांतच रहाते. शेवटी ती मोजकंच बोलून जाते. बिचारी माझी 'अॅना'ला बर्गमन ह्या दोन शब्दांतच इस्टरला व्यक्तिमत्त्व देतो. अॅनाचा जीवघेणा शब्दपसारा झटकून टाकतो. इस्टरचे दोनच शब्द अॅनाचा आवेग आपल्या मनावरून पुसून टाकतो. इस्टर जाते. मागे पुन्हा एकदा उरते शांतता ! आता नग्न अॅनाला ही शांतता सुद्धा सहन होत नाही. इस्टरच्या थंड प्रतिक्रियेचा परिणाम विपरीतच होतो. ती बेभान होते. तिचा तोल सुटतो. ती त्वेषाने हसू लागते बहिणीची जिरवल्याच्या आनंदात; पण ते हास्य भीषण असतं. ती किंचाळत रहाते, खिदळत रहाते. डोकं आपटत रहाते. काहीच न उमगलेला परका वेटर कशीबशी तिला शांत करताना बर्गमन पडद्यावर दाखवतो. खरं तर आता आपणसुद्धा चक्रावून जातो.

बर्गमन शांततेला पुढे नेतो. बरोबरच कथावस्तूही. अॅना कठोरपणे ठरवते, पुढे निघायचं. इस्टरचा आजार चढत्या अवस्थेतला. तिची शुश्रूषा करत असतो म्हातारा वेटर त्या हॉटेलमधला. कोणाचा कोण. इस्टरचा जीव जोसेफमध्ये अडकलेला. ती त्याला एक पत्र देते. मग अॅना थांबत नाही. जोहानला ओढून बाहेर काढते आणि सरळ स्टेशनचा रस्ता पकडते. बर्गमनच्या कॅमेऱ्याचा प्रवास पुढे सुरू होतो. मध्येच इस्टरचा त्या हॉटेलातच अंत होताना दिसतो. अगदी एकाकीपणानं. वेटरसुद्धा उशाशी नसताना. आता रेल्वेच्या कंपार्टमेंटमध्ये जोसेफ इस्टरचं पत्र बाहेर काढतो आणि व्याकुळ नजरेनं शब्दन्‌शब्द वाचू लागतो. अॅना खिडकीतून जग पहाताना दिसते. बर्गमनची शांतता तुटते. रेल्वेच्या शिट्टया किंचाळतात. धावणाऱ्या गाडीचा प्रचंड वेग आवाजातून प्रवर्तित होऊ लागतो.

बर्गमनचा सायलेन्स इथेच संपतो. पडदा ओसाड होतो. मन पण. भावना बधिर होतात. शब्द मुके. बर्गमनच्या शांततेत आपण पण बुडून जातो. संघर्षाचा भीषण अंत होतो. बर्गमन तत्त्वात कधीच बोलत नाही. देखण्या शब्दांत रेंगाळत नाही. सारं जगच तो त्या छोट्या मुलाच्या दृष्टीतून पहातो. सायलेन्स त्या निष्पाप पोरापासून सुरू होतो आणि त्याच्याबरोबरच वाटचाल करतो. अखेरच्या क्षणीसुद्धा बर्गमनचं अबोल भाष्य अटळ असतं. जोहानला काहीच सुचत नाही. आई नाही. तिचं प्रेम नाही. उन्मत्त शृंगार नाही. रणगाडे नाहीत. खेचरगाड्या नाहीत. काही नाही ! त्याला फक्त आठवतं इस्टरचं अगाध प्रेम, अफाट माया, तिची जाणवती आपुलकी आणि म्हणूनच तो तिचंच पत्र वाचायला घेतो. वहात्या डोळ्यांनी, बर्गमनची नीती विजयी होते. अनीती निष्प्रभ ठरते. आपल्याला विलक्षण विषण्णता जाणवते. ही शांतता इस्टरच्या अंतातून जन्माला आलेली असते. त्याबरोबरच एक निकोप चीड. ही चीड अॅनासाठी असते. ही तिच्या भावनाशून्यतेसाठी असते. मरू घातलेल्या बहिणीला वाऱ्यावर सोडून उद्दामपणे चालती होणाऱ्या एका माणुसकीशून्य स्त्रीबद्दल असते आणि म्हणूनच तीही महत्त्वपूर्ण ठरते.

बर्गमन तसा प्रत्येकीलाच न्याय देतो. इस्टर तटस्थ असते. तिची नैतिकता मोठी असते किंवा तिनं मनाची उंच पातळी गाठलेली दिसते. ती द्वेष, रोष पचवून वावरते. आपल्या रोगाशी झगडत रहाते. तरीसुद्धा तीही एक स्त्रीच असते. तिचंही शरीर मोलाचं असतं. तेही भोग मागतं आणि म्हणूनच इस्टरला स्वसमाधान करूनही घ्यावं लागतं. बर्गमन तिच्या गरजांची वास्तवता सहज चित्रित करतो. इस्टरच्या कृती किंवा थिएटरातले किंवा अॅनाचे उपभोग तो सरळसरळ उभा करतो. म्हणूनच सायलेन्स ही चित्रकथाच विलक्षण वास्तववादी ठरते आणि परिणामकारकही.

बर्गमनचाच न्याय आपण अॅनालाही लावू शकतो. अॅनाचं मागणं मोठं असतं. त्या विलक्षण एकाकी परिस्थितीत तिचं शरीर भोगच मागतं. कदाचित मनाची कोंडी फोडायला दुसरा पर्यायही नसल्यानं तसं घडत असेल. नीती आणि अनीती वेगळ्या मापांनी मोजली तर अॅनाचं कृत्य हे कदाचित वास्तवातलं पाप असणार नाही. तरीसुद्धा आपल्या बहिणीला मरत असताना सोडून जाण्याइतक्या पशुतेचं अॅनाच्या बाबतीत कधीच समर्थन होऊ शकणार नाही. केवळ तिचं ते एकच निष्ठुर कृत्य तिला न्यायापासून वंचित करतं.

सायलन्स बर्गमनचा एक लक्षणीय चित्रपट. चिरंतन मानवी प्रवृत्तींचं तो जाणत चित्रण करतो. बर्गमनची ही शांतताही तितकीच लक्षणीय ठरते. जेव्हा व्यक्तिमत्त्वं बोलती होतात तेव्हा बर्गमनचं वातावरण शांत होतं आणि जेव्हा व्यक्तिमत्त्वं शांत होत जातात तेव्हा बर्गमनचं वातावरण बोलकं होतं. एकूण काय बर्गमन नावाचा प्रतिभावान स्वीडिश दिग्दर्शक नेहमी एका देखण्या अंतर्मुख शांततेतूनच बोलत असतो.

—अशोक प्रभाकर डांगे

क्रीडांगण

आंतरराष्ट्रीय उंबरठ्यावरच्या

# राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा

## (२२ ते २९ डिसेंबर टाटानगर)

डॉ. नरेंद्र दाभोळकर

राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा हा खेळातील कर्तृत्वाचा मानबिंदू ठरू पहात आहे. जिल्हा चाचणी सामन्यापासून दोन महिने आधी त्याची नांदी होते. राज्य चाचणीस्पर्धेची निवडसमिती संघर्ष वाढवून ( निवड कशीही केली तरी तो अटळच असतो ) नाटय वाढवते. राष्ट्रीय स्पर्धेतील यशापयशाचा हिशोब मांडून त्यावर पडदा पडतो. आता राष्ट्रीय स्पर्धेमधून आंतरराष्ट्रीय सामन्यांसाठी संघ निवडण्याची वेळ येऊ लागल्यामुळे या नाटकाला चौथा अंक जोडला जाईल.

या वर्षीही हे सारे घडले, रंगले, गाजले. राष्ट्रीय कर्णधाराला ( शेखर शेट्टी ) आणि महिलांतील छत्रपती शिवाजी अॅवार्ड विजेतीला ( छाया बांदोडकर) मुंबई जिल्ह्याच्या संघातच मुळी स्थान मिळाले नाही, तर संभाव्य छत्रपती अॅवार्ड विजेता आणि महाराष्ट्राचा गतवर्षीचा उपकर्णधार महाराष्ट्राच्या संघातच बसला नाही. तिसरा अंक झाला दूर असलेल्या बिहारच्या टाटानगरमधे चोविसाव्या अखिल भारतीय कबड्डी अजिंक्यपदाच्या स्पर्धेत. हा त्याचा जमाखर्च.

पुरुषांच्या तब्बल तेवीस संघांनी भाग घेतला. पाँडेचरी, आसाम आणि काश्मीर वगळता साऱ्या भारतभर कबड्डीचा दम कमी-अधिक प्रमाणात घुमू लागल्याचे हे सुचिन्ह. काही व्यावसायिक संघ धरून ही संख्या तेवीस झाली. आतापर्यंतच्या इतिहासातील हा उच्चांक. यामुळे प्रत्येक संघाला आपल्या विभागात पाच सामने खेळावे लागले. अ गटात महाराष्ट्राच्या जोडीला होते तामिळनाडू, बिहार, उत्तर प्रदेश, दिल्ली आणि राजस्थान हे संघ. अपेक्षेप्रमाणे महाराष्ट्राने सर्व सामने जिंकले. जवळजवळ एकतर्फी. विशेष म्हणजे हसतखेळत आक्रमकता आणि बचाव यांचा सुयोग्य संगम साधून विजय जाधव, शांताराम जाधव, अशोक कोंडरे आणि मधू पाटील हे चार खंदे चढाईपटू असलेल्या महाराष्ट्राला तरी फारशी जोड नव्हतीच; पण तरीही तामीळनाडूच्या खेळाडूंनी थोडा वेळ महाराष्ट्राला घाम फोडला. खेल खेल मे चाललेला खेळ अंगावर उलटतो काय अशी परिस्थिती निर्माण झाली. थोडाच वेळ शिल्लक, महाराष्ट्राचे तीनच खेळाडू आत आणि गुणसंख्येची आघाडीही नाममात्र असा पेचप्रसंग. महाराष्ट्र त्यातून निभावला खरा; पण श्रीरामपूरला कसून सराव केलेल्या संघाच्या क्षेत्ररक्षणाचा त्यामुळे पुन्हा फेरविचार करावा लागला. नव्हे त्यात महत्त्वपूर्ण बदल करावे लागले. गटाचे उपविजेतेपद मिळवताना दिल्लीने जो खेळ केला त्याचे मात्र कौतुक करावयाला हवे. महाराष्ट्र संघाला त्यांनी चांगली टक्कर दिली. यजमान असलेल्या बिहारच्या संघाला सहज हरवले. पन्नाशीकडे झुकलेल्या त्यांच्या संघनायकाने पकडी अशा तडफेने केल्या की महाराष्ट्राच्या तरुण रक्ताला देखील तो काही वेळा भारी ठरला.

ब गटात खेळले भारतीय टपाल व तार खाते, वेस्ट बंगाल, मणिपूर, केरळ, मध्यप्रदेश. खरे तर या गटात नाव घेण्यासारखा खेळ एकाही संघाचा नव्हता—झाला नाही. होती फक्त पूर्वजांची कीर्ती. टपाल व तारखात्याच्या बलाढ्य संघाचा कणाच वासुदेव नसल्याने मोडलेला. (या त्यांच्या कर्णधारावर शिस्तभंगाचा इलाज झाल्याने तो या सामन्यात खेळू शकला नाही.) दोन वर्षापूर्वी असनसोल स्पर्धेत अंत्यफेरीपर्यंत धडक मारणारा बंगालचा संघ हा आत्यंतिक बचावाला चिकटून बसलेला (भोला, टायगर यांची निवृत्ति आणि त्यांची जागा भरून काढणाऱ्या चढाईपटूंचा अभाव यामुळे त्यांना पर्यायच नव्हता.) एकेकाळी हमखास उपांत्यफेरीपर्यंत पोचणाऱ्या मध्यप्रदेशचा दर्जा अगदीच खालावलेला. मणिपूर बोलून चालून नवेच असा सगळा हिशोब. बंगालने भरक्कम बचावाच्या आधारे गटाचे विजेतेपद मिळवले. उपविजेतेपद टपाल व तार खात्याकडे गेले.

क गटात होती भारतीय रेल्वे आणि त्याबरोबर हरीयाना, हैद्राबाद, ओरिसा, हिमाचल प्रदेश, गुजराथ हे संघ. सदा शेटे सारखा अर्जुन अॅवार्ड विजेता. वीजू पेणकर-सारखा भारतश्री, अमर पवारसारखा चतुरस्त्र खेळाडू अशा मातब्बर आणि वेचक खेळाडूंचा हा संघ. बहुतेक खेळाडू बलदंड शरीरयष्टीचे. या राष्ट्रीय स्पर्धेच्या इतिहासातील सर्वाधिक अजिंक्यपदे खिशात टाकलेला हा संघ; पण गेली दोन वर्षे मात्र कर्नाटकचा राहू आड आल्याने यांच्या कुंडलीतल्या विजयाच्या रवीला ग्रहण लागलेले. यामुळे यंदा तो मैदानात उतरला तेच आस्ते कदम वाण्याने; पण विजयी होण्याचेच धोरण डोक्यात ठेवून. बचावाचा पवित्रा, संथ सुरुवात, कुठल्याही संघाला कमी न लेखण्याचा सावधपणा अशी खबरदारी घेतल्यावर रेल्वेच्या बलाढ्य संघाला विभागीय विजेतेपद मिळविणे काय कठीण होते ? मात्र महाराष्ट्राला सतत आक्रमक खेळ केल्याने तामीळनाडूबरोबर जसा फटका बसला तसाच प्रसंग बचाव केल्यामुळे ओरिसाच्या संघाबरोबर रेल्वेवर ओढवला. हैद्राबादच्या संघानेही सामन्याच्या पूर्वार्धात थोडा ताण भरला होता; पण उत्तरार्धात ते एकतर्फी हरले. तो संघ गटात उपविजेता ठरला.

क गटात गतसालच्या विजेत्या कर्नाटकाबरोबर पंजाब, आंध्र, बिर्ला, गोवा आणि सेन्ट्रल सेक्रेटरिएट हे संघ होते. स्पर्धेच्या उद्घटनानंतर पहिल्याच सामन्यात विजे-

त्यांच्या दिमाखात विदर्भविरुद्ध लढावयाला कर्नाटकचा संघ उतरला. किरकोळ शरीरयष्टीवरून संघाच्या कर्तृत्वालाही मामुली ठरविण्याची चूक कर्नाटकने केली. विदर्भाचा संघ हा या स्पर्धेतला उत्तम बचाव आणि खंबीर चढाईपटू याचा मिलाफ असलेला एक उत्तम संघ. हातात गुणाची आघाडी मिळाल्यावर त्यानी कर्नाटकला सोडले नाही. त्यांच्या प्यारेलाल पवारच्या उडत्या चढाया हे सामन्याचे एक आकर्षण ठरले. याच चढायाच्या साह्याने विदर्भाने पंजाबला हरवले आणि तो विभागीय विजेता ठरला. कर्नाटकला त्या विजेतेपदावर समाधान मानावे लागले. गोवा हा या स्पर्धेत प्रथमच भाग घेतलेला सर्वांत कच्चा संघ. त्याने खेळण्याची हौस भरपूर भागवून घेतली. पंजाबच्या बलदंड उंचापूऱ्या खेळाडूंनी आपल्या धमाल खेळाने सामन्यात थोडी जान आणली. क्षेत्र रक्षणाचा मंत्र हळूहळू तेही आत्मसात करू लागल्याचे जाणवले.

उपांत्यपूर्व फेरीत हैद्राबादवर एकतर्फी मात करताना महाराष्ट्राचा कर्णधार असलेल्या विजय जाधवने आपला चौफेर खेळ केला. रेल्वेने सामन्यावर पकड ठेवून कोणताही धोका न पत्करता दिल्लीविरुद्ध सामना ४–२ एवढ्या कमी गुणसंख्येने परंतु निश्चितपणे जिंकला. टपाल-तारखात्याशी विदर्भाचा झालेला सामना शेवटच्या दहा मिनिटांत विलक्षण रंगला. तो समान गुणावर (४–४) आल्यानंतर झालेल्या पाच-पाच मिनिटांच्या दोन अलाहिदा डावात तारखात्याने सामना फिरवला खरा; पण त्यांचे समाधान क्षणभरच टिकले. त्यांच्याच खेळाडूंनी विनाकारण केलेली घाई त्यांना नडली आणि सामना गमवावा लागला. कर्नाटक आणि पश्चिम बंगालमध्ये नाणेफेक जिंकली कर्नाटकने. त्याचा बोनसगुण गृहीत धरून, बंगालच्या बचावफळीची धास्ती वाढवून आणि स्वतःच्या बचावफळीचा विश्वास बाळगून (त्यातून गुण काढणे बंगालला शक्य नाही) कर्नाटकने सामना गुणशून्य राखला. (चाळीस मिनिटे ०–०) अगदी नाइलाज झाला म्हणून कलाहिरा डावातील शेवटच्या मिनिटाला बंगालने कर्नाटकच्या भटला निदानरेखा बंद केली आणि ते सुदैवी ठरले. शेवटच्या चढाईत कर्नाटकच्या सुबण्णाने एक गुण मिळवला खरा; पण नंतर वेळ होताच कोठे? सामन्यातील पहिला गुण नोंदविल्यामुळे तो बोनसगुण ठरून बंगाल विजयी ठरले. शेवटच्या मिनिटातील या नाट्याने सारे स्टेडियम काही काळ दिङ्मूढ झाले होते. आत्यंतिक बचावाची ही ट्रॅजेडी महाराष्ट्राने नीट ध्यानात घेतली. प. बंगालबरोबर उपांत्यफेरी खेळताना त्यांनी पहिल्यापासून आक्रमक धोरण जबाबदारीने स्वीकारले. त्याला यश आले. त्यात सिंहाचा वाटा शांताराम जाधवचा. दुसऱ्या उपांत्य फेरीत विदर्भाचा संघ रेल्वेच्या ताकदीसमोर निष्प्रभ ठरला. काही काळ विदर्भाकडे एक गुणाची आघाडी होती; पण अमर पवारने एका उत्तम चढाईत कोपरा अचूक टिपल्यावर आणि सामना समान गुणावर आल्यावर रेल्वेच्या क्षेत्ररक्षणाचा भेद करण्याची कुवत विदर्भाच्या एकाच्याही चढाईत दिसली नाही. बीजू पेणकरने हा सामना आपल्या आक्रमक पकडीने गाजवला.

अंतिम सामन्यात महाराष्ट्र थोडा कमनशिबवान ठरला. थोडी त्याची घाई नडली. हरलेली नाणेफेक, पहिला गुण रेल्वेला देणारी विजय जाधवची झालेली वादग्रस्त पकड आणि रेल्वेच्या संघातून गुण निघण्याची शक्यता असलेल्या कर्णधार जाधवचा मध्यंतरापूर्वी मुरगळलेला पाय हे महाराष्ट्र संघाचे दुर्दैव! समोरच्या संघातले शेखर शहा, त्यातले कमकुवत दुवे ओळखून घाई न करता संयमपणे एक एक गुण मिळवण्याचा कमीत कमी न जाऊ देण्यासाठी जाणीवपूर्वक करावयाच्या प्रयत्नाचा अभाव ही महाराष्ट्राची चूक! या चुकीचा फायदा सदा शेटेसारख्या अनुभवी कर्णधाराने घेतला. आपली बचावफळी भरभक्कमपणे सांभाळली आणि तीन वर्षांनंतर पुन्हा एकदा विजेतेपदाचा चषक हस्तगत केला!

महिलांच्या सामन्यात विभागवारी कथन करावे असे काही फारसे घडले नाही. सालाबादप्रमाणे आपल्या विभागातल्या सर्व संघांना (या वर्षी मध्यप्रदेश, तामीळनाडू, मेघालय, गुजरात) सहजगत्या हरवून महाराष्ट्राने विभागीय अजिंक्यपद मिळवले. आपापल्या विभागात विजेतेपद मिळवताना विदर्भ, हैद्राबाद, वेस्ट बंगालला फारसा त्रास पडला नाही. सामन्यातील चुरशीपेक्षाही सतरा राज्यांच्या महिलासंघांनी भाग घेतला आणि गेल्या काही वर्षांच्या तुलनेत काही वाढती जाण खेळाच्या शास्त्राबद्दल दाखवली हे अधिक महत्त्वाचे. हैद्राबाद–वेस्ट बंगाल यांचा दर्जा मात्र चांगला होता. विदर्भाच्या, महाराष्ट्राचे मूळ सांगणाऱ्या मुली मात्र त्या मानाने कच्च्या होत्या. विदर्भात दर वर्षी डझनवारी नामवंत कबड्डी–स्पर्धा भरतात. त्याचा फायदा जर या भगिनींना दिला, काही तंत्रशुद्ध प्रशिक्षण दिले तर विदर्भाचा पुरुष संघ जसा बळकटपणे उभा राहतो तसे उभे रहाणे नव्हे हमखासपणे अंतिमफेरीपर्यंत पोचणे त्यांना अवघड जाऊ नये.

उपांत्यफेरीत हैद्राबाद–बंगालचा सामना चांगला रंगला. हैद्राबादचे कव्हर साखळीपद्धतीच्या पकडी घेई हे खास नावाजण्याजोगे. पुरुषसंघातही या प्रभावी बिनधोक पकड घेण्याच्या पद्धतीचा वापर फारसा आढळत नाही. महिलासंघात तर नाहीच नाही. ते कौशल्य हैद्राबादच्या महिलांनी आत्मसात करू लागावे हे निश्चितच कौतुकास्पद. त्यांच्या एस. पुष्पा, शगून या खेळाडूंनी सामना चांगला रंगविला. अलाहिदा डाव संपता संपता बंगालच्या भट्टाचार्याने एक गुण मिळवला आणि स्वतःच्या संघाला विजय मिळवून दिला. मोनीका नाथ भट्टाचार्य सिकदार, मुजुमदार या बंगालच्या आघाडीच्या खेळाडू. दोन्ही कौशल्यात तरबेज असलेल्या कलकत्त्याच्या एका सामन्यात महाराष्ट्र महिलांना पराभवाचे पाणी पाजणाऱ्या, तरीही महाराष्ट्राच्या संघाला त्या तोडीस तोड निघण्याची शक्यता नव्हती. अरुणा चव्हाण, शुभांगी दाते, शकुंतला खटावकर या महाराष्ट्राच्या संघातील आक्रमक, अष्टपैलू चढाईपटूंच्या जवळपास जाणारीही खेळाडू इतर संघात नव्हती. महाराष्ट्राचे क्षेत्ररक्षण सहजासहजी भेदणेही शक्य नव्हते. त्यामुळे महाराष्ट्र अंतिम सामना एकतर्फी जिंकणार हे जवळजवळ गृहीत होते. पहिल्या तीन मिनिटांत तडकाफडकी कोरा खंक बंगालवर लावून महाराष्ट्राने मुहूर्त चांगला केला; पण या तडफेला नंतरच्या घाईने दृष्ट लागली. थोडे इकडे तिकडे झाले तरी कोणीही सहजपणे डाव सावरावा इतक्या दर्जाच्या महाराष्ट्रातील महिला; पण बंगालचे कौतुक हे की त्यांनी ही संधी महाराष्ट्राला दिली नाही आणि मध्यंतराआधीच लोणाची परतफेड

करून सामना जवळजवळ समान गुणावर आणला. (१२–११) एवढेच नव्हे तर दुसऱ्या डावातही काही काळ हा ताण कायम ठेवला. दुसरा डाव संपता संपता पुन्हा महाराष्ट्राने लोण मारत आणले. बंगालचा अवघा एक खेळाडू आत होता आणि अनवधानाने अरुणा चव्हाणने त्याला हात घातला. तीन गडी बाद झाले. त्यावरोबरच सामना संपला. त्या वेळी गुणसंख्या होती १९–१६. शेवटच्या क्षणाची उगीचच केलेली घाई टाळली असती तर हा सामना २२–१३ असा जिंकणे महाराष्ट्राला सहज शक्य झाले असते. असो. यशस्वीपणे अजिक्यपदाच्या वाटचालीचे दुसरे दशक महाराष्ट्रियन महिलांनी पुरे केले हे यशच पुरेसे भव्य आहे.

कुमारांची कबड्डी (वय १६ च्या आत वजन ५० किलोच्या आत) खरोखरच आशादायक होती. कबड्डीचे तंत्रमंत्र विविध प्रांतांत आणि तेही कुमारांच्यात पसरू लागल्याचा सुखद प्रत्यय येत होता. त्यातही आनंदाची गोष्ट म्हणजे वचावाचा एकांगी खेळ करण्यापासून ही वज्रमंडळी दूर होती, ती खराखुरा खेळ करत होती. कर्नाटक, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, केरळ, हैद्राबाद, वेस्टबंगाल, बिहार या सर्व संघांत कोणत्या ना कोणत्या प्रकाराची चमक होती. कर्नाटकाचा कृष्णमूर्ती आणि लोकेश चढाई आणि पकड दोन्हींचा खेळ करून संघाची आगेकूच करत होते. मध्यप्रदेशचा संघनायक असलेला शामलाल गुणसंख्येचा फारसा हिशोब न बांधता बेदरकार चढाया उत्तमपणे करत होता. महाराष्ट्राच्या फाळके आणि गोस्वामीकडून उद्याच्या कबड्डीत आशा धरायला काहीच हरकत नाही. केरळसारख्या तुलनेने कबड्डीत मागे असलेल्या खेळाडूंचे क्षेत्ररक्षण महाराष्ट्राच्या चढाईची धार बोथट करण्याइतके प्रभावी बनले होते. हैद्राबादचा शिवराज आणि व्यंकटराव यांनी थोडा धीर दाखवला असता तर मध्यप्रदेशऐवजी तेच अंतिम फेरीत गले असते. वेस्ट बंगालच्या घोषसारखा अप्रतिम चवडा धरणारा कोपरा कुमारगटात सोडाच; पण पुरुष प्रौढगटातही नव्हता. कर्नाटकाने या वर्षी पुन्हा अजिक्यपद मिळवले खरे; पण सामन्याच्या मध्यंतरापर्यंत मध्यप्रदेश चांगले एका लोणांच्या गुणसंख्येने आघाडीवर होते. हीशोबच मांडला तर तो हारजितीचा न मांडता जीवंत खेळाचा आणि सामन्याचा मांडावा. तो मनाला समाधान देणारा नक्कीच आहे. मात्र या हिशोबात स्वतःचे उत्तर अचूक शोधायचे तर महाराष्ट्र कुमारसंघाला यापुढे अधिक सक्त मेहनत घ्यावी लागेल हे निश्चित.

खरे तर या सामन्यात व्हावयाची बांगला देशाच्या कबड्डीसंघाबरोबर कसोटी सामने खेळणाऱ्या भारतीय संघाची निवड.

पण बांगला देशातील अस्थिर परिस्थितीमुळे हा दौरा मार्चपर्यंत लांबला. त्यामुळे मग निवडही सोलापूरच्या भुईर सुवर्णचषकापर्यंत पुढे ढकलली गेली. नाटकाचा चौथा अंक तोपर्यंत थांबला. पुढल्या वर्षी बंगलोरच्या मुहूर्तावरून या वर्षीच्या प्रयोगाचे भरतवाक्य म्हटले गेले. ◻

---

# पंचांची पंचाईत

मुकुंद मणूरकर

'सिद्धार्थ' पिक्चरमध्ये शशीकपूर सिम्मीपुढे गुडघ्यावर बसून तिच्या 'त्या' सौंदर्याला अभिवादन करतोय या पोझने मध्यंतरी धमाल उडविली होती. परवा सिडनेमध्ये चाळीस हजार प्रेक्षकांना या पोझचे दर्शन झाले. फरक इतकाच की नाजूक शशीकपूरच्या जागी वेस्टइंडीजचा कर्दनकाळ मायकेल होल्डिंग होता आणि अर्थात सिम्मी वगैरे तिथं नव्हतीच.

चौथ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाची बॅटिंग सुरू झाल्यावर होल्डिंगच्या एका चेंडूवर रेडपाथ बाद झाला आणि मग बंदुकीच्या गोळीप्रमाणे सुटलेला त्याचा पुढचाच चेंडू आयन चॅपेलच्या बॅटला चाटून यष्टिरक्षक मरेच्या हातात गेला. वेस्टइंडीजच्या सर्व खेळाडूत चैतन्य सळसळले. यष्टिरक्षक यष्टीजवळचे खेळाडू आणि स्वतः मायकेल होल्डिंग यांनी आनंदाने उड्या मारल्या; पण अंपायर लेडविज्चे बोट काही वर जाईना! क्षणापूर्वी आनंदित झालेले विंडिज खेळाडू अगतिक बनले. यष्टिरक्षक मरे खेळाकडे पाठ फिरवून उभा राहिला आणि होल्डिंग तर चक्क अंपायरपुढे गुडघे टेकून 'तुझ्यापुढे डोकं फोडून घेऊ, का तुझंच डोसकं फोडू' अशा संभ्रमित अवस्थेत बसला. लॉइडने येऊन मग त्याला उठविले. चिडलेल्या होल्डिंगचे पुढचे दोन चेंडू चॅपेलच्या डोक्यावरून गेले. ओव्हर संपल्यावर मग गिब्जकाकांनी होल्डिंगला हाताला धरून त्याच्या क्षेत्ररक्षणाच्या जागेपर्यंत पोचविले.

अर्थात विंडिजला ही विकेट महागात मुळीच पडली नाही. कारण दोन अष्टकांनंतर चॅपेल लगेचच बाद झाला. झेल मरे, गोलंदाज होल्डिंग! तसंच जोरदार अपील आणि अंपायर लेडविजचे बोट क्षणार्धात वर!

थोड्याच वेळापूर्वी घडलेल्या नाट्यमय घटनांचा परिणाम लेडविजवर झाला काय? जोरदार अपीलमुळे फलंदाजावर काही परिणाम होत असेल किंवा नसेल कदाचित; पण अंपायरवर होतो हे नक्की! अर्थात नुसती जोरदार अपील्स आणि खोटी जोरदार अपील्स यात फरक आहेच. या 'खोटया जोरदार अपील्स'च्या प्रकारात इंग्लंडचे खेळाडू फारच तयार! आपणही याचा अनुभव घेतलेला आहेच. टोनी लुइसच्या नेतृत्वाखाली भारताच्या दौऱ्यावर आलेल्या संघातील टोनी ग्रेग (सध्याचे कप्तान!) व ॲलन नॉट यांच्या अपील केल्यानंतरच्या हालचाली, हातवारे करीत अंपायरवर धावून जाण्याच्या पद्धती प्रत्येक सामन्यात बघायला मिळाल्याच. मध्यंतरी इंग्लंडच्या संघाची सूत्रे ग्रेगने घेतल्यानंतर 'तुम्ही आणि तुमचे सहकारी अशी जोरदार अपील्स करत रहाणारच का?' असा प्रश्न विचारल्यावर त्याने निर्लज्जपणे अशी अपील्स हा आमच्या टॅक्टीजचाच एक भाग असल्याचे सांगितले.

आता चॅपेलला अंपायरने जे बाद दिले ते खोटं असावं किंवा पहिल्या अपिलाचा तो परिणाम असावा असं मला मुळीच म्हणायचं नाही. उलट पहिल्यांदा चॅपेल बाद झालेला असतानाही त्याला बाद दिले नाही ही अंपायरची चूकच झाली. कारण चॅपेलच्या बॅटला चेंडू चाटून गेल्याचे टेलिव्हिजनवर स्वच्छ दिसले अशा वार्ता प्रसृत झालेल्या आहेत आणि त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे

खोटी अपील्स करण्याचे वाममार्ग विंडीज खेळाडू कधीही अनुसरत नाहीत. दिसायला रानवट दिसणारे हे खेळाडू मैदानात मात्र अतिशय सॉफिस्टिकेटेड पब्लिकप्रमाणे वागतात. सर्वच खेळाडू एकदम स्थितप्रज्ञ ! मला तर अशी शंका येतेय की त्यांच्यातला ज्युलिअन सोडला तर बाकीच्यांना हसतासुद्धा येत नसावं ! 'स्माइल प्लीज' असं म्हणून वेस्टइंडीजच्या खेळाडूंच्या हसऱ्या छब्या छायांकित करणारा फोटोग्राफर जन्माला यायचाय अजून ! (बघा : लॉइडचा कुठलाही फोटो !)

आणि म्हणूनच तिसरा सामना हरल्यावर ऑस्ट्रेलियन पंचांबाबत जी जाहीर टीका लॉइडने केली त्याला काही अर्थ आहे. हरलेला संघ अंपायरच्या नावाने बोटे मोडतो ही परिचित गोष्ट नित्याचीच असली तरी कधीकधी त्यात तथ्य असतेच आणि तसं नसतं तर सिरीज् चालू असतानाच पंचाचं नाव घेऊन उघडउघड प्रतिक्रिया व्यक्त करण्याचं धैर्य लॉइडला झालंच नसतं ! उरलेल्या दोन सामन्यात सर्वोत्कृष्ट पंचांचीच नेमणूक व्हावी अशी लॉइडने मागणी केली.

आणि हा धागा पकडूनच एका ऑस्ट्रेलियन दैनिकाने चर्चा घडवून आणली की उरलेल्या सामन्यांसाठी इंग्लंडहून दोन पंच मागवावेत की काय ? चर्चेत भाग घेतलेल्या बहुतेकांनी नकारार्थीच उत्तर दिले. तसं पाहिलं तर या सूचनेत वावगं काहीच नाही. फक्त शंका एवढीच की इंग्लंडचेच पंच कशाला ? भारताचे पंच का नकोत ? (तेवढेच ते 'ज्ञानप्रकाशा'त !) खरं तर कसोटी सामन्यात तिऱ्हाईत देशांचेच पंच आता उभे करायला पाहिजेत. कारण पंचांच्या हातून होणाऱ्या चुका या नेहमीच प्रामाणिक असतात असं नव्हे, तर पक्षपातीपणाची झाकही या चुकांमध्ये दिसून येते.

पण एकंदरीत पंच म्हणून उभे रहाणे आता एक धोक्याचे काम झाले आहे. खोखोसारख्या गतिमान खेळाचे एक वेळ जाऊ द्या; पण क्रिकेटसारख्या सुस्पष्ट नियमांच्या व ज्यांच्या नियमांवर पुस्तकेच्या पुस्तके लिहिली आहेत अशा खेळातसुद्धा अंपायरचे काम करणे म्हणजे लाखो लोकांच्या शिव्याशापांचे धनी होण्यासारखेच आहे. क्रिकेट हा प्रगत खेळ असल्यामुळेच खेळाडूंकडून पंचांस मारहाण झाल्याचे दृश्य अजून दिसले नाही. अर्थात दिसणार नाहीच अशी खात्री मात्र नाही ! ▫


बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
डेक्कन जिमखाना. • लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
उबदार
फ्लॅनेल
१४ सुंदर रंगात
व
डिझाइन्समध्ये


## चुरस संपली तरीही....

ऑस्ट्रेलिया–वेस्ट इंडीज यांच्यातले चार कसोटी सामने संपले व त्यात ऑस्ट्रेलियाने तीन विरुद्ध एक अशी आघाडी घेतली. मालिकेचे भवितव्य या दृष्टीने आता चुरस संपली असली तरी पुढच्या दोन सामन्यात रंगत मात्र तेवढीच रहाणार आहे. चौथ्या सामन्यात थॉमसनने केलेली गोलंदाजी सुरेख असली, भेदक असली तरी विंडीज फलंदाजांचा थरकाप उडविणारी मात्र नक्कीच नव्हती. लिली–थॉमसन जोडगोळीने थरकाप उडविला होता तो इंग्लंडच्या फलंदाजांचा ! पार मनोधैर्यच खचवून टाकले होते त्यांचे ! तसा प्रकार या मालिकेत दिसून येत नाही' आणि म्हणूनच परवा विंडीजचा डाव सव्वाशेच्या आत गुंडाळला गेला यातून फार गूढ अर्थ काढण्यात काही अर्थ नाही. (मागील वर्षी कलकत्त्याला वेस्ट इंडीजला दीडशे धावात गुंडाळण्याची करामत प्रसन्न-वेदीच्या फिरकीने केली होतीच की !)

पुढचे दोन्ही सामने जिंकून वेस्ट इंडीज अजूनही मालिकेत बरोबरी करू शकेल असे ऑस्ट्रेलियन कर्णधार ग्रेग चॅपेलचे उद्गार 'गुडी गुडी' बोलण्याच्या प्रकारातले मुळीच नाहीत.

वेस्ट इंडीजच्या समर्थतेला दिलेली ती पावती आहे ! ▫

## ते २१४ जण :

निवडसमितीच्या सभासदांच्या अफलातून करामतीकडे अचूक लक्ष ठेवणारे भारतात कमीतकमी २१४ लोक तरी असावेत.

विजय मर्चंटच्या 'ठाकरसी ग्रुप ऑफ मिल्स'ने न्यूझिलंड–वेस्ट इंडीज दौऱ्यासाठी कप्तान, उपकप्तानासकट सतरा खेळाडू कोण असतील हे ओळखण्याची स्पर्धा आयोजित केली होती आणि या स्पर्धेत एक-दोन जणांनी नव्हे तर तब्बल २१४ जणांनी अचूक यादी सादर केली.

धावरी, मनकड, अबीदअली यांना वगळून, सुधाकर राव व पार्थसारथी शर्मा यांचा समावेश निवड समिती नक्की करणार ! हे ओळखणाऱ्या २१४ जणांनो, 'तुम्ही बेधडक कुठलंही भविष्य सांगा, हमखास बरोबर येईल !'

▫ ▫

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**१७।१।७६ ते २३।१।७६**

## राजकीय परिस्थितीची कोंडी फुटणे शक्य

रवि हा जसे सामर्थ्य देतो तसाच समंजस अशा विचारांची देखील निर्मिती करतो. भारताच्या मकरराशीत असलेला हा रवि काही तरी अनुकूल वळण घेईल असे दिसते. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी या सध्या सामर्थ्याने लोकांच्या कौतुकाचा विषय झाल्या आहेत. त्याचबरोबर त्या ज्या पक्षाच्या नेत्या आहेत त्या पक्षात व विरोधी पक्षात जी दरी निर्माण झाली तिचा विचारही या वेळी लोकमानसात निर्माण होईल. विरुद्ध विचारवंत पुढारी यांची चर्चा सुरू होईल. असे वातावरण निर्माण होऊन परिस्थितीस काही नवे वळण लागण्याची फार शक्यता आहे. जागतिक राजकारणात भारताला महत्त्वाचे स्थान प्राप्त होईल. एखादी महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी मिळेल. आर्थिक परिस्थिती सुधारली तरी औद्योगिक मंदीची चाहूल लागणार आहे. महाराष्ट्रात मंत्रिमंडळाच्या बदलाची चाके जोरात फिरू लागली तर नवल वाटू नये.

---

### मेष : प्रगतीचा विक्रम

रवि दशमस्थानी ही एकच गोष्ट तुमच्या आगामी प्रगतिपर भविष्याची ग्वाही द्यायला पुरेशी आहे. आता मागचे सारे विसरा आणि आयुष्याच्या इतिहासाचे नवे पान उघडा असाच हा संदेश आहे. आशाआकांक्षा पुऱ्या झाल्या नाहीत म्हणून एवढी खंत का बाळगता? सफलतेच्या काळाची चाहूल याच आठवड्यात तुम्हाला लागेल. या दृष्टीने मंगळवार ते शुक्रवार हा काळ जास्त महत्त्वाचा आहे. नोकरीत साहेबाला आता तुमची फार गरज भासणार आहे. तुमच्याबद्दलचा संशय त्यांच्या मनात आता राहणार नाही. प्रमोशन-पगारवाढ असे रेंगाळत पडलेले प्रश्न मार्गी लागतील. नोकरी किंवा धंदा यापैकी काहीही तुम्ही या आठवड्यात सुरू करू शकाल. महिलांना चालू नोकरीत आशादायक वातावरण राहील. विद्यार्थ्यांना मोलाची संधी मिळेल.

### वृषभ : अनुकूल निर्णयाचा आनंद

राशीत मंगळ व भाग्यस्थानी रवि ही इतकी छान घटना आहे की या वेळी अनुकूल व महत्त्वाचे निर्णय लागून तुम्हाला आनंद होईल. अनेक दिवस चाललेल्या एखाद्या त्रासातून तुम्ही या वेळी मुक्त व्हाल. सर्वसाधारणतः हा आठवडा प्रतिष्ठा वाढवणारा आहे. स्थावराची व इतर काही रेंगाळत पडलेली कामे या आठवड्यात मार्गस्थ होतील. तब्येतीची काळजी करण्याचे आता कारण उरणार नाही. कौटुंबिक स्वास्थ्याच्या दृष्टीनेही हा आठवडा प्रगतिकारक जाईल. राजकारणी अशी एखादी महत्त्वाची व्यक्ती तुमच्या सहवासात येऊन तुमच्या हिताच्या योजना आखल्या जातील. नोकरीच्या दृष्टीने हा आठवडा जैसे थे आहे. कामाचा ताण मात्र बराच कमी होईल. महिलांना माहेरी जाण्याची संधी मिळेल. मायेची माणसे भेटतील. विद्यार्थ्यांच्या आशाआकांक्षा पालवतील.

### मिथुन : आशादायक वातावरण

रवि आठवा झाला असला तरी निराश होण्यासारखे काही नाही. तुमच्या प्रगतीची सारी सूत्रे आहेत गुरूच्या हाती. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या तरी त्यातून गुरू तुम्हाला प्रकाश दाखवणार आहे. तुमची आर्थिक परिस्थिती काहीशी तोळामासा झालेली असली तरी त्यातून तुम्हाला प्रकाशाचा मार्ग दिसणार आहे. नोकरीत जे संकट आहे असे तुम्हाला वाटते ते शेवटी काल्पनिकच ठरेल. नजीकच्या वरिष्ठांना धरून त्यांच्या कलाने वागा म्हणजे काही तरी मनासारखे घडेल. तुम्ही शुक्रवारचा उपास करा म्हणजे कुलदैवत तुमच्यावर आपली सावली धरील. महिलांना नोकरीत त्रास होणार नाही. बदली होणार नाही. विद्यार्थ्यांची फारच धावपळ होईल.

### कर्क : नोकरीत शुभ

रविशनीचा प्रतियोग झाला तेव्हा अत्यंत मुत्सद्देगिरीने वागण्याची अत्यंत गरज आहे. हे वागणे तुमच्या हिताचेच ठरेल. तुम्हाला बढती मिळेल; पण त्यासाठी वरिष्ठांचे एखादे महत्त्वाचे काम तुम्हाला करावे लागेल. ते तुमच्या इच्छेविरुद्ध असू शकेल. प्रकाशक, लेखक, पत्रकार यांना भरपूर फायदा होईल; पण नोकरीत त्यांना मालकांच्या बाजूने राहावे लागेल. बेकारांची काळजी व चिंता दूर होण्यासारखे काही तरी घडेल.सोमवारी एखादी उच्च प्रतिष्ठित व्यक्ती भेटून तिचे सहाय्य होईल. आर्थिक परिस्थिती बरीच सुधारेल. लॉटरीत व रेसमध्ये भाग घ्यावा. महिलांना स्थावराची प्राप्ती अगर तत्संबंधीचा लाभ होईल. विद्यार्थ्यांना नातेवाइकांकडून मदत मिळेल.

### सिंह : अपेक्षाभंगाची खंत

राशिस्वामी रवी जरी शत्रूचा वीमोड करणारा असला तरी तो पूर्णपणे वीमोड झाला आहे असे समजून चालू नका. विरोधकांच्या गुप्त कारवाया चालूच रहाणार आहेत व तुम्हाला कुठे गोत्यात आणता येईल ते पहाणार आहेत. या आठवड्यात प्रामुख्याने राजकीय क्षितिजावर अपेक्षाभंगाचे दुःख तुम्हाला सोसावे लागेल. तर तेवढ्याने धीर सोडू नका. मिळतेजुळते घेतल्यास ही लाटदेखील निघून जाईल. रविवार ते बुधवार नोकरीत पाऊल पुढे पडेल. काही तरी आशेचे किरण हाती लागतील. वरिष्ठांच्या मर्जीचा प्रत्यय येईल. पैसे पुरेसे मिळतील. गरजा भागतील. महिलांना स्वतंत्र धंदा सुरू करता येईल. सार्वजनिक कार्यात दगदग होईल.

### कन्या : नोकरीत थोडे चांगले

पाचवा रवी मकरराशीत आहे तो उत्तम आहे. सार्वजनिक जीवनात प्रतिष्ठा वाढून तुमच्या शब्दाला किंमत येईल. उच्च पदस्थ अशा एखाद्या व्यक्तीबरोबर सुसंवाद होऊन तुमच्यावर त्याची मर्जी बसेल. नोकरीत मालकांच्या अगर वरिष्ठांच्या मनात तुमच्याविषयी सहानुभूती व आदर निर्माण होऊन पगारवाढ, बढती, प्रमोशन यासाठी त्याचा उपयोग होईल. चालू कामात कार्यक्षमता

वाढल्याचा प्रत्यय येईल. बेकार व्यक्तींना जे हाल काढावे लागले त्याचे परिमार्जन या आठवड्यात होऊन जाईल. शुक्रवारचा उपास करा. त्याचा स्थैर्यासाठी उपयोग होईल. महिलांची तब्येत जरा सुधारेल. सर्दी-पडसे झाले असेल तर ते कमी होईल. विद्यार्थ्यांना नव्या क्षेत्रात प्रवेश मिळेल.

## तूळ : स्थावराची प्राप्ती

हर्शल-राहू पहिला आहे तर रवी मकर-राशीत सुखस्थानी आहे. सर्वसाधारण आठवडा प्रगतीचा व काही नवे घडवणारा आहे. बरेच दिवस मतभेदात अगर तंट्यात पडलेला स्थावराचा प्रश्न सुटेल. तुम्हाला वारसामार्गाने अगर स्वतःच्या कर्तबगारीने काही स्थावराची प्राप्ती व्हावी असा योग आहे. लॉटरीचा तुम्हाला फारसा नाद नसला तरी या आठवड्यात तुम्ही तो प्रयत्न अवश्य करावा असे मी सुचवतो. नशिबाचे फासे तुमच्या बाजूने पडतील. कापड, सोने, चांदी असे वायदे ज्यांना या आठवड्यात करायचे असतील त्यांनी ते अवश्य करावे. फायदा होईल. नाटकाचे कॉंट्रॅक्ट या वेळी फायदा मिळवून देईल. नोकरीत सारे काही ठीक आहे. महिलांनी व विद्यार्थ्यांनी नव्या योजना हाती घ्याव्यात. शुभारंभ करावा.

## वृश्चिक : मित्रांचे सहकार्य

हर्शल व राहू बारावे आहेत त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. व्यापारी लोकांनी मालाच्या खरेदीचे वायदे करताना फार जपून करावेत. धाडस अंगाशी येणार नाही. दक्षता घ्यावी. स्थावरजंगम खरेदीचा व्यवहार तूर्त पुढे ढकलावा. येणे असलेली रक्कम वसूल करण्यात अडचणी निर्माण होण्याचा संभव आहे. मात्र असे काही प्रतिकूल ग्रहमान असले तरी रवि तिसरा आहे ही जमेची बाब आहे. महत्त्वाकांक्षा व ठरलेली कामे पुरी होण्यास तशा अडचणी येणार नाहीत. मित्रांचे चांगले सहकार्य मिळेल. नोकरीत गुणांचे चीज होईल. कर्तबगारीला वाव मिळेल. मंगळवार हा दिवस उपासाचा ठरवा. भरभराटीसाठी उपयोग होईल. महिलांना खर्चाची तोंडमिळवणी करताना नाकी नऊ येतील. विद्यार्थ्यांनी स्मरणावर विसंबून राहू नये.

## धनु : अडचणीतून मार्ग मिळेल

हर्शलच्या अनुकूलतेमुळे अनेक अडचणींतून सहजपणे मार्ग निघेल. फारसा आटापीटा करावा लागणार नाही. नोकरीधंद्याची परिस्थिति सुधारलेली असेल. समज–गैरसमजाचे वातावरण निवळून व्यावसायिक जीवनात नवे वर्ष किंवा नवा अध्याय लिहिला जाईल. प्रकाशन–लेखन यात नव्या कल्पनांचा उपयोग करण्यासाठी योग्य व्यक्तीची मदत होईल. प्रवासामुळे फायदा होईल. एखाद्या उच्चपदावरील व्यक्तीचा आश्रय लाभून अनेक आर्थिक विवंचना दूर होतील. चालू नोकरीत काही तरी महत्त्वाची घटना घडेल की जी भावी काळात तुमच्या पथ्यावर पडेल. गुरुवारी उपास करा व शुक्रवारी बचत करा. महिलांना नोकरीचा प्रयत्न करता येईल. पैशाची कमतरता नाही. विद्यार्थ्यांनी पैसे उडवणे थांबवावे. करमणुकीत वेळ फुकट जाईल.

## मकर : अहंकार वाढेल

राशीत रवि व समोर शनि तसेच पंचम स्थानी मंगळ ही परिस्थिती तुमच्या फारच पथ्यावर पडणारी आहे. मुळातच अहंकारी असलेला तुमचा स्वभाव या वेळी जास्तच बळावेल. हाताखालच्या माणसांना दुखवण्याचे सत्र चालू ठेवाल; पण त्यामुळे अपेक्षित साफल्यात अडचणी येतील. सहकाऱ्यांवर विश्वास ठेवणे भाग पडेल. नोकरीत वरिष्ठ जागेवर जे लोक आहेत त्यांनी संयमाची कास सोडू नये. बेकारांचा वनवास या वेळी सुटण्याचा बराच संभव आहे. बँक, महसूलखाते, इंजिनियरिंग उद्योग यांत नोकरी मिळेल. प्रवासाचा बेत मात्र लांबणीवर पडेल. मंगळवार व शनिवार विशेष महत्त्वाचे आहेत. महिलांना भांडणाचे आव्हान मिळाले तरी ते त्यांनी टाळावे. मुलांत रमण्याचा योग आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहल अगर प्रवास घडेल.

## कुंभ : अपेक्षापूर्ति

हा आठवडा तुम्हाला अनेक बाबतीत गोड बातमी, तसाच फायदा देणारा ठरावा. आशाआकांक्षापूर्तीचा इतका छान योग आहे की परमेश्वराजवळ काही तरी चांगले मागा. राजकारणात तुमची प्रतिष्ठा व गरज उंचावणार आहे अनेक दिवसांचे स्वप्न साकार होईल. तुम्ही कोणत्याही पक्षाचे असा पण या आठवड्यात तुमचे नाव बरेच गाजणार आहे. जे इतके दिवस फक्त मनातच होते ते या वेळी प्रत्यक्षात उतरेल. नोकरीत महत्त्वाचा बदल होईल. तुमच्या गुणाचा व जास्त नोकरीचा विचार होईल. वरिष्ठांबरोबर घरोब्याचे संबंध येतील. बेकारांना या आठवड्यात फिरतीची नोकरी मिळून जबाबदारी वाढेल. शनिवार व मंगळवार लॉटरीत फायदा होईल. महिलांना अंगचे कसब दाखवण्याची संधी मिळेल. मैत्रिणीत स्तुती होईल. विद्यार्थ्यांना लाभयोग आहे.

## मीन : आर्थिक प्रश्न सुटेल

तुम्हाला हवे तेवढे मानसिक स्वास्थ्य जरी सध्या मिळत नसले तरी सर्वसामान्यतः हा आठवडा प्रगतिकर जाईल. लेखक व नाट्यकलावंतांना प्रसिद्धीचा झगमगीत प्रकाश मिळेल. आकाशवाणीवरून नाव चमकेल. गायक कलावंतांच्या मैफली गाजतील. अनेकांची आर्थिक स्थिती या वेळी सुधारेल. प्रश्न गुंतागुंतीच्या चक्रातून बाहेर पडतील. घरसजावटीचे समाधान मिळेल. अंगात असलेले गुण प्रकाशात येतील. नोकरीत गैरसमज असतील ते कमी होऊ लागतील. कामाचा ताण पडेल. फिरतीची नोकरी गुणांना प्रोत्साहक अशी ठरेल. आर्थिक क्षेत्रात जे नोकरी करणार त्यांचे हीत होईल. बेकारांना आता तिष्ठत रहावे लागणार नाही. राजकीय क्षेत्रात नवा चमत्कार घडवू शकाल. महिलांना खरेदी करण्यात मोठा लाभ पदरी पडेल. भरतकाम लोकप्रिय होईल. विद्यार्थ्यांवर श्रमाची जबाबदारी पडेल. त्यांचे कौतुक होईल.

□ □

। स्टुडिओ चक्कर ।

## कर्नाड डायरेक्टरपदातून मुक्त

रविकिरण साने

बरेच दिवस होणार म्हणून जे गाजत होते ते अखेर घडले. गिरीश कर्नाड फिल्म अ‍ॅन्ड टीव्ही इन्स्टिटयूटच्या डायरेक्टरपदातून मुक्त झाले. आणि त्यांना निरोप देण्याचा सोहळाही पार पडला. ते पुढे नेमके काय करणार हे अजून तरी अस्पष्ट आहे.

कन्नड रंगभूमी आणि प्रायोगिक चित्रनिर्मितीमध्ये रमलेला हा उमदा तरुण दिग्दर्शक नाटककार पुण्यात आला तो ऑक्टोबर १९६४ मध्ये. ही घटना तशी अकल्पित होती. इन्स्टिटयूटमधील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने उग्र रूप धारण करून सरकारला जेरीस आणले होते. हे आंदोलन मागण्या, चौकशी या सर्व सत्रांचा शेवट झाला तो इन्स्टिटयूटचे शासकीय संस्थेतून स्वायत्त संस्थेमध्ये रूपांतर होण्यात. त्याच वेळी वंशवृक्ष, तुघलक यामुळे गाजत असलेले कर्नाड इन्स्टिटयूटचे डायरेक्टर झाल्याची वार्ता आली.

गेल्या दोन वर्षात त्यांनी इन्स्टिटयूटच्या कामात नवी शिस्त आणली. विस्कळितपणे चालू असणारे फिल्मविषयक विविध कोर्स बंद करून सर्व विषय एकत्र करणारा नवा सर्वांगीण कोर्स तयार करण्यात त्यांचाच वाटा सिंहाचा होता. त्यांच्याच काळात पुण्याचे टीव्ही ट्रेनिंग सेंटरही सुरू झाले; पण असे सगळे असले तरी फायलींचे गठ्ठे आणि मीटिंग या गोंधळात त्यांचा जीव उबगला असला तर नवल नाही. क्रिएटिव्हसाठी धडपडणारा हा तरुण बंदिस्त झाला होता. शेवटी त्याने स्वतःच ही बंधने दूर केली. राजीनामा देऊन आणि क्रिएटिव्ह मीडिअमसाठी नवी झेप घ्यायला तयार झाले. पाहू या काय घडते ते.

कर्नाडांचे जागी डायरेक्टर म्हणून आता एन्. व्ही. के. मूर्ती हे आले आहेत. फिल्म डिव्हिजनमध्ये 'अ‍ॅडिशनल चीफ प्रोडयुसर' या नात्याने वृत्तविभागाचे काम ते पाहात होते. तत्पूर्वी उस्मानिया विद्यापीठात असिस्टंट रजिस्ट्रार आणि वृत्तविद्याविभागाचे प्रमुख म्हणून त्यांनी काम केले. तर दिल्लीच्या जे. एन. युनिव्हर्सिटीचे रजिस्ट्रार म्हणूनही ते काम पाहात होते. त्यांच्या चित्रसृष्टीतील आयुष्यात, सामाजिक व आर्थिक विषयावरील त्यांच्या डॉक्युमेंटरीज वादग्रस्त ठरल्या आहेत, त्यांच्या अनेक उत्तमोत्तम डॉक्युमेंटरीपैकी 'फेस टू फेस' ही सर्वात गाजली आहे. नवे बदल प्रत्यक्षात येत असताना ही नवी जबाबदारी ते स्वीकारीत आहेत. भारतीय चित्रसृष्टीला नवा आकार देणारी ही संस्था ते कसे चालवतात हे पाहायचे. ◻

## नवी नायिका सारिका

'गीत गाता चल' मधे सचिनबरोबर काम करणारी टीन एजर नायिका आठवतीय का तुम्हाला? नवी फ्रेश जोडी म्हणून दोघांचेही कौतुक झाले. हा पिक्चर फारसा चालला नाही; पण एक नवी नायक-नायिकेची जोडी मात्र देऊन गेला. ही नायिका होती सारिका. नाव ओळखीचे वाटतेय म्हणून गडबडलात ना? करेक्ट. तीच ती. म्हणजे बेबी सारिका म्हणून आपण जिला ओळखत होतो ती नाही. मुन्नी लडकी आता चक्क टीन एजर नायिका म्हणून पडद्यावर झळकते आहे.

सारिकाला फिल्मी कॅमेरा तसा नवा नाही. ही मुलगी अगदी सहाव्या वर्षापासून कॅमेऱ्यासमोर वावरतीय. तेही मोठ्या रुबाबात. तिचा चित्रपटात प्रवेश झाला तोही एका गंमतीशीर प्रसंगाने. १९६४ साली युनायटेड प्रोडयुसर्स आणि फिल्मफेअर यांनी संयुक्तपणे एक टॅलेंट कांटेस्ट' घेतली होती. सहा वर्षांची सारिका त्यात भाग घेण्यास पात्र नव्हती; पण तिच्या आईने अगांतुकपणे तिचा एक फोटोच फिल्मफेअरकडे पाठवला. सुप्रसिद्ध दिग्दर्शक निर्माते बी आर चोपडांची नजर त्या फोटोवर पडली. चोपडांना ही छबी एकदम पसंत पडली अन् सारिकाला स्क्रीनटेस्टचे निमंत्रण गेले. टेस्टला ती फिट ठरली आणि हमराजमधे तिला घेण्याचे निश्चित झाले. प्रत्यक्ष टेकला मात्र धमाल झाली. स्टुडिओत तिचा पहिलाच दिवस होता. या छोटया मासूम पोरीला सर्वजण खेळवत होते. ती नर्व्हस होऊ नये, रडून गोंधळ घालू नये म्हणून जपत होते. विमी आणि अचला सचदेवबरोबरचा शॉट सुरू होणार होता. शॉट सुरू होईपर्यंत दोघी तिच्याशी विशेष जवळीक दाखवीत होत्या. शॉट सुरू होताच एक संवाद त्यांना बोलायचा होता. वाक्य होते, 'हम कुछ भी करे, माबापका प्यार नहीं दे सकते' रिहर्सल शांतपणे झाली. टेक सुरू झाला. वाक्य बोलून झाले आणि इकडे सारिकाला काय झाले कोणास ठाऊक. ती एकदम गरम झाली आणि ओरडली 'आंटी!' झाले पुन्हा रिटेक. मग मात्र सारिकांनी जो टेक दिला तो लाजवाब.

हमराज आला आणि मग सारिकाच्या मागे चित्रांची गर्दीच सुरू झाली. बालक मेरा मुन्ना, छोटी बहू, ज्योती, देवी, सत्यकाम, मझली दीदी, जवां मुहब्बत, आशीर्वाद, बेटी, हारजीत अशा एकामागून एक चित्रांची मालिकाच तयार झाली. बालसुलभ चंचलता; डोळे उडवण्याची सवय आणि मासूमपणा या गोष्टींमुळे तिच्या भूमिकांना एक वेगळाच आकार आला. नायिका म्हणून पडद्यावर आली तरी ही सारी वैशिष्टये ती अजून टिकवून आहे. त्यामुळे ही षोडषवर्षी कन्या पौगंडावस्थेतले भाव सुंदर व्यक्त करते. अगदी परवापरवापर्यंत ती बालकलाकार म्हणून वावरत होती. बालकलाकारातून नायिकेच्या भूमिकेला यायला तिला त्यामुळे तसा फारसा त्रास झाला नाही. कारण चित्रसृष्टीशी सतत संबंध होताच; पण आता एक वेगळीच अडचण तिच्यापुढे उभी आहे. अहो, परवापरवापर्यंत ज्यांना 'अंकल म्हणून ही हाका मारत होती त्याच तमाम काका-मामांना आता नायिका म्हणून मिठ्या मारायच्या म्हणजे काय? या अंकलकडे चक्क एक प्रियकर म्हणून पाहायचे. त्याचे नाव घेत त्याच्या मागे झाडाझुडपांतून पळायचे आणि रोमान्स करायचा म्हणजे बडी आफतच आहे; पण ती सध्या मोठ्या धैर्याने याला तोंड देत आहे आणि अंकलच काय तिच्यापुढे आजोबा शोभणाऱ्या सुनील दत्तबरोबर ती नायिका म्हणून रमेश गुप्तांच्या 'मंगल'मधे काम करते आहे. म्हणजे पाहा केवढी आफत!

सारिकाचे एक नशीब चांगले आहे. सध्या. तिच्या हातात असलेले सारे पिक्चर्स नामवंत दिग्दर्शकांचे आहेत. त्यामुळे इतक्या लहान वयातच मोठ्या भूमिका पार पाडायची संधी

तिला आली आहे. कमाल अमरोहींच्या 'रजिया सुलताना' या नव्या महत्त्वाकांक्षी फिल्ममधे ती शहाजादीचे काम करते आहे. गुलजारच्या 'सावली'मधे तिची प्रमुख भूमिका आहे. बाबूराम इशारांच्या 'कागज की नाव'ची ती नायिका आहे. बासू भट्टाचार्यांचे नवे विनोदी चित्र आनंद महलमधे ती विजय अरोराबरोबर काम करते आहे. सचिनबरोबर सध्या चार चित्रं चालू आहेत. जिद, बालिकावधू, कितने पास कितने दूर, सावली आणि जाये तो जाये कहां ? याबरोबरच जे. पी. सिंघल यांच्या एका चित्रात ती काम करते आहे. त्याचे नामकरण अजून झालेले नाही. ▫

## नवा नायक मा. सचिन

अजब तुझे सरकार हा नुकताच प्रदर्शित झालेला मराठी चित्रपट सध्या गाजतोय तो बालनट सचिनच्या अफलातून कामामुळे. तसा हा चित्रपट चार वर्षांपूर्वीच तयार झालेला; पण आता प्रदर्शित होतो आहे. तकी वर्षं बालनट म्हणून गाजत असलेला हा सचिन आता कोवळ्या तरुण नायकाच्या रूपात आपल्या पुढ येतो आहे.

सचिन हा सुप्रसिद्ध चित्रनिर्माते शरद पिळगांवकर यांचा मुलगा. अगदी लहानपणापासूनच चित्रपटात वावरतो आहे. त्याचा पहिला चित्रपट 'हा माझा मार्ग एकला' त्या वेळी तो केवळ पाच वर्षांचा होता आणि त्याला दिग्दर्शन मिळाले होते राजा परांजपे यांचे'. हा चित्रपट एकदम हीट गेला. सचिनच्या कामावर तर सगळे खूष. या कामाने त्याला पहिल्याच पदार्पणात १९६३ चे राष्ट्रीय पारितोषिक आणि महाराष्ट्रराज्य पारितोषिक मिळवून दिले. त्याच वेळी सगळ्यांनी खूणगाठ बांधली हा पोरगा चांगलेच नाव कमावणार. मराठीबरोबरच हिंदी चित्रात बालकलाकार म्हणून तो चमकू लागला. 'जिवोका बेटा', 'निशान', 'ब्रह्मचारी', 'दुनिया', 'गॅम्बलर', 'प्रेम-पुजारी', 'ज्वेलथीफ', 'दास्तान' असे एकापेक्षा एक हीट पिक्चर्स त्याला मिळत गेले. त्याचे आवडते नट देव आनंद, शम्मी-कपूर यांचे बालपणच त्याने या भूमिकातून साकार केले होते. 'मझली दीदी'मध्ये मीना-कुमारीबरोबर त्याने काम केले. त्याच्या जोडीला होती बेबी सारिका.

बालनट म्हणून गाजत असतानाच दोन-तीन वर्षांपूर्वी एका विचित्र चक्रात तो सापडला. धड बालनट नाही आणि तरुण नायक म्हणूनही काम करता येत नाही अशी त्याची अवस्था झाली. या अवस्थेतच जे निर्णय घेतले जातात त्यावर पुढचे भविष्य अवलंबून असते. याच वेळी एक सुंदर चित्र त्याला मिळाले. त्याची सध्याची अवस्थाच नेमकी चित्रित करणारे 'बिरबल माय ब्रदर' राजा ठाकुरांचे महत्त्वाकांक्षी इंग्रजी चित्र 'पौगंडा-वस्थेचे हृद्य चित्रण करणारे हे चित्र त्याने तितक्याच ताकदीने साकार केले आणि विचित्र भोवऱ्यातून तो बाहेर पडला !

आता नवा तरुण नायक म्हणून तो पडद्यावर येत आहे. जिद, बालिकावधू, कितने पास कितने दूर, सावली, जाये तो जाये कहाँ हे त्याचे पिक्चर्स सध्या सेटवर आहेत. काही झपाट्याने पूर्ण होत आहेत. गीत गाता चलमध्ये एकत्र आलेले सचिन व सारिका आता नायकनायिका म्हणून एकत्र येत आहेत. सावली, कितने पास कितने दूर मध्ये दोघेही एकत्र आहेत. पाहू या नवीन रूपात सचिन कसा येतो ते. ▪ ▪

## एका मुक्त गाण्याचे मुक्त समर्थन : पृष्ठ २ वरून

तेव्हाच निर्माण होते. मुक्त वादळगाण्यासाठी ॲण्टिगनीसारखे जीव ओवाळून टाकायला आतुरतात... पण ज्यांना मनच नसते... ज्यांचे जगणे म्हणजे केवळ शरीराचे व्यवहार असतात असे पहारेकरी फक्त पत्ते खेळत बसतात... कोणत्याही परिस्थितीत त्यांना फक्त पत्तेच खेळणे शक्य असते.

राजा क्रियॉनच्या भूमिकेत दोन रंग अनुईने बेमालूम मिसळलेले आहेत. ॲण्टिगनीसाठी वाटणाऱ्या काळजीचा, मायेचा, आपुलकीचा एक शांत रंग... आणि निरनिराळे देखावे निर्माण करून जरब बसवणारा आक्रमक रंग. तो ॲण्टिगनीपुढे अगदी अगतिक होऊन बोलतो. त्याच्या मुखातून त्या वेळी जीवनातील विसंगतीच बोलत असते. स्वतः राजा क्रियॉन विसंगतीच्या आधीन झालेला असतो, जीवनाच्या विसंगतीला बळी गेलेला असतो. जीवन जगायचे असेल तर विसंगती स्वीकारलीच पाहिजे' हे त्याचे जीवनतत्त्व झालेले असते; परंतु जग सुंदर मानणारी निष्पाप ॲण्टिगनी ही विसंगती स्वीकारू शकत नाही. ती तडजोड करू शकत नाही. सुसंगती आणि विसंगती एकमेकींशी झगडा करू शकतात... तडजोड करू शकत नाहीत ! ती तथाकथित सुखाच्या पिंजऱ्याचे दार स्वतःहून उघडून बाहेर येते... आणि स्वतंत्र श्वास घेण्यासाठी धायाळ होते.

—तरीसुद्धा प्रश्न असा निर्माण होतो— ॲण्टिगनीचे समर्पण कशासाठी होतं ? की तो केवळ मूर्खपणा होता ? की ती जीवनाला कंटाळली होती ? राजा क्रियॉन तिला आपली बाजूही समजावून सांगतो...आपली 'मजबूरी' सांगून तिची सहानुभूती जिंकण्याचा प्रयत्न करतो...जगण्यासाठी त्यानं स्वतःला जखडून घेतलेलं असतं; पण ॲण्टिगनी ऐकत नाही. 'कशासाठी हा अट्टाहास ?' हा प्रश्न मनाला छळत रहातो. तिच्या या समर्पणामागचं कारण अगदी क्षुल्लक वाटतं...तिच्या स्वतःच्याही दृष्टीने ते सामान्यच आहे. तिला करायचं आहे फक्त भावाचं दफन...त्यामागे तिची अंधश्रद्धा वगैरे काही नाही; परंतु एखाद्या मृताचे दफन करण्याचा अधिकार जिवंत माणसाला असावा असे तिला वाटते. तिला तो अधिकार सर्व सामर्थ्यानिशी बजावयाचा आहे... त्यासाठी ती प्राणपणाने झगडते. नाटककार अनुईने तिच्या संघर्षामागचं ध्येय सामान्य ठेवून काय साधलं आहे ? ध्येय मोठं ठेवलं की ध्येयालाच असामान्य महत्त्व येतं. त्यामागचा संघर्ष फिका पडतो. अनुईला संघर्षालाच रंग भरायचा आहे. आपण कशासाठी झगडतो आहोत, या कारणापेक्षा कितपत झगडू शकतो...हे महत्त्वाचे ठरवायचे आहे. ॲण्टिगनी संघर्षासाठी प्राणाची बाजी लावते; परंतु त्याच वेळी ती आपलं मत कुणावर लादत नाही, कुणालाही आपल्यामागून या, माझा मार्ग अनुसरा हेसुद्धा तिला सांगायचं नाही आहे. ती स्वतः मुक्त असल्यामुळे दुसऱ्यांनाही मुक्तच ठेवते. हिमॉनलासुद्धा शेवटी सारं असह्य होतं, तो तिच्यामागून जातो.. वादळावर स्वार होणाऱ्या चिचेच्या पानासारखा ! राजा क्रियॉन मात्र त्या वादळाबरोबर जाऊ शकत नाही. तो फाटून जातो...वाऱ्याला अडवू पहाणाऱ्या बलाढ्य केळीच्या पानासारखा ! ॲण्टिगनी कुणात न अडकता, कुणाला न अडकवता निघून जाते...अनुईला अभिप्रेत असलेल्या एका मुक्त गाण्याचे मुक्त समर्थन करण्यासाठी !

—आशा इंगळे